१९६२

# ाझे शिल्पकार



म. ग्रं. सं. ठाणें
विषय— चरित्र.
सं. क्र. 10063.

REFBK-0012415

૩૩૮૫ ... ચારિત્ર
૧૦૮૩ ... ૨૩-૧૧-૬૨

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# माझे शिल्पकार

लेखक

दिनकर द. पाटील

REFBK-0012415

कुलकर्णी ग्रंथागार पुणे

मूल्य तीन रुपये.

ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रम ........................ वि: ........................
आंक ........................ नों: दि: ........................

प्रकाशक
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २

© दिनकर द. पाटील

प्रथमावृत्ति १९६२

मुद्रक —
ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय
५५१ बुधवार, पुणें २

माझे प्रिय मेहुणे

आप्पासाहेब मा. जाधव

आणि

सौ. राजलक्ष्मी यांस —

# चिनी माती

लिखाण स्फूर्तीनं लिहिलं जातं, असं म्हणतात. लिहीत असतीलहि बिचारे कांहीं! मी मात्र लिखाण करतों तें गरजेनं— माझ्या आणि मित्रांच्या!

सिनेमा हा माझा धंदाच असल्यानें एक चित्र संपलं कीं दुसरं लिहावंच लागतं. मध्यंतरीं मीं नाटकं लिहिलीं, तींहि अशींच– मित्रांच्या आग्रहानं, त्यांच्याच लकडयामुळें. कथानिबंधांचा रतीबहि मला दिवाळीच्या मोसमांत घालावा लागतो.

प्रस्तुत संग्रहाची जन्मकथाहि अशीच आहे. माझे मित्र श्री. र. गो. सरदेसाई हे "यशवंत" मासिकाचे संपादक असतांनाची गोष्ट. मला सहज ते म्हणाले, "विविध क्षेत्रांतील व्यक्तींशीं तुमचा परिचय आहे. त्यांचीं शब्दचित्रं वाचनीय होतील. लिहा ना यशवंतसाठीं." त्यांच्याच आग्रहानं या संग्रहांतलीं पहिलीं सहा व्यक्तिचित्रं मीं लिहिलीं. पुढें तेच "यशवंत" मधून निघाले आणि माझं लिखाण आपोआप थांबलं.

माझे प्रकाशक मित्र श्री. पंडित अ. कुलकर्णी यांच्या तें वाचण्यांत आलं; आणि त्यांनीं मला हीं व्यक्तिचित्रं पूर्ण करायला लावलीं. वास्तविक, आयुष्यांत अनेक व्यक्ति आपल्याला भेटतात, आपला असा संस्कार करून जातात. पण एका संग्रहाकरतां दहा व्यक्तिचित्रं त्यांना पुरेशीं वाटलीं. मीहि म्हटलं, "बस्स् झालं!"

अनुभवासारखा गुरु नाहीं. तो देणारे– चांगला आणि वाईटहि– भेटणं हीसुद्धां भाग्याचीच गोष्ट नाहीं का? चांगले अनुभव आनंद देतातच; पण वाईट अनुभव आयुष्यभर उपयोगी पडतात! आणि म्हणूनच, कोणाबद्दलहि मला राग नाहीं. उलट "माझे शिल्पकार" म्हणून त्या सर्वांचा मी ऋणि आहें.

शंकरशेट भुवन
२९६ ताडदेव रोड,
मुंबई नं. ७.

— दिनकर द. पाटील

92894

# बोलकी शिल्पमूर्ति !

माझे मित्र श्री. दिनकर द. पाटील यांनीं 'माझे शिल्पकार' या आपल्या नव्या पुस्तकाला प्रस्तावनावजा दोन शब्द लिहिण्यास मला सांगितलें, त्याचें एकच कारण मला दिसतें. या पुस्तकांत त्यांनीं आपल्या जीवन शिल्पकारांचीं जीं स्वभावचित्रें जिव्हाळ्यानें चितारलीं आहेत, तीं त्यांच्या लेखणींतून कागदावर उमटवण्यास मी निमित्त झालों आहें. 'यशवंत' मासिकाचा संपादक असतांना या पुस्तकांतील स्वभावचित्रें लिहिण्यास मींच दिनकररावांना प्रवृत्त केलें. दिनकरराव आज चित्रव्यवसायांत पुरेपूर गढलेले यशस्वी चित्रकथा–संवाद लेखक आणि दिग्दर्शक आहेत. पण त्यांचा मूळपिंड साहित्यिकाचा आहे. किंबहुना साहित्याच्या आवडीनेंच त्यांना चित्रव्यवसायांत खेंचलें. दिनकररावांची चित्रकारकीर्द जशी मी आरंभापासून पाहिलेली आहे, तशीच त्यांची साहित्यप्रीति हीहि सुरवातीपासून माझ्या परिचयाची आहे. खटकेदार संवाद लिहिण्यांत आज दिनकररावांनीं फार मोठा लौकिक मिळवलेला आहे. पण त्याहिपेक्षां भावनाढ्यपूर्ण ललितकथा लिहिण्यांत त्यांची लेखणी जास्त रंगून गेलेली मला माहीत आहे. त्यांच्या लेखणीचें लालित्य आणि सामर्थ्य दोन्ही माझ्या चांगल्या परिचयाची असल्यामुळेच, चित्रव्यवसायाच्या धंदेवाईक गरजा भागवण्यांत राबणाऱ्या त्यांच्या लेखणीनें वाचकांना त्याहून कांहीं तरी वेगळें, वैशिष्टयपूर्ण असें वाङ्मय द्यावें असें मला सतत वाटे. 'यशवंत' मासिकाचें संपादकत्व माझ्याकडे येतांच दिनकररावांना मीं त्यासाठीं गळ घातली. चित्रपटाच्या व्यापामुळें त्यांना फुरसत मिळत नव्हती, तरीहि स्नेहभावनेमुळें त्यांनीं हीं व्यक्तिचित्रें लिहिण्याचें मनावर घेतलें. या व्यक्तिचित्रांच्या निर्मितीला अशा रीतीनें मी निमित्त झालों असल्यामुळेंच, मला वाटते, दिनकररावांनीं या लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचा मान मला देऊन माझा गौरव केला असावा. आपल्या स्नेह्यांसोबत्यांबद्दल, सहकार्यांबद्दल व स्वकीयांबद्दल दिनकररावांच्या अंतःकरणांत उदंड ओलावा आहे याची साक्ष प्रस्तुत पुस्तकाचें प्रत्येक पान देईल.

'माझे शिल्पकार' या लेखसंग्रहांतील 'तात्या' हें व्यक्तिचित्र दिनकररावांनीं प्रथम लिहिलें. तें 'यशवंत'मध्ये प्रसिद्ध झालें, तेव्हां त्याचें झालेलें सार्वत्रिक कौतुक अजून मला पक्कें स्मरतें. 'तात्या' ही लोभसवाणी व्यक्ति आणि दिनकररावांनीं तिची या लेखांत उतरवलेली शब्दरूप जिवंत छबी यांच्याबद्दल प्रत्येकानें मुक्त कंठानें प्रशंसा केली. दिनकरराव ज्या चित्रपटसृष्टींत गेलीं कैक वर्षें सर्वांच्या प्रत्यक्ष परिचयाचे झालेले आहेत, त्या सृष्टींतील मंडळींनीं — कलावंतांपासून वितरकांपर्यंत वेगवेगळ्या वर्गांतील व्यक्तींनीं—दिनकररावांना मुद्दाम भेटून हा लेख उत्कृष्ट लिहिल्याबद्दल धन्यवाद दिले. तेव्हां दिनकररावांचाहि पुढले लेख लिहिण्याचा हुरूप एकदम वाढला. मुंबईतील वाचकांनीं त्यांची या लेखाबद्दल प्रशंसा केली हें तर कांहींच नव्हे, पण त्यांचें मूळ गांव जें वेनाडी—ज्या गांवाचें सुंदर चित्र त्यांनीं 'तात्या' या व्यक्तिलेखांत जिव्हाळ्यानें रंगवलें आहे— तेथील मंडळींनींहि दिनकररावांची पाठ थोपटली, तेव्हां चित्रपटांतील संवादांना थिएटरांत मिळणाऱ्या आनंदाहून, अशा वाङ्मयकृतीबद्दल मिळणाऱ्या रसिकांच्या प्रशंसेचा आनंद कांहीं निराळाच असतो याचा प्रत्यक्ष अनुभव येऊन दिनकररावांचें लक्ष आपल्या शिल्पकारांचे शब्दचित्रकार होण्यांत जास्तच रंगू लागलें. दिनकररावांचें जीवन–शिल्पकार आणि त्यांचें स्वतःचें लेखनशिल्प जसजसे एकजीव होत गेलें, तसतसे एकाहून एक सरस लेख या मालिकेंत गोंवले जाऊं लागले. व आतां हा दहा पुष्पांचा सुंदर व सुगंधी हारच दिनकररावांनीं श्री सरस्वती देवीला भक्तिभावानें वाहिला आहे.

कांहीं गुण सोन्याचा आणि कांहीं गुण सोनाराचा असा योग जुळूनच सुबक घाटाचा अलंकार घडतो. या व्यक्तीचित्रांनाहि अशा सुबक अलंकाराच घाट येण्याला वर्णित व्यक्तीच्या अंगचें वैशिष्ठ्य आणि दिनकररावांच्या लेखणीचें कौशल्य यांचा संगम झालेला आहे. दिनकररावांचें भाग्य हें कीं, त्यांना जन्मापासूनच भल्या, सद्गुणी, सुंदर आणि कर्तबगार व्यक्तींचा निकट सहवास लाभत गेला. दिनकररावांचे चळवळे, रागीट वडील आणि प्रेमळ, शांत चुलते, या दोघांच्या परस्परविरुद्ध व्यक्ति वैशिष्ट्यांचें परिणाम दिनकररावांचें व्यक्तित्व विकसित होण्याच्या कार्यांत कसे एकवटलेले आहेत, तें

पाहिलें कीं, गंमत वाटते. कोल्हापूरचे दोन पुढारी– श्री. माधवराव बागल आणि श्री. व्ही. टी. पाटील हेहि असेच परस्पर विरुद्ध व्यक्तिमत्वाचे थोर पुरुष आहेत. दोघांचे केवळ व्यक्तिमत्वच नव्हें तर दोघांचें राजकारणहि वेगळें–– नव्हे तर परस्परविरुद्धहि ! पण या दोघांहि उत्तर–दक्षिण ध्रुवांची शक्ति दिनकररावांच्या विकास कार्यांत एकवटलेली दिसते. मा. विनायक आणि भालबा पेंढारकर हे निकटचे नातेवाईक असले, तरी जीवनांत त्यांचें निकटवर्तीत्व फारसें कधीं दिसलें नाहीं. चित्रपटाबावतच्या या दोघांच्या वृत्ती, विचार, नि कर्तृत्व यांतहि साम्यापेक्षां विरोधच जास्त जाणवतो. पण या दोघांहि चंद्र–सूर्याचीं किरणें दिनकररावांच्या व्यक्तिमत्वाच्या घडणी-साठीं सहकार्य करतांना दिसतात. लता मंगेशकर ही जागतिक किर्तीची पार्श्वगायिका, तर 'पुढारी'कार गणपतराव जाधव मुलखाचें प्रसिद्धिविन्मुख ! सगळीं साधनें, आणि मिठ्ठास स्वभाव जवळ असूनहि गणपतरावांइतका पड-द्याआड राहणारा माणूस विरळाच ! लता मंगेशकर एक टोक, तर गणपत-राव जाधव दुसरें टोक ! पण दोघांनाहि दिनकररावांविषयीं सारखाच जिव्हाळा ! या सर्व परस्पर विरुद्ध व्यक्तिवैशिष्टयांच्या मंडळींनीं दिनकर-रावांच्या जीवनांत प्रवेश करून, त्या जीवनाला सौंदर्य आणि समृद्धि यांचा तर लाभ करून दिलाच, पण शिवाय दिनकररावांचें जीवनशिल्प विलोभ-नीय घडवलें.

आपल्या या सर्वच ' शिल्पकाराबद्दल ' दिनकररावांच्या मनांत नितांत आदर आहे. त्यांचीं व्यक्तिचित्रें त्यांनीं आंतरिक जिव्हाळयानें आणि उमा-ळयानें लिहिलेलीं आहेत. त्या त्या व्यक्तीच्या गुणवैशिष्ठयाची ओळख दिनकररावांनीं त्या व्यक्तीच्या जीवनांतील चार दोन ठळक प्रसंगांची थोड-क्यांत पण रेखीवपणें करून दिलेली आहे. दिनकररावांनीं स्वतःच्या दृष्टि-कोनांतून आणि स्वतःच्या वैयक्तिक अनुभवांतूनच त्या त्या व्यक्तीचा परिचय वाचकांना करून दिलेला असला, तरी त्यासाठीं त्यांनीं वेचलेले प्रसंग आणि त्यांची दिनकररावांनीं केलेली भावनाटयात्मक मांडणी यांच्यामुळें, या व्यक्ति-चित्रांचें सौंदर्य वाढलें आहे. दिनकररावांच्या भावनांत जिवंतपणा आहे. तद्वत् त्यांच्या भाषेंत ओघ असल्यामुळें वाचक, धारेला लागलेल्या नावे-

सारखा, दिनकररावांच्या विवरणाबरोबर न कळतच पुढें पुढें खेंचला जातो. दिनकररावांचें हें कांहीं चरित्र नव्हें. मात्र त्यांच्या जीवनांतील व्यक्तिगत उल्लेखांवांचून यांतील एकहि लेख लिहिला गेलेला नाहीं. चित्रपटाच्या भाषेंत बोलावयाचें, तर दिनकररावांच्या जीवन चरित्राचें हें कांहीं 'रशीस्' आहेत असें म्हणतां येईल. पण हे 'रश–प्रिंटस्' पाहूनहि दिनकररावांच्या जीवन-चित्राची आकर्षकता ध्यानीं येणें कठीण नाहीं.

ह्या व्यक्तिचित्रांमध्यें मनमोकळेपणा असल्यामुळें त्यांत मोहकपणा आला आहे. स्थळ वैशिष्ठ्यांचा वेगळेंपणा हाहि या चित्रांना रंगत आणून देण्यास कांहीं प्रमाणांत कारण झालेला आहे. चित्रसृष्टींतील कांहीं व्यव-हाराची कल्पना या लेखसंग्रहावरून येण्यासारखी आहे. पण, या लेखसंग्र-हाचें मला आवडलेलें वैशिष्ठ्य म्हणजे आपल्या शिल्पकारांचीं शब्दचित्रें काढतां काढतां त्यांतूनच दिनकररावांनीं प्रगट केलेलें स्वतःचें व्यक्तिमत्व हें होय. या दहाहि लेखांचें काळजीपूर्वक वाचन करणारास या दहा व्यक्तीं-बरोबरच 'दिनकर द. पाटील' या अकराव्या व्यक्तिचित्राचीहि स्पष्ट मूर्ति दिसूं लागते ! 'माझे शिल्पकार' म्हणून दिनकररावांनीं ज्यांना गौरविलें, त्या थोर मंडळींनीं आपल्या संस्कारांच्या टाकीनें 'दिनकर द. पाटील' या नांवानें ओळखले जाणारे जें जीवनशिल्प महाराष्ट्रांच्या पदरांत टाकलें, तें कसें गुण-पूर्ण आहे, याची जागृत जाणीव या पुस्तकाच्या वाचनानें होते. आपल्या गुरुजनांच्या मूर्ति घडवतां घडवतां दिनकररावांनीं, न कळतच त्या गुरु-जनांनीं घडवलेली शिष्यमूर्तिहि वाचकांसमोर ठेवून, गुरुजनांच्या सफलतेचें असें कलात्मक दृश्य या पुस्तकांत घडवून, एकप्रकारें आपल्या गुरुजनांचें ऋणच कृतज्ञ भावनेनें फेडलेलें आहे असें मला वाटतें.

गोरेगांवकरांची चाळ
क्र. ३, मुंबई ४
१४ । १० । ६२

**र. गो. सरदेसाई**

# १ : विनायकराव

'भक्ति ईश्वराची—सेवा' या ध्येयानें प्रेरित झालेल्या विद्यापीठाचं स्थान कोल्हापूरच्या शिक्षण क्षेत्रांमध्यें स्वयंभू आहे. विशेषतः मी जेव्हां विद्यापीठांत प्रथम पाऊल टाकलं, त्यावेळचं माझं विद्यापीठ तर मी कधींच विसणार नाहीं. वीसपंचवीस वर्षांपूर्वींचा ओझरता जरी विचार माझ्या मनांत आला, तरी माझ्या डोळ्यासमोर दोन मूर्ति नकळत उभ्या राहतात. आपल्या धीरगंभीर वाणीनं ऐकणाराला मंत्रमुग्ध करणारे श्री. तोफखानें मास्तर आणि पाहाणाराला आदरानें विनम्र करणारे ऋषितुल्य दीक्षित मास्तर! या दोघांबरोबर आणखी एका व्यक्तीची विलक्षण छाप माझ्या बाळमनावर तेव्हां पडली होती—आणि ती म्हणजे—पण त्यासाठीं तो अविस्मरणीय प्रसंगच सांगितलेला बरा!

बेनाडीहून—माझ्या जन्मग्रामाहून—मी प्रथमच कोल्हापूरला पदार्पण केलं होतं. सहाजीकच खेड्याच्या वातावरणांतून बाहेर पडल्याबरोबर शहरीं संस्कृतींनं मी भांबावून जाणं अगदीं स्वाभाविक होतं. तशांतच, जेव्हां मी अण्णांच्या—वडिलांच्या हाताला धरून विद्यापीठांत पदक्षेप केला, तेव्हां

तर मी कोणत्या स्वप्न–सृष्टींत तरंगतों आहे, हेंच मला कळेना! कारण शाळा आणि तिची प्रार्थना या संबंधींच्या माझ्या कल्पना अगदीं विलक्षण होत्या. आपल्या मुलाला आईबाप जिथं मारून मुटकून पाठवतात ती शाळा; आणि अशा शाळेंतील मुलांनीं हुंदके देत म्हटलेली ती प्रार्थना, अशी माझी स्वानुभवाची समजूत होती. पण त्या कल्पनेला गोड धक्का देणारे हार्मोनियमचे मधुर स्वर विद्यापीठाच्या परिसरांत घुमत होते, आणि शेंकडों विद्यार्थ्यांच्या स्वरमालेला मार्गदर्शन करणारा एकच एक मधुर आवाज आसमंतात भक्तिरस दरवळत होता, " जय जगदीश हरे ! "

नादलुब्धाप्रमाणें मी हळूंच समोर होऊन पाहिलें ! तो चित्रविचित्र रंगांच्या मुलामुलींच्या घोळक्यांत एक सावळा तरुण प्रसन्न चेहऱ्यानें गात होता. पांढरा शुभ्र नेहरू शर्ट त्याच्या अंगांत होता. खांद्यावर भगवी मफ-लर लवंडली होती; आणि खांद्यापर्यंत रुळणारे त्याचे कुरळे केस सभों-वतालचे चंचल डोळे स्थिरावत होते. प्रार्थना म्हणतांना खरोखरीच त्याचा चेहरा ध्यानस्थासारखा दिसत होता; आणि सस्मित मुखांतून अमृताच्या मधुरतेनं नटलेली स्वरगंगा दुथडी भरून वहात होती. त्यांच्या अशा स्वर्गीय प्रार्थनेनं विद्यापीठाचं ज्ञानसत्र रोज सुरूं होई, त्यांचं नांव–विनायक दामोदर कर्नाटकी–हें मला लगेच कळलं. कारण विद्यापीठांत ते मास्तर होते. आणि शाळेंत शिकवतां शिकवतां कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत ते शिकतहि होते.

मी रोज पहात होतों. विद्यापीठांतच ' प्रभात ' या नांवाचा त्यांचा छोटासा क्लब होता. त्या क्लबमध्यें विनाकराव, श्री. मो. ज्ञा. शहाणे, श्री. गजानन जागिरदार यांसारखे व्यासंगी सदस्य होते; आणि त्यांच्या शैक्ष-णिक आणि कलात्मक जीवनाची विलक्षण छाया साऱ्या विद्यापीठावर पसरलेली असे ! विद्यापीठांतील वर्गांमधील रोजचं शिकवणं असो, विद्यापीठांच कुल-गुरु कै. केळवकर यांचा स्मृतिदिन असो, किंवा गोकुळाष्टमी सारखा

रात्रीचा कार्यक्रम असो—विनायकराव प्रत्येक समारंभांत अकृतिम उत्साहानं भाग घेत आणि साऱ्या विद्यार्थी वृंदांचीं मनं लीलाया आपलीशीं करीत !

तरीहि त्यांचा माझा प्रत्यक्ष असा परिचय झाला तो मी इंग्रजी पांचवीत गेल्यावर. कारण पांचवीपासूनच्याच पुढच्या वर्गाला ते शिकवत आणि शिकवणं ही किती मोहनीय कला आहे, याची प्रचीति त्यांनींच मला दिली. विद्यार्थ्याला ते चुका दाखवून देत; पण कधींहि विद्यार्थ्यांचा मानभंग ते होऊं देत नसत. उदाहरणार्थ, माझीच गोष्ट घ्या ना. इंग्रजीचीं पांच पुस्तकं वाचूनहि माझी ‘ बेनाडी ’ ची ग्रामीण भाषा सुधारली नव्हती. मात्र त्या बद्दल ते कधींच कांहीं स्पष्टपणें बोलले नाहींत—तर आपणच ते ग्रामीण भाषेंत मला ‘ हां–सांगा पाटील. काय शिकलासा– ! ’ यानं मात्र मी शरमिंदा होई आणि आपली भाषा सुधारण्याचा मी मनांतल्या मनांत निश्चय करी ! हा निश्चय ते ओळखत आणि भाषेबरोबरच काव्य नाट्य यांचाहि विद्यार्थ्यांना बोध व्हावा, म्हणून, शालेय पुस्तकापलीकडे ते आम्हाला नेत. पाठ्यपुस्तकांतील कविता, धडे तर समजावून सांगतच; पण त्यांना पोषक असें बाहेरील धडे आणि कविताहि ते आम्हांला तितक्याच रसिकतेनं शिकवत असत. मला आठवतं विद्यापीठांत असतांनाच कवि यशवंत, कै. भा रा. तांबे, गोविंदाग्रज आणि केशवसुत यांच्या किती तरी कविता मला मुखोद्गत होत्या, आणि विनायकरावांनीं त्या अशा कांहीं भावनात्मकतेनं शिकविलेल्या होत्या, कीं त्या त्या कवींचे माझ्या मनावरचे संस्कार अद्यापिहि ताजे आहेत. ते म्हणत, ‘ स्वतः कवि झाल्याशिवाय कविता समजणं शक्य नाहीं. भूतकाळांत जगल्याशिवाय इतिहास समजणं शक्य नाहीं; आणि रोजच्या सामाजिक अथवा राजकीय क्रांतीशीं समरस झाल्याशिवाय नवा इतिहासहि निर्माण करतां येणं शक्य नाहीं. ’ भूतकाळापासून ते भविष्यकालापर्यंतची विनायकांनीं रंगविलेलीं चित्रं इतकीं स्वच्छ आणि

मनोहर असत, कीं तीं पाहून त्यांत रममाण होण्यांतच माझीं दोन वर्षं कशीं हां हां म्हणता निघून गेलीं. विनायकराव आमचं मार्गदर्शन करीत आहेत, हीच एक उर्मि आम्हांला कार्यप्रवण करीत होती आणि त्या उर्मींच्या जोमांतच रोजचा कार्यक्रम करीत, उद्यांचीं रम्य चित्रं आम्ही रंगवीत होतो. तीं चित्रं नित्य नवीं होतीं आणि त्याचे रंग कधीं काळीं फिके होतील, याची गंध वार्ताहि आमच्या गांवीं नव्हती.

पण मी मॅट्रिकच्या वर्गांत असतांना अचानकपणें एक जबरदस्त धक्का आम्हांला बसला! विनायकराव गाणीं म्हणत, शाळा कॉलेजच्या नाटकांतून कामं करीत, हें आम्हांला चिरपरिचित होतं. इतकेंच नव्हे, तर विद्यापीठाच्या मदतीकरता जे कांहीं नाट्यप्रयोग ते करीत, त्यांत विद्यार्थ्यांनींहि यथाशक्ति भाग घ्यावा, असा त्यांचा आग्रह असे. पण त्यावेळीं आम्हाला जी वार्ता समजली ती अत्यंत अशुभ होती—म्हणजे आम्हांला त्यावेळीं तरी ती तशी वाटली! कारण त्यावेळीं पडद्यावरील चित्रं नुकतीच बोलूं लागलीं होतीं, आणि मराठींतील पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा' प्रभात फिल्मकंपनीचे मालक तयार करीत होते. इथपर्यंत सारं ठीक होतं. परंतु आम्हांला लौकरच असंहि सांगण्यांत आलं, कीं दिग्दर्शक व्ही. शांताराम यांनीं विनायकरावांना नट म्हणून बोलावलं असून, त्या करतां विनायकराव विद्यापीठाच्या नोकरींतून कायमचे मुक्त होणार आहेत. त्यावेळीं आम्हां विद्यार्थ्यांना काय वाटलं असेल याची कल्पना तुम्हांला आतां येणार नाहीं परंतु जेव्हां विनायकरावांना निरोप देण्याची सभा आम्ही विद्यापीठांत घेतली, तेव्हां वियोगाच्या कल्पनेनें आम्हीं मुलं तर रडत होतोंच परंतु स्वतः विनायकरावहि दुःखातिशयानं बोलण्याच्या अवस्थेंत नव्हते! नुसत्या अश्रूंच्या धारा त्यांच्या दोन्हीं डोळ्यांतून ओघळत होत्या आणि कितीतरी वेळ सारी सभा निःशब्दच होती. 'अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला' ही कविता विनायकरावांनीं आम्हांला शिकवली होतीच. त्यांतील कृष्णाप्रमाणं आमचं

सांत्वन करीत विनायकराव एवढंच म्हणाले, 'माझ्या मित्रानों, मी तुम्हांला कधींच विसरू शकणार नाहीं. फारतर इतकंच होईल, आजपर्यंत मी तुम्हाला काळ्या फळ्यावर शिकवीत आलों; यापुढं मी तुम्हांला पांढऱ्या पडद्यावर शिकवीन.'

आणि खरोखरीच विनायकराव आम्हांला कधींच विसरले नाहींत. स्टुडिओंत गेले तरी आमच्या वारंवार गांठीभेटी होतच होत्या. उलट शालेय शिक्षणाबरोबर नंतर ते कै. गोविंदराव टेंब्याचं पदकाव्य आम्हांला सांगूं लागले, श्री भालजी पेंढारकर यांच्या लेखणींतील नाट्य ते दाखवूं लागले, आणि बाबुराव पेंढारकरांसारखे नट पडद्यावर पाहण्यापेक्षां प्रत्यक्ष काम करतांना पाहण्यास ते शिकवूं लागले. या गोष्टी पाहतांना त्यावेळीं मला कुतूहलाशिवाय विशेष कांहीं वाटलं नाहीं. कारण शूटिंग पाहणं ही केवळ जबर शिक्षा आहे, हें शूटिंग पाहूनच कळणार आहे. परंतु या शिक्षेनंहि समाधान न पावून कीं काय—अधून मधून उपरी कामंहि ते आम्हाला करायला लावीत आणि पडद्यावरल्या यक्षनगरीच्या पाठीशीं किती कष्ट आणि अभ्यास आहे, याची प्रचीति आणून देत. शाळेशींहि त्यांचा संबंध कधीं दुरावला नाहीं. उलट 'अग्निकंकण आणि माया-मच्छिंद्र' या बोलपटांनीं ते कितींच्या शिखरावर पोहोचले असतांहि शाळेच्या मदतीकरितां त्यांनीं 'आंधळ्याची शाळा' हें नाटक मुद्दाम बसविलें आणि आपल्या कितींचा लाभ शाळेला उपकारक कसा होईल याचीच विवंचना अधिक बाळगली.

अर्थात् नित्य नेमानं डोळ्यासमोर हें उघडं असतां आपणहि कवि व्हावं, लेखक व्हावं, संपादक व्हावं अशीं स्वप्नं मी रोज रंगवित होतों. आणि त्याकरतां विद्यापीठांत असतांनाच एक हस्तलिखित मासिक आम्ही नेमानं चालवित होतों—आणि त्याचं संपादन मी यथाबुद्धि करीत होतों. तरुण प्रेमांत पडला कीं प्रथम तो कवि होतो असं म्हणतात. पण मी संपादकाचा कवि कसा झालों, याची कथा गंमतीदार आहे. काय झालं—वरती

सांगितल्याप्रमाणं ' आंधळ्याची शाळा ' हें नाटक विनायकरावांनीं बसवलं होतं; आणि त्याचे प्रयोग धूमधडाक्यानं करीत आमची नाटक मंडळी बेळगांव, धारवाड, हुबळी या गांवच्या दौऱ्यावर होती. नाटकाला उत्पन्न चिक्कार होत होतं. कारण नाटकापेक्षां विनायकरावांनाच बघायला ' इद नोड विनायक ' म्हणून प्रेक्षक गर्दी करीत होते. विनायकरावानांच बघायला असें मी म्हणतों कारण खरोखरीच ' आंधळ्याची शाळा ' हें नाटक अक्षरशः प्रेक्षकांच्या डोक्यावरून जात होतें आणि प्रेक्षक नाटक चालू असतांच विनायकरावांना गाण्याचा आग्रह करीत होते. त्याचा विनायकरावांना इतका त्रास झाला, कीं अखेर त्यांनीं प्रेक्षकांना हात जोडून सांगितलं कीं ' मी तुम्हांला गाणीं म्हणून दाखवीन पण एका अटीवर ! एकेक अंक आपण शांतपणें पहाल, तर प्रत्येक अंकानंतर मी तुम्हाला दोन गाणीं म्हणून दाखवीन. ' झालें–प्रेक्षक एकदम खूष ! हुबळीला सिनेमा आणि नाटक यांची समोरासमोर थिएटरें आहेत–मजा म्हणजे, दोन्ही थिएटरांत एकदमच ' मायामच्छिंद्रा ' मधील गोरखनाथाचीं पदें ऐकायला येऊं लागलीं ! अशा रीतीनं त्या दिवशींची–म्हणजे रात्रींची–वेळ निभावली–पण सकाळीं उठल्याबरोबर विनायकराव मला म्हणाले, ' दिनकर, उद्यांपासून आपण संगीत नाटक करूं या '

' तें कसं काय ? ' वसंत देसाईनीं ( राजकमलचे संगीत दिग्दर्शक ) आश्चर्यानं विचारलं. वाचकांनाहि आश्चर्य वाटेल, कीं वसंत देसाई मध्येंच कुठनं आले ? पण माझ्यावर विश्वास ठेवा, वसंत देसाई या नाटकांत सुशीलेची करुणरम्य भूमिका करीत असत. विनायकराव त्यांना म्हणाले, ' वसंत, ' सैरंध्री ' च्या चाली आपल्या बसलेल्याच आहेत ! त्या चालीवर दिनकर, एका बैठकींत तूं आठ गाणीं लिहून दे म्हणजे झालं ! '

या आज्ञेप्रमाणं लगेच तें नाटक संगीत झालं आणि मी कवि झालों ! मग मात्र मी मोकाट सुटलों—कवितेच्या नादानं मी लेखणी हातांत घेतली

ती जॉर्ज वॉशिंग्टन प्रमाणं साहित्याच्या हरेक शाखेवर चालवीत सुटलों! कॉलेजांत मी लेखक म्हणून वावरूं लागलों आणि याच सुमारास 'किर्लोस्कर' मासिकाच्या कथास्पर्धेत माझ्या 'एरिना' या लघुकथेला पहिलें बक्षिस मिळालें ना ? कोल्हापुरांत मी साहित्यिक म्हणूनहि मिरवूं लागलों !

आणि वि. वा. पत्की, सी. गो. सरदेसाई, द. ना. देशपांडे, शि. आ. स्वामी यांच्या बरोबरीनं जेव्हां 'दि. द. पाटील' हें नांवहि घेतलं जाऊं लागलं, तेव्हां मला केवढा अभिमान वाटला. त्याच लेखक मित्रांच्या सहकार्यानें 'शारदा मंडळ' या नांवाची एक साहित्य-संस्थाहि आम्ही स्थापन केली, आणि कोल्हापूरच्या साहित्यक्षेत्रांत तत्कालीन ज्या कथास्पर्धा, निबंध स्पर्धा किंवा वक्तृत्वाच्या चढाओढी सुरू झाल्या, त्यांत माननीय परीक्षक म्हणूनहि माझी निवड होऊं लागली.

त्यावेळीं मी 'बी. ए.' च्या वर्गात होतों. विनायकरावांच्याच घरीं राहून आमचा अभ्यास चालू होता. कारण विनायकरावांचं आमच्या अभ्यासक्रमावर बारीक लक्ष होतं, पण जेव्हां मला त्यांनीं अभ्यासाबाहेरील अनपेक्षित प्रश्न विचारला, तेव्हां मी गोंधळलों ! तो प्रश्न साधा नव्हता. मोठा साळसूदपणाचा आव आणून त्यांनीं मला विचारलं होतं, परवांच्या वक्तृत्व स्पर्धेत पहिली आलेली मुलगी तुझ्या माहितीची आहे कां रे ?'

'नाहीं. पण माझ्या बहिणीच्या वर्गात आहे म्हणे ! ' पिंजऱ्यांतील आरोपीच्या दक्षतेनं मी उत्तर देऊं लागलों.

'म्हणून मुद्दाम नंबर आणलास ?'

'छे छे-- इतर परीक्षकांना विचारा ना.'

'तुझ्यावर विश्वास आहे माझा. पण तेवढ्या ओळखीवर तुम्ही रोज भेटतां म्हणे ?'

कांहींतरी बोलायचं म्हणून मी बोललों, 'दिसणं म्हणजे भेटणं असेल तर भेटतों आम्ही-'

'असं असं असं!' विनायकराव हंसले, 'म्हणजे एकमेकांना बघता नुसतं!'

असं म्हणून ते उठले आणि 'चल फिरून येऊं' म्हणून गाडी बाहेर काढली त्यांनीं.

रात्रीची वेळ होती. निरभ्र आकाशांत चंद्र एकटाच फिरत होता. त्याप्रमाणें आमची मोटार उगीचच राजारामपुरींत इकडे तिकडे फिरली आणि वृक्षांनीं आच्छादलेल्या एका बैठ्या घरा समोर थांबली. हॉर्न वाजवूनहि दार उघडलें नाहीं–तेव्हां विनायकरावच म्हणाले, 'सुमन.'

गोलघुमटांत एक आवाज सात वेळां घुमतों ना? तस्सं माझ्या काळजांत झालं! मी तिला रोज बघत होतों, म्हणजे प्रेम करीत होतों थोडंच? पण हा विचार पूर्ण व्हायच्या आंतच एक मुलगी बाहेर आली–विनायकराव एकटेच तिच्याशीं बोललें. कारण, ती कांहींच बोलत नव्हती. मीहि बोलत नव्हतों. आम्हीं बघून मात्र घेतलं पोटभर–असो, या विचारांत मी दोन दिवस घालवले मात्र. प्रेमाचं सुख लोकांना बघवत नाहीं हेंच खरं! आम्ही उभयतां लग्न करणार अशी आवई गांवभर उठली आणि माझे मामा रावसाहेब व्ही. टी. पाटील यांच्या कानावरहि ती गेली! ते माझे कान धरतील अशी मला भीति वाटली–पण जेव्हां त्यांनीं मला बोलावून घेतलं आणि सांगितलं कीं, 'ग्रॅज्युएट झाल्याशिवाय लग्नाच्या भानगडींत तूं पडूं नकोस!' तेव्हां मला अस्मान ठेंगणं झालं. कारण, विनायकरावांनींहि हाच सल्ला दिला आणि बी. ए. चा निकाल लागतांच एके दिवशीं दोन्हीचे चार हात झाले माझे!!

येथपर्यंत सारं ठीक होतं. आमच्या प्रेमकथेचा शेवट सुखद झाला–पण आयुष्याची कादंबरी नुकतीच सुरूं झाली, हें माझ्या लक्षांत आलं! पोटासाठीं कांहीं ना कांहीं व्यवसाय शोधणं भाग होत. शिक्षक, संपादक, कारकून यांचीं संसारचित्रं मी रंगवूं लागलों, तेव्हां विनायकरावच

म्हणाले, 'त्यापेक्षां आमच्या कंपनींत कां रहात नाहींस तूं? मास्तराइतका पगार मी देऊं शकेन,'

याच वेळीं 'नवयुग चित्रपट संस्था' नुकतीच स्थापन झाली होती आणि 'सरकारी पाहुणे' या चित्राच्या निर्मितीकरतां पुण्याला स्वतःच्या स्टुडिओंत ती हलणार होती. तिच्या बरोबर मीहि पुण्याला आलों आणि व्यवसाय म्हणून चित्रपट निर्मितीकडे मी जवळून बघूं लागलों. या अवधींत चित्राची जाहिरात करणं, संवाद लिहिणं; सिनेरिओ लिहिणं-याचा अभ्यास मला करतां आला आणि लौकरच विनायकरावांचा मी पहिला सहाय्यक बनलों. खरंच, शिकणाराला विनायकरावांपासून खूपच शिकण्याजोगं होतं. कारण, हरेक बाबतींत ते सल्ला मसलतींत विचार घेत आणि आपल्या तरल कल्पना शक्तीनं ते बारीकसारीक प्रसंगहि असे कांहीं खुलतीत, कीं क्षणभर माणूस गुंग होऊन जाई !

पण याला काळवेळ नसे. सकाळीं चहा पितांना, दुपारीं जेवतांना, रात्रीं झोपतांना, चोवीस तास त्यांच्या डोक्यांत कथेचा विचार घोळत असे. अतिशयोक्ति नाहीं, पण एकेकदां रात्रीं दोन दोन वाजतां त्यांनीं मला झोंपे-तून उठवलं आहे. आणि 'दिनकर, दामुअण्णांचा तो प्रसंग मला अशा तऱ्हेनें लिहून दाखव बघूं' म्हणून रात्रीं अपरात्रींहि लिहायला बसवलं आहे. कथेंतील न सुटणारे कित्येक पेंचप्रसंग त्यांना स्वप्नांत सुटले आहेत, हें कोणाला सांगून खरं वाटणार नाहीं. पण सत्य हें स्वप्नांपेक्षांहि विचित्र असतं, याचा अनुभव आपण कधीं कधीं घेतोंच कीं नाहीं? माझी तर त्यांना इतकी संवय झाली होती कीं कधीं कधीं ते मला म्हणतहि, 'खोटं नाहीं—पूर्वीं मी स्वतःच सारं लिहित असे—पण तूं आल्यापासून आळशी झालोंय मी !'

या उद्गारांत स्वतःवरल्या नाराजी पेक्षां माझ्यावरला विश्वासच अधिक नव्हता कां? याच विश्वासानं एक प्रसंग मी माझ्यावर ओढवून

घेतला होता, तो मी कधींच विसरणार नाहीं. काय झालं—आमच्या ' प्रफुल्ल ' कंपनीचा मुंबईत प्रथमच वाढदिवस साजरा होत होता. आणि त्या निमित्त-पाहुणे मंडळी जमली असतां विनायकरावांनीं सर्वांना ' आपल्याबद्दलच्या अपेक्षा ' लिहून कळवायला सांगितलं. अनेकांनीं अनेक अपेक्षा व्यक्त केल्या. विनायकरावांनीं त्या अपेक्षा पूर्ण करण्याचीं आश्वासनंहि जाहीर केलीं. मी-मात्र एका चिठ्ठींत लिहून विचारलं होतं—

' आमची पगार वाढीची अपेक्षा पूर्ण होईल काय ? '

माझं नांव पाहून मोठ्या आनंदानं ती चिठ्ठी त्यांनीं उघडली—पण ती भरसभेंत वाचायला लागल्यामुळें असेल, विनायकराव एकदम स्तब्ध झाले ! रागानं लालेलाल होऊन ती चिठ्ठी ते खिशांत कोंबीत म्हणाले, ' मी नांव सांगत नाहीं. पण माझ्या जवळच्या माणसानं मला विचारलं आहे आमचा पगार वाढेल काय ? प्रश्न कांहीं वाईट नाहीं. परंतु त्याला माझं उत्तर आहे. पगार कोणी सांगून वाढवीत नाहीं. तो वाढवून घेण्याची पात्रता अंगीं असली पाहिजे ! '

टाळ्यांचा कडकडाट करीत सर्वांचे डोळे माझ्यावर रोखले. त्या रात्रीं मला झोंप लागली नाहीं. सकाळीं मी लौकरच उठलों. विनायकराव झोंपले होते. त्यांच्या उशीखालीं मी हळूंच एक पत्र ठेवलं आणि मी कोल्हा-पूरचा रस्ता सुधारला ! मी अधिक लिहिलं नव्हतं—फक्त त्यांचा निरोप घेतला होता—तो असा—' मीं अपात्र असेन तर आपली नोकरी करण्याचीं माझी इच्छा नाहीं. त्यापेक्षां मी कारकून झालों तरी पर्वा नाहीं—आपला आशीर्वाद मात्र असावा ! '

मी कोल्हापूरला आलों खरा. मी कां आलों, हें कोणालाच बोललों नाहीं. मात्र रोज टपालाची वाट पहात होतों. शेवटीं तिसऱ्या दिवशीं विना-यकरावांचं भलंमोठं पत्र आलं, त्यांत त्यांनीं लिहिलं होतं—' जाणाऱ्या माणसाला परत ये, असं मीं कधींच म्हटलं नाहीं. परंतु तुला मात्र मी प्रथ-

मच म्हणतो कीं, दिनकर, परत ये ! तुला मी शाठाचा दोनशें रुपये पगार करतों. आणि त्यानंतर देवानं स्थिति दिली तर अवश्य वाढवीन.'

हें पत्र वाचतांना मी वेड्यासारखा रडलों ! आज्ञाधारकपणें मी हजर झालों. पण झाल्या गोष्टीचा मागमूसहि विनायकरावांनीं कधीं दाखवला नाहीं. उलट जेव्हां मीं मंगलचित्राकरतां 'जय मल्हार' ही कथा लिहिली आणि–निर्माते वामनराव कुलकर्णी व चव्हाण यांनीं मीच ती दिग्दर्शित करावी अशी इच्छा दर्शविली तेव्हां विनायकराव त्यांच्यावर केवढे भडकले ! व म्हणाले, 'दिनकरला मी लेखक केला आहे. त्याला दिग्दर्शक करण्याची माझ्यांत ताकद आहे.'

विनायकरावांचे हे उद्‌गार केवढे अर्थपूर्ण होते ! कारण त्यावेळीं 'मंदिर' हें चित्र चालू होतं. आणि अधूनमधून छळणाऱ्या आजाराशीं झुंजत ते काम करीत होते. अशाच एके दिवशीं शूटिंगकरतां मी पूजेची तयारी केली आणि सेटवर विनायकरावांची वाट बघत बसलों. विनायकराव आले मात्र–त्यांनीं सेटवर नजर टाकली–पूजेची तयारी त्यांना आवडली नाहीं असें दिसलें. ते म्हणाले 'दिनकर, सिनेमांतली कां असेना–पण देवाची पूजा मनापासून करावी.' येवढं म्हणूनच ते थांबले नाहींत. तर स्वतः तें देवघर त्यांनीं शेणकाल्यानं सारवलं आणि त्यांच्या अंगांत एकदम ताप भरला–म्हणून ते घरीं गेले—

देवाची सेवा केल्यानंतर कलेची सेवा त्यांच्या नशिबीं नसावी. विनायकराव पुनः कामावर आलेच नाहींत. सारा देश स्वतंत्र झाल्याचा आनंद लुटीत होता. आकाशांत रंगी बेरंगी रोषणाई झळकत होती, अर्थात विनायकरावांनाही स्वातंत्र्याचा एवढा हर्ष आणि अभिमान वाटत होता कीं उठवत नसतांहि पंधरा ऑगस्टची दिवाळी सर्वांना साजरी करायला लावली आणि रात्रीं बरोबर बारा वाजतां गॅलरींत जाऊन त्यांनीं ती डोळे भरून पाहिली ! त्या रात्रीं झोपतांना ते येवढेंच म्हणाले, 'आज गांधी नेहरूंना किती

आहे ! या न्यायानं माझा रोजचा दिनक्रम ठरलेला होता. कंपनींत प्रवेश केला रे केला; आपल्या ऑफिसांत सरळ जायचं, टेबलावरलीं ताजीं दैनिकं चाळायचीं आणि त्यांत छापून आलेल्या कंपनीच्या जाहिराती तपासून उद्यांच्या नव्या जाहिराती लिहायला बसायचं ! माझा तेव्हांचा उत्साह एवढा विलक्षण होता, कीं साप्ताहिक तर सोडाच, परंतु रोजच्या दैनिकांत सुद्धां जाहिरातींची पुनरुक्ति होता कामा नये या ईर्षेनं मी नवीं शीर्षकं देऊन चित्रांच्या जाहिराती सजवीत होतों. अर्थात् इतर कोणाच्या नसली तरी विनायकरावांच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाहीं. आणि म्हणूनच त्यांचा इतका लोभ माझ्यावर जडला कीं आपल्या हरेक कार्यक्रमांत ते मला बोलवत आणि नाहीं नाहीं म्हणतां चित्र निर्मितीच्या विविध शाखांवर रोज आमच्या गप्पा गोष्टी होत.

त्या दिवशीं सुद्धां मीं असाच कांहीं करीत बसलों असतांना विनायकराव आपल्या ऑफिसमधून बाहेर पडतां पडतां सहज माझ्या खोलींत डोकावले आणि म्हणाले, ‘ येणार कां रे ? ’

‘ कुठं ? मीं विचारलं. ’

‘ चल गाणं ऐकायला. ’

तसा मी गाण्याचा भोक्ता नाहीं. आज सुद्धां मी चित्रपटांत गाणीं घालतों तें प्रेक्षकांची आवड म्हणून ! पण दुसऱ्यांच्या आवडीला मान देण्यांत-सुद्धां एक प्रकारचा आनंद असतोच कीं ! विनायकरावांनीं बोलावलं म्हणून मीं बाहेर पडलों आणि त्यांच्या बरोबर स्टुडिओंत हजर झालों. पाहतों तों ‘ सरकारी पाहुणे ’ करतां उभारलेल्या महालाच्या सेटवर मध्यैंच एका उंचासनावर एक चिमुरडी पोर बसली असून, तिच्या भोंवतालीं वर्तुळाकार मांडलेल्या खुर्च्यांवर कंपनींतील मंडळीच कुतूहलानं बसलीं होतीं; त्यांत संगीत विभागाचे लोक प्रामुख्यानें दिसत होते. विनायकरावांनीं त्या चिमखड्या मुलीकडे कौतुकानं पाहिलं आणि मायेनं थोपटींत म्हटलं, ‘ नांव

सांगणार तुझं ?'

त्या इवल्याशा मुलीनं बावरून सभोंवार पाहिलं आणि अंगात धिटाई एकवटून म्हटल्यासारखं म्हटलं, 'लता!'

'छान! गाणं ऐकवणार एक ?'

'हो!' म्हणून चिमण्या लतानं सभोंवार नजर टाकली आणि आघाडीचा खेळाडू नव्या चेंडूशीं आपल्याला खेळायचं आहे, या जाणिवेनं क्षेत्ररक्षाचा अंदाज घेऊन खेळायला सुरवात करतो त्या आत्मविश्वासानं लतानं गायला सुरवात केली. तिच्या कंठांतून आरोहावरोहाचे स्वर बाहेर पडूं लागले मात्र मिनिटांत सारं वातावरण शांत झालं! प्रशांत जलाशयावर उठणारीं वर्तुळं विस्तार पावावींत त्याप्रमाणं लताच्या स्वरलहरींनीं सारा स्टुडिओ भरून गेला, आणि नंदादीपाच्या प्रकाशानं सारं मंदिर उजळून निघावं या त्याप्रमाणं लताच्या मधुर स्वरालापांनीं त्या चित्रमंदिराला एक वेगळंच वैभव प्राप्त झाल्यासारखं वाटलं. लतानं कोणता राग म्हटला, तो कसा आळवला, हें जरी मला संगीताच्या परिभाषेंत सांगतां आलं नाहीं, तरी येवढं खरं बहरलेल्या उद्यानांत गेल्यावर, फुलवेड्या स्त्रियांनीं वेडावून जावं–तशी सर्वांची अवस्था झाली! विनायकराव तर मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणं दिसले. गाणं संपतांच मीं पाहिलं, त्यांच्या डोळ्यांत अश्रुबिंदु तरळत होते. ते आनंदाचे–कौतुकाचे अश्रुबिंदु टिपून लताची पाठ थोपटीत ते म्हणाले,

'शाब्बास!'

आणि असं म्हणून केवढ्या कौतुकानं त्यांनीं लताला जवळ घेतलं! वात्सल्याचें हें चित्र पाहात, मीं अधीरतेनं विचारलं, 'कोण हो ही ?'

'परवां दीनानाथ वारले ना ? त्यांची मुलगी!'

त्याबरोबर मात्र काळजांत एकदम चर्रर्र झालं माझ्या! तडा गेलेल्या आरशांत प्रतिबिंब दिसतं ना तसं माझ्या आनंदाचं झालं! कारण दीडदोन महिन्यापूर्वींच दीनानाथ वारले होते. रंगभूमीवरला संगीतसूर्य माव-

ळला होता. तसा माझा नटाशीं फारसा परिचय नव्हता. परंतु दीनानाथांची कांहीं नाटकं मीं पाहिलीं होतीं; आणि नाटकांचा विषय निघाला कीं कला-गुणाची चर्चा करतां करतां विनायकराव त्यांच्या गाण्यावर आले कीं म्हणत 'दीनानाथ नुसते गायक नाहींत; ते जादुगार गायक आहेत. इतर गायक श्रोत्यांना नुसतं तल्लीन करतात, परंतु दीनानाथ तल्लीन करतां करतां केव्हां चकित करून सोडतील याचा नेम नाहीं. खरंच ज्याला काळीज आहे त्याला प्रेमच करावंसं वाटणार त्यांच्यावर!'

जगाला इतकं वेड लावणारी कला दीनानाथांच्या अपमृत्यूनं नाहींशी व्हावी, या विचारानं रसिक हळहळत असतांनाच, त्यांच्याच कन्यकेच्या तोंडून बापाची आठवण करून देणारे सूर निघावेत, हें पाहून विनायक-रावांना केवढा आनंद झाला. संगीत शास्त्राच्या परिभाषेंत तिच्या गाण्याचं वर्णन कसं करायचं ते शास्त्रज्ञ करतीलच—परंतु मी मात्र मनाशीं पुटपुटलों, 'खरंच, अमृताची मधुरता आणि विजेची तरळता एकत्र मिसळून परमे-श्वरानं लताचा आवाज निर्माण केला असावा. त्याशिवाय वडलांच्या नुसत्या अनुकरणानंच लताच्या कंठांतून संगीतानं साकार होऊन बाहेर पडणं कसं शक्य आहे?'

लताचं आजचं वैभव आणि कीर्ति बघून मी हें लिहितों आहें असं कोणाला वाटेल! परंतु माझा नाइलाज आहे. तेव्हांचे तिचे स्वर ऐकूनच जाणकारांनीं बोलून दाखवलेलं मी कधींच विसरणार नाहीं. कीं दीनानाथ गेले तरी आपला वारसा मागं ठेवून जायला ते विसरले नाहींत, हें केवढं मोठं भाग्य!! आतां— लताच्या गाण्याला तेव्हां अभ्यासाची आवश्य-कता भासत असेल, मार्गदर्शनाची जरूरी असेल, अशाच आणखी कांहीं उणीवा असल्या, तरी अग्निदिव्यानं उजळून येणाऱ्या सुवर्णाचे कण तिच्या कलागुणांत होते, कितीहि घांसून काढलं तरी सुगंधच ओकणाऱ्या चंद-नाची मधुरता तिच्या कंठांत होती.

विनायकरावांनीं हें ओळखलं होतं. आणि म्हणूनच, क्षणाचाहि विलंब न लावतां त्यांनीं लतास आपल्या कंपनींत ठेवून घेतलं. आणि तिच्या कलागुणांना वाव देण्यासाठीं अनेक संधि त्यांनीं निर्माण केल्या. त्यांना ठाऊक होतं कीं, लताचा आवाज कितीहि कसबी असला तरी तिला 'गुरुदीक्षेची' गरज आहे. म्हणून मोठमोठ्या खानदानी गवयांचा गंडा बांधून तिच्या गायनाच्या शिक्षणाचीहि त्यांनीं सोय केली. तिची प्रगति आजमाविण्यासाठीं चित्रपटांतून तर तिला गायला लावलंच परंतु कंपनीचा वाढदिवस, नाट्य महोत्सव, किंवा सार्वजनिक मदतीचे कांहीं कार्यक्रम असोत लताच्या गाण्यांनीं ते समृद्ध करून दाखवले जात. याची इतकी संवय झाली होती आम्हांला कीं कोणत्याहि कार्यक्रमाची आखणी करायची झाली, कीं मी विनायकरावांना म्हणे 'दोन तासांचा करा, नाहींतर दहा तासांचा करा आपल्याकडे 'साऊंड' भरपूर आहे. फक्त पिक्चरचीच पंचाईत आहे.' लताला ही सिनेमाची परिभाषा आवडे आणि मोठ्यानं हंसून मग आमची चर्चा चहा चिवड्याच्या कार्यक्रमानें संपत असे.

आजकाल लताच्या गाण्याशिवाय एक चित्रं निघूं शकत नाहीं, अशी परिस्थिति आहे. वास्तविक, सिनेमाच्या धंद्यांत प्रत्येकाचे दिवस असतात सुरवातीला दिग्दर्शकांचे दिवस होते; मध्यंतरी नटनटींचे आले, त्याच चालीवर आजकाल संगीताचे म्हणजेच लताचे दिवस आहेत असं म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. परंतु हे दिवस लताला केवळ काळाच्या माहात्म्यामुळें आहेत असं मात्र म्हणतां येणार नाहीं. उलट मला आठवतं, विनायकराव जेव्हां लताच्या गाण्याचा आग्रह धरीत, जेव्हां आज तिच्या दारांत पाळीला बसणारे कित्येक निर्माते लताचं फाजील कौतुक चाललंय् असा आरोप करीत. कांहीं असो, आपलं कौतुक फाजील किंवा अस्थानीं नसून तें सत्पात्री होतं; हें लतेनं आज दाखवून दिलं आहे. आणि जेव्हां या स्थित्यंतराचा आढावा मी घेतों, तेव्हां मला वाटतं; कीं या यशाला

लताचे श्रमच बहुतांशीं कारण आहेत. असं म्हणतांना मी तिला संधि देणा-रांचा किंवा गुरुस्थानीं असलेल्या शिक्षकांचा अवमान करतो आहें, असं मात्र कृपा करून समजूं नका. त्यांचं योग्य तें स्थान मान्य करूनहि लता-संबंधीं एकदां महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक निवृत्तीबुवा सरनाईक यांच्याशीं बोलतांना मी म्हणालों होतों ' लता मोठी झाली याला कारण आहे. अमानतखां सारखें शिक्षक तिला लाभले.

निवृत्तिबुवा हंसले आणि म्हणाले, ' खरं सांगू, लता मोठी झाली कारण मोठी होण्यासाठींच ती जन्माला आली आहे. शिकविण्याला मी निमित्त समजतों. कारण असं पहा. अमीनतखॉंनीं अर्ध्या मुंबईला शिकवलं असेल! मग कितीशा लता मुंबईला जन्माला आल्या ? '

हे उद्‌गार निवृतिबुवांचे आहेत म्हणूनच ठीक आहे. कारण निवृत्तीबुवांनीं गुरूचं महत्व वाटत नाहीं, असं त्यांचा शत्रूहि म्हणणार नाहीं. परंतु आडांत असल्याखेरीज पोहऱ्यांत येत नाहीं अशी म्हण आहे ना! लताच्या रोमारोमांत संगीत भिनलं आहे, हें मी रोज पहात होतों. कारण मी व लता विनायकरावांच्या घरींच कित्येक दिवस एकत्र रहात होतों. आणि तेव्हां मी बघत होतों, कीं लता संगीताशीं अगदीं तादात्म्य पावून जगते आहे. कोणाचं गाणं होवो, लतानं त्याबरहुकूम गाणं म्हटलंच; नवं रेकॉर्ड दिसो—तें झिजे पर्यंत लतानं तें ग्रामोफोनवर फिरवलंच; कांहीं नाहींच मिळालं तर घरांत रेडिओ होताच. रेडिओचं बटन तिनं दाबलंच. इतरांना त्रास होऊं नये म्हणून अगदीं बारीक आवाज करून कां असेना, चहा पिणं असो, वेणीफणी करणं असो, किंवा ' गुरुजी—वाङमय ' असो—लताचे कान आपले रेडिओला लागलेलेच ! ! यावर पुष्कळदां मीं चिडेसुद्धां—कारण गाणं म्हटलं कीं माझं डोकं उठतं—तेव्हां लता शांतपणें म्हणे—' तुमच्या लिहिण्यावाचण्याआड मी येतें कां ? मग माझ्या रेडिओच्या आड कोणीं येऊं नका ! ' रेडिओचं हें व्यसन तिला तेव्हांच होतं असं नव्हे;

अजूनहि आपल्या घरीं रेडिओसमोर बसलेलीच मला ती दिसते. तेव्हां मात्र मी तिला म्हणालों— ' खरंच लता तुझ्या आयुष्याचा चित्रपट उद्यां कोणी काढला, तर त्याला रेडिओचंच पार्श्वसंगीत ठेवावं, नाहीं ? '

मी नुसतं थट्टेनंच म्हणतों असं नाहीं. तर तें एक सत्य आहे. फुलपांखरूं जसं फुलांफुलांमधून मध गोळा करतं ना ? त्याप्रमाणं लता संगीताकरतां मधुगंध कुठं शोधील याचा नेम नाहीं. कंपनीचे संगीत दिग्दर्शक गायक तर तिचे जानी दोस्त होतेच; परंतु पाहुणे गायकहि ती क्षणांत आपलेसे करी आणि त्यांच्यामध्यें मग रागरागिणींची देवघेव सुरूं होई. कोणतीहि कला केवळ शाब्दिक चर्चेपेक्षां प्रत्यक्ष्यानंच अधिक आत्मसात होते, हा तिचा सिद्धांत होता. आणि या श्रद्धेनं ती आपलं बाळजीवन जगत होती. मला आठवतं, मराठी गीतांच्या तालमी सुरूं झाल्या कीं विनायकरावांचे शब्द ती केवळ्या श्रद्धेनं श्रवण करी ! विनायकराव तिला म्हणाले कीं ' जसा स्वरांना अर्थ असतो, वातावरण असतं तसा शब्दांनाहि अर्थ आणि भावना असतात. तो अर्थ आणि ती भावना प्रकर्षानं व्यक्त करणें हें स्वरांचं खरं कार्य आहे. नुसती गळ्याची कसरत म्हणजे संगीत नव्हे; तर विविध छटाहि संगीतामधून प्रकट झाल्या पाहिजेत. '

विनायकरावांच्या या मार्गदर्शनाचा तिच्यावर नकळत कां होईना इतका विलक्षण परिणाम झाला आहे, कीं, पडद्यावरील गाणीं सोडाच; ग्रामोफोनच्या तबकड्यांमधूनसुद्धां भावनांचे केवढे विलोभनीय विलास ती प्रगट करूं शकते, याची साक्ष तिची,

' गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां ? जा मुली जा, दिल्या घरीं तूं सुखी रहा ! '

ही ध्वनिमुद्रिकासुद्धां देऊ शकेल ! गातांना लता किती भावनावश होते, हें सांगतांना वसंत प्रभु म्हणाल्याचं मी कधींच विसरणार नाहीं.

' कल्पवृक्ष कन्येसाठीं लावुनिया बाबा गेला नवरसगंधें बहरुनि

आला याल कांहो बघायला ? ' हें पद गातांना लता वडलांच्या स्मृतिपूजेनं इतकी भांबावून गेली होती, कीं गाणं संपेपर्यंत तिच्या डोळ्यांमधून अश्रु-पुष्पें ओघळत होतीं. हें गाणं पुनः घेऊं या कां, म्हणून वसंत प्रभूंनीं तिला विचारलं, तेव्हां एकांतीं धांवत जाऊन, आपलं तोंड दोन्हीं तळहातांनीं लपवून ती म्हणाली, ' मी गाऊं शकणार नाहीं. मी रडेन, तोंड उघडलं तर— '

गातांना लताच्या भावना किती जिवंत होतात याचं हें उत्कृष्ट उदाहरण आहे. नुसत्या मराठीच नव्हे, तर हिंदीमधूनहि हें शब्दलालित्य आपणांस प्रगट करतां यावं म्हणून ती केव्हांपासून परिश्रम करीत होती. त्यादृष्टीनं नूरजहान ही तिची आवडती गायिका असून, मला आठवतं, ' बडी माँ ' या चित्राच्या वेळीं जेव्हां दोघी एकत्र आल्या, त्यावेळीं दोघींहि एकमेकींच्या कलांची देवघेव करीत ती पाहण्यासारखी असे. मराठी गाणीं नूरजहान ज्या उत्सुकतेनं ऐके, त्याच उत्सुकतेनें लताहि तिचीं उर्दू गाणीं अभ्यासपूर्वक आत्मसात करी ! लताला गुरुस्थानीं कोण आहे, याची चौकशी मीं कधींच केली नाहीं. परंतु नूरजहान ही लताची आवडती गायिका आहे, असं विधान मी केल्यास लता त्याचा इन्कार करील असं मला वाटत नाहीं. लताचा हा हरहुन्नरीपणा पाहून स्वतः नूरजहानच एकदां म्हणाल्याचं मला स्मरतं– ' लता बडी होशियार लडकी है, एक दिन वह अपना नाम जरूर रोशन करेगी ! '

नूरजहानचे हे बोल आज अक्षरशः खरे झाले आहेत. विनायकरावांनीं उराशीं बाळगलेलं स्वप्न साकार झालं आहे. कै. दीनानाथ यांची कला चिरंजीव ठरली आहे. मात्र ही गोष्ट एका रात्रींत चमत्कारानें घडून आलेली नाहीं, हें लक्षांत ठेवण्याजोगं आहे. उलट दीनानाथांच्या पाठोपाठ जेव्हां विनायकरावांचाही अकाली अपमृत्यु घडून आला तेव्हां दम धरून बसलेले दुर्दिन पुनः तिच्या वांट्याला आले. आणि सिनेमासारख्या

बेभरंवशाच्या धंद्यांत गुणांना किंमत मिळेलच असं नाहीं, हा कटु अनुभव कांहीं काळ तिनं घेतला सुद्धां !

पण वाईटांतून कधीं कधीं चांगलंहि जन्माला येतें. मधल्या आमच्या अज्ञातवासांत एकच गोष्ट आमच्या दृष्टीनें ठीक झाली म्हणायची आणि ती म्हणजे लता आणि आम्हीं खऱ्या अर्थानं जवळ आलों. सुखाच्या दिवसांत सारेच दोस्त असतात; परंतु दुःखाच्या वेळींच त्यांची खरी पारख होते. अशा आणीबाणीच्या वेळीं लतानं मला अनेकदां धीर दिला आहे, हें मला कृतज्ञतापूर्वक कबूल केलं पाहिजे. नुसत्या ' शब्दानं ' नव्हे–तर ' अर्थानं ' सुद्धां ! ! कारण, लता त्यावेळीं नुकतीच पार्श्वगायिका म्हणून चमकूं लागली होती; आणि ' मजबूर ' या चित्रपटानं आपला रौप्यमहोत्सव साजरा करतांच, मला वाटतं, लताच्याहि जीवनांत महोत्सवाची सुरवात होऊं लागली. दीडदोन वर्षांतच लतानं कीर्तीचं शिखर गांठलं आणि कीर्तीबरोबर वैभवसुद्धां तिच्याकडे आपणहून चालत आलं ! याला प्रमुख कारण म्हणजे लतासारखी विविध ढंगानं आणि सहजतेनं गाणारी दुसरी गायिका नाहीं, हेंच होय !

परवां पुण्यतिथीच्या निमित्तानं तिच्या वडलांच्यासंबंधीं लिहितांना एक उद्‌गार माझ्या वाचनांत आले. लताला ते म्हणाले होते म्हणे ' ज्याच्या गळ्यांत गांधार खेळतो, त्याच्या पायांशीं लक्ष्मी लोळण घेते. माझ्या गळ्यांत तो नाहीं–तुझ्या गळ्यांत मात्र आहे. तो सांभाळ ! '

लतानं तो सांभाळला असावा. कारण, ' इनकमटॅक्सनं पिडलं ! ' म्हणून ती नेहमीं कुरकुरत असते. कारण ऑफिसर्स फक्त तिचीं गाणीं मोजतात; त्यांना काय कल्पना, कीं सर्वंच गाण्याकरतां निर्माते तिला पैसे मोजतात असं नाहीं. निदान मी तरी तिला कांहीं पैसे दिल्याचं आठवत नाहीं उलट विनायकरावांच्या मृत्यूनंतर जेव्हां बरेच दिवस आमच्या ' चित्रनिर्मितीचं ' कोठें कांहीं जमेना तेव्हां तीच आम्हांला म्हणाली होती,

'काय हो, अडतंय् कशांत ?'

'सगळं तयार आहे' मीं म्हटलं, परंतु गाणीं ऐकवा म्हणतात वितरक ?'

'मग ऐकवा त्यांना,' लता सहज बोलून गेली. जणूं काय मी गाणार होतों—आणि माधव शिंदे माझे पहिले भागीदार-पेटी वाजवणार होते. लताच्याहि लगेच हें लक्षांत आलं असावं. कारण लगेच ती हंसली ! तिनं ओळखलं कीं गाणीं ऐकवायचीं म्हणजे संगीत दिग्दर्शक आला, पार्श्व-गायिका आणि संगीतकार आले. म्हणजे पैसे आले !! ती म्हणाली, 'असं करा, मला तुमचीं गाणीं द्या. मी संगीत देतें तुम्हांला.'

देव पावल्याचा आनंद झाला मला ! आणि तुम्हांलाहि वाटेल ! आपला कामाचा रोजचा व्याप सांभाळूनहि लतानं पंधरा दिवसांत चाली लावण्यापासून, तीं रेकॉर्ड करून देईपर्यंतच्या साऱ्या गोष्टी जातीनं सांभाळल्या ! वाचकांना आठवत असेल, कीं 'राम राम पाव्हणं' या चित्राची संगीत-दिग्दर्शक लता मंगेशकर आहे. त्या अकल्पित घटनेमागचा इतिहास हा असा आहे. घाईत घाई करूनहि लतानं दिलेल्या त्या चाली किती लोकप्रिय झाल्या याचा इतिहास तर डोळ्यांसमोरच आहे सगळ्यांच्या ! त्या चित्राची 'सिल्व्हर ज्युबिली' साजरी झाली, त्याचं अर्धेंअधिक श्रेय लताला आहे, हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणं मला माझं कर्तव्य वाटतं.

कारण लताचं सहकार्य नसतं तर मी दिग्दर्शक निर्माता झालों असतो कां नाहीं, हें सांगणं कठिण आहे. पण हें तिचं सहकार्य अनाहूत होत अकृत्रिम होतं यांतच त्याचं खरं मोल आहे आणि अजुनी तें तसंच आहे, म्हणूनच रजतपटावरली माझी सेवा अखंडपणें चालू आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

वास्तविक तिच्या कार्यबाहुल्यामुळें आमच्या गांठीभेटीसुद्धां दुर्मिळ असतात. कारण माझा बहुतेक मुक्काम पुणें–कोल्हापूरला—तर तिच

मुक्काम मुंबई-मद्रासला ! तरीहि कसलाहि महत्वाचा कार्यक्रम असला कीं आम्हांला एकमेकांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. प्रसंगीं गांठी-भेटी चुकल्या तरी आमची आत्मीयता अभंग आहे, याची प्रचीति मी सदैव घेतों. कोल्हापूरला लता आली रे आली; तिचा पहिला कार्यक्रम असतो तो 'दिनकररावांचं चित्र कुठंपर्यंत आलंय् ? येवढं विचारून ती थांबत नाहीं, तर मी नसलों तरी स्टुडिओंतल्या मुव्हिओल्याबर सारे 'रशिस' बघून मी भेटल्याबरोबर मला, 'पाहीलं बरं कां तुमचं चित्र ?' खरंच प्रभूंचीं गाणीं आवडतात मला.'

यानंतर धंद्याबद्दल आम्हीं बोलतों आणि मराठीचा संसार पाहून ती म्हणते, 'नुसत्या मराठीवर जगणं कठीण आहे सध्यां, हिंदी चित्र कां करीत नाहीं तुम्ही !'

'त्याचं असं आहे लता !' मी शांतपणें म्हणतों, 'साऱ्या गोष्टी योगायोगानं होत असतात !'

हेंच पहा ना—लता हाच मुळीं माझ्या आयुष्यांतला विलक्षण योगा-योग नाहीं कां ? कारण ज्या धंद्याबद्दल मला यत्किंचितहि प्रेम नव्हतं त्याच धंद्यांत मी निर्माता-दिग्दर्शक-लेखक होणं हा केवढा योगायोग आहे. योगायोगानं या क्षेत्रांमधील माझीं महत्वाचीं स्थित्यंतरं लताच्या सहकार्यानें घडून यावींत, याचा जेव्हां मी विचार करतों, तेव्हां एका प्रसंगाच्या आठ-वणीनं तर मी अगदीं थरारून जातों. तो प्रसंग म्हणजे—सिनेमा धंद्यांत अर्धे आयुष्य घालवूनहि अव्यवहार्यतेमुळं मी स्वतःवर ओढवून घेतलेला. दोनवर्षांपूर्वीचा फौजदारी खटल्याचा प्रसंग होय ! त्या खटल्यासंबंधीं अधिक लिहिण्याची ही जागा नव्हे. परंतु त्याबद्दल लिहितांना मात्र मला तो प्रसंग दृष्टिआड करता येणार नाहीं. कारण त्या खटल्यांत मध्यरात्रीला, कल्पना नसतां, वीस हजार रुपयांचा जामीन उभा करण्याची वेळ माझ्यावर आली होती. आणि मी मोठ्या गंभीरपणानं वारंट घेऊन येणाऱ्या इन्स्पेक्टरना

म्हणालो होतों–' चला–पण अकराच्या आंत मी परत घरला येणार ! '

' कोण जामीन राहायला येणार आहे ? '

मी बोललों नाहीं. पण खरोखरीच जेव्हां लता मध्यरात्रीला माझ्या करतां चौकीवर हजर झाली तेव्हां तो इन्स्पेक्टर केवढा चकित झाला. लता काय करते आहे, याची तिला कल्पना देण्यासाठीं तो म्हणाला, जामीन वीस हजारांचा आहे, ठाऊक आहे ना ? '

लता शांतपणें म्हणाली; ' हो '

' लक्षांत घ्या, दिनकरराव कोर्टांत हजर झाले नाहींत, तर वीस हजार भरावे लागतील तुम्हांला ! '

' तशी पाळी येणार नाहीं. आणि आली तरी त्याबद्दल पश्चाताप होणार नाहीं मला ! '

लताचे हे शब्द ऐकून तेथें हजर असणारांना काय वाटलं असेल, तेच जाणोंत ! पण मला मात्र एकच वाटलं. लता आपल्या पैशाबद्दल बोलत नाहीं. तर न्यायदेवताच लताच्या मुखानं बोलत आहे. आणि ती हें बोलत आहे, तोंपर्यंत वकीली साक्षी पुराव्याची मला पर्वा नाहीं- तिच्या अंतःस्फूर्त श्रद्धेनं दिलेल्या माझ्या चारित्र्याची ग्वाही मला पुष्कळ आहे ! सिनेमाच्या क्षेत्रांत मी उद्यां पैसे कमवीन किंवा घालवीनहि. पण लतानं दिलेलं हें मानधन माझं कोणीच लुबाडूं शकणार नाहीं ! आणि म्हणूनच तिचा मी ऋणाईत आहें !

० ० ०

# २ : माधवराव बागल

कोल्हापूरच्या विद्यापीठांतून मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर मी कोल्हापुरच्याच राजाराम कॉलेजमध्यें प्रवेश केला ना त्या वेळची माझी मनस्थिति मला अजुनी आठवते. माहेर सोडून सासरीं जातांना नववधूला वाटावी, तसलीच कांहींशी सुखसंवेदना माझ्या मनांत ओसंडत होती. सात वर्षांच्या शिक्षणक्रमानं विद्यापीठाबद्दल मला प्रेम वाटत होतं हें जितकं खर तितकंच हेंहि खरं होतं कीं, राजाराम कॉलेजकडे माझं मन ओढ घेत होतं. एकीकडे ऋषितुल्य दीक्षित मास्तरांसारखे शिक्षक सोडून जातांना मनाला जितक्या यातना होत होत्या, तितकाच आनंदहि वाटत होता, कीं आतां काय ? उद्यांपासून डॉ. बाळकृष्ण यांच्यासारख्या विद्वान प्रिन्सिपॉलांच्या राजाराम कॉलेजचा मी विद्यार्थी होणार ! खोटं नाहीं—कोल्हापूरची कीर्ति शिक्षण क्षेत्रांत ज्यांनीं सारखी वाढती ठेवली होती, अशी किती तरी विद्वान, रसिक आणि व्यासंगी मंडळी तेव्हां कॉलेजांत विद्यार्थ्यांची लाडकी झाली होती.

तेव्हांपर्यंत मला नुसतं ऐकूनच ठाऊक होतं कीं, कोणी एका परदेशी पंडितानं हिंदुधर्मावर प्रखर टीका केली होती, ती डॉ. बाळकृष्ण यांनीं त्याच्यासमोरच आमूलाग्र खोडून काढली होती. त्याप्रमाणंच मी नुसतं ऐकूनच होतों, कीं प्रो. फडके हे नुसत्या कादंबऱ्याच चांगल्या लिहितात असं नाहीं; तर लॉजिकसारखा शास्त्रीय विषयसुद्धां आपल्या " गुजगोष्टी " इतका ते रंगवून सांगतात. विद्यापीठांत मा. विनायक आम्हांला शिकवत होते, तेवढ्यानंहि केवढं कुतूहल जागृत करून ठेवलं होतं, कीं मराठी प्रेमगीतांचे पहिले कवि माधव ज्यूलियन शिकवतांना किती तन्मय होऊन जात असतील नाहीं ? एक ना दोन– प्रा. पंगू सारख्या रसिक टीकाकारांचा सुद्धां प्राध्यापक म्हणून आपल्याला लाभ होणार, याचा केवढा आनंद माझ्या अंतःकरणांत सारखा उधाण पावत होता. खरोखरीच, कॉलेजच्या भव्य पटांगणांत मी प्रथम प्रवेश केला तेव्हां चित्रविचित्र रंगांच्या मुली मी जेवढ्या अधिरतेनं पाहिल्या, त्याहीपेक्षां अधिक अभिमानानं मी माझे नवे शिक्षक मनमुराद पाहून घेतले ! हिमालयाच्या गौरीशंकराप्रमाणं शोभणारे ते माधवराव पटवर्धन— खरोखरीच, आमच्या वेळचं राजाराम कॉलेज म्हणजे कोल्हापूरचंच नव्हे; तर महाराष्ट्राचं तें विद्याभूषण वाटावं, असा थाट होता सारा !

असं असलं तरी आणखी एका गोष्टीनं मी भारून गेलों होतों— आणि ती म्हणजे राजाराम कॉलेजचं सभागृह होय ! त्या सभागृहांत ज्यांच्या स्मरणार्थ तें कॉलेज बांधलं त्या कै. राजाराम छत्रपति महाराज यांचा एक पांढराशुभ्र पुतळा आहे. तो किती विलोभनीय आहे. त्यांच्याप्रमाणं तेथें रांकेनं दिसणारे आजवरचे कॉलेजचे प्रिन्सिपॉल्स् यांचे फोटोहि तुमचं मन गुंतवून ठेवल्याशिवाय रहाणार नाहींत. पण या सर्वांपेक्षांहि तुमच्या लक्षांत चिरकाल राहतील तें त्या सभागृहाची शोभा वृद्धिंगत करणारे " ऑइल-पेन्ट्स " होत. मी तर वेड्यासारखा तीं सारीं निसर्गचित्रं किती वेळ पहात

राहिलों असेन—आणि अजूनहि जेव्हां जेव्हां मी तिथं जातों, तेव्हा तेव्हां तीं पुन्हां पुन्हां पहात राहतोंच! येवढं कशाला? आतांसुद्धां मला तीं "संध्यामठाची" रम्य सायंकाळ स्पष्ट दिसते; "पंचगंगेच्या पूल" डोळ्यासमोर उभा राहातो आणि पन्हाळ्याच्या "नायकिणीच्या सज्जाची" आकृति मला बेचैन करते. निसर्गाचीं हीं लेणीं हुबेहूब निसर्गाच्या सजीवतेनें चिरंजीव करणारा हा कलाकार आहे तरी कोण? या जिज्ञासेनं पाहणाराला चित्राच्या उजव्या कोपऱ्यांत तीनच अक्षरं शोधून काढावीं—"एम्. के. बी."

कोल्हापूर हें कलापूर आहे, याची साक्ष देणारे अनेक कलावंत मला माहीत होते. कै. आबालाल यांचीं निसर्गचित्रं मीं पाहिलीं होतीं. बाबूराव पेंटरांच्या अमर कलाकृति माझ्या डोळ्यांसमोरच घडत होत्या. तर बाबा गजबर यांचा हातहि रोज चित्रफलकावर रंगाच्या किमया करून दाखवीत होता. इतकेंच नव्हे, तर या मंडळीचा एक शिष्यगण तयार होऊं लागला होता. त्यांत एस. एन्. कुळकर्णी, वडणगेकर, गोपाळराव मांडरे आणि बाळ गजबर हे नांवारुपाला येणारे चित्रकार माझ्या परिचयाचेहि झाले होते. मग मला अज्ञात असणारा हा "एम्. के. बी." कोण? मी जुन्या विद्यार्थ्याला हा प्रश्न विचारला तेव्हां त्यानं जें उत्तर दिलं तें ऐकून तर मी सर्दच झालों! कारण मला खरं वाटत नव्हतं पण "एम्. के. बी." या इंग्रजी शब्दांचा मराठी अर्थ होता–माधवराव खंडेराव बागल!

माधवराव बागल हे एक कसबी चित्रकार आहेत, हें मला त्याआधीं कोणी सांगितलं असतं, तर मी विश्वासहि ठेवला नसता. पण आतां मला विश्वास ठेवल्याशिवाय गत्यंतर नव्हतं, कारण त्यांचीं निसर्गचित्रं माझ्या डोळ्यासमोर होतीं. एवढंच नव्हे, तर तीं पाहून माझं ठाम मत झालं होतं कीं, निसर्गाचीं चित्रं काढावीं तर तीं माधवराव बागलांनींच! इतरांचीं चित्रं मी पहात होतों, पण तीं नुसतीं चित्रंच होतीं. चित्राला आवश्यक ती

मांडणी, रंगसंगति किंवा सूचकता माधवरावांच्या चित्रांइतकी इतरत्र मला कुठं दिसलीं नाहीं. एवढे नांवाजलेले बाबुराव पेंटर! पण त्यांचा कुंचला स्त्रीसौंदर्याभोंवतींच अधिक घुटमळला. पण नित्य नवं नवं रूप धारण करणारं निसर्गाचं सौंदर्य मात्र माधवरावांनींच चित्राच्या चौकटींत लीलेनं बंदिस्त केलं, याचा पुरावा कॉलेजांत माझ्यासमोर तर होताच, पण पुढं जेव्हां मला त्यांच्या घरीं जाण्याची संधि मिळाली तेव्हांहि भरपूर प्रचीति आली. कारण त्यांच्या घरांच्या भिंती अक्षरशः चित्रांनीं बांधलेल्या असाव्यात, इतकीं माधवरावांचीं चित्रं त्यांच्या घरांत गर्दीनं मांडलेलीं आहेत.

साहजिकच, माझ्या मनांत पहिला विचार आला तो हा कीं, चित्रकला एवढी आत्मसात केली असतांना माधवरावांनीं तिच्याकडे नावडत्या बायकोप्रमाणं कां दुर्लक्ष करावं? कारण माझ्यासमोर निराळेच बागल दिसत होते. ते चित्रकार नव्हते, तर साहित्यिक होते. बहुतेक मराठी मासिकांमधून त्यांच्या गोष्टी छापून येत होत्या, म्हणूनच नव्हे, स्वतः "हंटर" नांवासारखें पत्रहि ते चालवीत होते, म्हणूनहि त्यांचा साहित्याचा अभ्यास दांडगा होता. नुसत्या कथाच नव्हे, तर शास्त्रीय, सामाजिक आणि वाङ्मयीन प्रबंधहि ते अधिकारवाणीनं लिहीत होते आणि आपला असा खास वाचकवर्गहि ते झपाट्यानं निर्माण करण्यांत यशस्वी झाले होते. वाङ्मयाचा एक विद्यार्थी म्हणून तेव्हां मी नुकताच वाचूं लागलों होतों, तरी माझ्या शंकेचें उत्तर त्यांच्या कथांनीं मला दिलंसुद्धां. माधवरावांनीं कुंचला खालीं ठेवून लेखणी हातांत धरली याचें खरें कारण एकच "कलेकरतां कला" हा वाद कितीहि गोंडस वाटला, तरी "जीवनाकरतां कला" हेंच कोणत्याहि कलेचं अधिष्ठान आहे. याच श्रद्धेनं ते साहित्यांत हिरीरीनं भर घालत होते, इतका त्यांच्या लेखनावर उपयुक्ततावादाचा पगडा बसलेला कोणालाहि दिसला असता.

लेखक वाङ्मय कां निर्माण करतो, याचं तात्विक विवेचन कांहीं

असो. मला उघड उघड दिसत होतं कीं, माधवराव लिहीत होते याला कारण एकच होतं. त्यांना वाचकांना कांहींतरी सांगायचं होतं. इतकं सांगायचं होतं, कीं तें लिहून लौकर सांगतां येणार नाहीं म्हणूनच कीं काय ते सारखे बोलायलाहि तयार होते. त्यांच्या कलाकार मनाला दिसत होतं, कीं, देशांतच नव्हे, तर साऱ्या जगांतच क्रांतीचं एक महान् पर्व सुरू होत आहे, राजकारणांत स्वातंत्र्याच्या लढ्याला अग्रेसरत्व लाभलं आहे, समाजकारणांत आर्थिक आणि जातीय विषमतेबद्दल चीड निर्माण झाली आहे, आणि समाजाच्या लहान थरामध्येंसुद्धां अशी कांहीं उलथापालथ होऊं लागली आहे, कीं नवें काय येणार याबद्दल जरी लोक साशंक असले; तरी जुन्याची विलक्षण उबग त्यांना आली आहे.

खरंच, अवघ्या देशाला तेव्हां पारतंत्र नको झालं होतं. धर्मसंस्थांची बांडगुळं नकोशीं झालीं होतीं, सामाजिक आणि धार्मिक विषमता तर इतकी असह्य झाली होती, कीं देशांतच नव्हे तर साऱ्या जगामध्यें क्रांतीचे वारे थैमान घालीत होते. या सर्वांचा परिणाम सानथोरांवर होतांना दिसत होता; मग माधवरावांसारख्या कलाकाराच्या कोमल मनावर किती विलक्षण झाला असेल— याची कल्पनाच केलेली बरी! वैचारिक गोंधळांत देशांतील लोकांना मार्गदर्शनाची गरज असतांना आपण आपली कला फक्त मूठभर श्रीमंतांच्या सेवेला सादर करावी, हें माधवरावांना पटणारं नव्हतं, ऐदी श्रीमंतांची, एकछत्री सत्ताधाऱ्यांची आणि गरिबांना नाडणाऱ्या धनिकांची चीड मनात असतांना आपलीं चित्रं श्रीमंतांच्या रंगमहालांची शोभा ठरावींत, हें माधवरावांना सहन होणेंच शक्य नव्हतें. म्हणून मदिरेची सुरई घेऊन कीचकानं बोलावलं असतांना सैरंध्रीनं भीमाचा धांवा केला, त्याप्रमाणं आपल्या कलेला बटीक म्हणून राबवूं पाहाणाऱ्या श्रीमंताचा अव्हेर करून, माधवरावांनीं कुंचला टाकून लेखणी हातांत धरली आणि ते दलितांच्या उद्धाराला धांवले! दलितांचं दारिद्र्य पाहून वाङ्मयांतील

अलंकारहि त्यांना निषिद्ध वाटले कीं काय कोण जाणें-- साध्यासुध्या घरगुती भाषेचाच त्यांनीं अंगिकार केला, तो इतक्या अतिरेकी बुद्धीनं कीं कधीं कधीं मला वाटे, तनुविक्रय करणाऱ्या स्त्रीनं पश्चात्तापानं आत्महत्त्या करावी त्याप्रमाणं बागलांच्या मधल्या कलावंतानं आत्महत्त्या तर केली नसेल ना ? नाहींतर निसर्गसौंदर्यानं बेचैन होणाऱ्या चित्रकार माधवरावांनीं साहित्यिक होतांच जोगिणीचं व्रत घेण्याचं काय कारण ? त्यांना नटणं नको होतं ---त्यांना अलंकार नको होते---त्यांना हवं होतं एकच---सेवा-सेवा-फक्त लोक-सेवा ! !

कलेच्या उपयुक्ततेसंबंधींचीं त्यांचीं मतें अजमावण्याचा योगायोग मलाहि अत्यंत गंमतीनं आला. काय झालं, मित्रांच्या अनुकरणानं तेव्हां मीसुद्धां वाङ्मयांत यथाशक्ति हालचाल करूं पहात होतों; आणि त्याकरतां म्हणून कोल्हापूरला दरवर्षी जे मेळ्यांचे कार्यक्रम होत त्याकरतां त्यावेळचे सुप्रसिद्ध मेळेकार प्रो. सारंग यांनीं माझ्याकडून दोन प्रहसनं लिहून घेतलीं होतीं. त्या वर्षी गणपति उत्सवांत मेळे करण्याची प्रथा इतकी लोकप्रिय होती, कीं प्रो. सोलापूरकर यांचा " यशवंत मेळा " हा गाण्यासाठीं आणि आमचा " गंधर्व निकेतन मेळा " हा संवादासाठीं प्रसिद्धी पावला होता. माझें पहिलें प्रहसन " कॉलेजांतील कृष्ण " हें विनोदी असून, आज राधाकृष्ण असतें तर त्यांनीं काय केलं असतं, अशी कल्पना होती आणि दुसरें जें " हंगामी मेळा " त्यामध्यें मेळ्यामधील कांहीं वैगुण्यावरच कडक टीका केली होती. माझीं हीं दोन्हीं प्रहसनं माधवरावांना पाहावीं लागलीं, कारण त्या वर्षीच मेळ्यांचं संमेलन भरलं होतं आणि चांगल्या मेळ्यांना माधवरावांच्याच हस्तें बक्षिसं दिलीं जाणार होतीं.

मजा म्हणजे माझ्या " कॉलेजांतील कृष्ण " या प्रहसनाला पहिलें बक्षिस मिळालें आणि त्याची भरमसाट स्तुति करून, माधवरावांनीं दुसऱ्या प्रहसनावर आभिनिवेशी हल्ला चढविला. तो इतका कीं, हा लेखक म्हणजे

कमालीचा हीन अभिरुचीचा असला पाहिजे, हें गृहीत धरून, त्यावर बहिष्कार घालून, पहिल्या लेखकाचाच पुरस्कार मेळेवाल्यांनीं कटाक्षानं करावा, अशी शिफारसहि त्यांनीं करून टाकली. मला काय वाटलं असेल, हें सांगणें कठीण आहे; मात्र जेव्हां दुसऱ्या दिवशीं मी त्यांना समक्ष भेटलों आणि सांगितलं, कीं " क्षमा करा माधवराव, काल ज्याचा तुम्ही धिःकार केलात तो मीच आणि ज्याचा पुरस्कार केलात तोहि मीच ! "

तेव्हां माधवरावांना काय वाटलं, हें मी खरंच शब्दांनीं सांगू शकणार नाहीं. सुखदुःखाचे संमिश्र भाव त्यांच्या चेहऱ्यावर तरळले. आपला मुलगा हुशार आहे; पण त्याबरोबर तो वाहवतहि चालला आहे, असें कळल्यानंतर बापाला वाटावं, तसं दुःख त्यांना झालें ! ते सद्‌गदित होऊन म्हणाले, " दिनकरराव, तुमच्या लेखणींत अमृताची गोडी आहे हो. ती तुम्हीं दारूंत बुडवूं नका. दारूचे दलाल पुष्कळ आहेत. त्यांत तुम्ही सामील व्हावं हें मला बरं वाटत नाहीं. लोकांना रंजवण्याकरतां असं कांहीं तरी हीन लिहिण्यापेक्षां, त्यांच्या उद्धाराकरतां कांहीं चांगलं लिहाल तर त्याची देशाला आज अधिक गरज आहे. "

कां कुणास ठाऊक ! वाङ्मयीन गुरुशिष्याचं नातं नसतांहि माधवरावांचे उद्‌गार अजुनी माझ्या अंतःकरणांत घुटमळतात आणि मधून मधून मला जागृत करतात, हें कदाचित् माधवरावांनाहि ठाऊक नसेल ! पण या प्रश्नावर आमच्या घरीं मात्र खूप चर्चा होतें. कारण असं कीं—माझी पत्नी सुमन ही माधवरावांची आवडती " पडोशी " होती; आणि तिचे आजोबा हे माधवरावांचे चाहते असल्यानें माधवरावांच्या ग्रंथाचीच काय—पण त्यांच्या " अखंडभारता " मधील स्फुटाचीसुद्धां—चर्चा आमच्या घरीं झाली नाहीं, असं कधीं झालंच नाहीं. वादाला रंग आणण्यासाठीं विरोध करण्याचा माझा स्वभाव असल्यानें सुमन व तिचे आजोबाहि माझ्यावर असे कांहीं तुटून पडत कीं, माधवरावांवर टीका करण्यांत मी कांहीं अधर्माचरण करीत

आहे, असाच त्यांचा आवेश असे! मी सुद्धां मुद्दामच तितक्याच विरुद्ध टोकानं सुरुवात करी आणि त्यांची फडके–खांडेकरांशीं तुलना करून, या मुद्यावर येई कीं, माधवराव बहुजनसमाजासाठीं लिहितात ना ? मग तो निरक्षर असल्यानें माधवरावांनीं लिहिण्यापेक्षां बोलावं हेंच बरं!! पण लोकजागृतीच्या निमित्तानं सरस्वतीच्या मयूरसिंहासनाचं व्यासपीठांत रूपांतर करूं नये, हें उत्तम!!

त्यावर सुमन म्हणे–आणि अजूनहि म्हणते कीं, माधवरावांना त्यांतहि कांहीं कमीपणा वाटत नाहीं. मयूर सिंहासनावर खुशाल तुम्ही कलेचे तमाशे नाचवा; माधवराव जीवनाच्या निष्ठेनं लिहितात आणि म्हणूनच त्यांच्या भाषेला, तुम्ही समजता ती शैली नसली; तरी त्यांच्या शब्दाला मोल खात्रीनं आहे. यावर मात्र मी निरुत्तर होतों. कारण खरोखरीच माधवरावांच्या व्यक्तिमत्वाला वजन आहे, त्यांच्या शब्दाला अर्थ आहे. त्यांच्या विचारांची किंमत त्यांच्या कलेला कदाचित् करतां येणारहि नाहीं—म्हणून शब्दापेक्षां अर्थाची किंमत थोडीच कमी होणार आहे ? त्यांच्या साहित्याची कदर उद्यांचा टीकाकार करो अथवा न करो; त्यांच्या आयुष्याची नोंद उद्यांच्या इतिहासकाराला जरूर करावी लागेल!

कारण उपयुक्ततावादानं आपल्या जीवनाचं मोजमाप करायचं ठरल्यानंतर माधवराव कुंचला टाकूनच थांबले नाहींत; किंवा सरसावूनहि ते कृतार्थ झाले नाहींत; तर लोकांच्या सेवेसाठीं, त्यांच्या उद्धारासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवून जीवनाच्या हरेक संग्रामांत त्यांनीं उडी घेतली आहे. ती उडी घेतांना आपल्या बायकोवरहि त्यांनीं प्रेम केलं नाहीं; किंवा एकुलत्या एक पोरावरहि जीव लावला नाहीं. त्याबद्दल मी कधीं त्यांना विचारलंहि नाहीं. पण माझं मन मला सांगतं, कीं साऱ्या दलितांना आपलं समजणाऱ्या माणसाचा आपल्या बायकोवर किंवा मुलावर लोभ नसेल, असं तरी कसं म्हणतां येईल ?

किंबहुना, माधवरावांच्या प्रेमाचा एक लोकविलक्षण नमुना म्हणून म्हणावा लागेल, कीं माधवराव प्रेमानं आंधळे होत नाहींत. तर ज्याच्या-वर ते प्रेम करतात त्यालाहि ते डोळस व्हायला सांगतात, आणि जेव्हां तसें होत नाहीं. तेव्हां त्यांच्याशींच माधवरावांचा संग्राम सुरू होतो. माधव-रावांच्या जीवनांत असे अनेक संग्राम आलेले आपणांस दिसतील! पहिला संग्राम त्यांच्यामधील कलावंत आणि लोकसेवक यांतच झाला. त्यांत कला-वंताचा पराभव होऊन लोकसेवक विजयी झाला म्हणूनच असेल, दुसऱ्या संग्रामाला माधवराव प्राणपणानं सिद्ध झाले! कारण दुसरा जो संग्राम तो त्यांच्या आयुष्याला पुरला आणि माधवरावांच्या जीवनाला पराक्रमाची शोभा त्यानं आणली! कारण दुसरा संग्राम त्यांच्यामधलि विविध व्यक्ति-मत्वामध्यें नव्हता—तर माधवराव आणि करवीरची राजसत्ता यांमधील तो संग्राम होता.

कोणी म्हणेल, राजकीय स्वातंत्र्याची लाट साऱ्या देशभर पसरली असतांना ती संस्थानांत येणं अपरिहार्य होतं. पण हें खरं असलं तरी, ती लाट थोपवण्याचा आटोकाट प्रयत्न होणं, हेंसुद्धां तितकंच अपरिहार्य नव्हतं कां? या द्वंद्वांतूनच राजकीय जागृतीची लाट उसळली असली, तरी कोल्हा-पुरांतच तिनं उग्र स्वरूप धारण केलं, याला कारण होतं. दक्षिण भारतांत आपल्या वैशिष्ट्यानं नटलेलं कोल्हापूर संस्थान हें अनेक जातिनिष्ठांच्या डोळ्यांत सलत होतं. संस्थानीं डोळ्यांत सलत होतं. संस्थानी कारभार लहरी असतो, एक—छत्री असतो, हें कितीहि खरं असलं; तरी कै. शाहू महा-राजांपासून राजाराम महाराजापर्यंतच्या कारकीर्दीत लोकहिताचेच प्रयत्न अधिक झालेले छत्रपतींच्या विरोधकांनाहि कबूल करावं लागेल. या प्रयत्ना-नंच सत्यशोधकांची चळवळ कोल्हापूरला दृढमूल झाली आणि इतर कोण-त्याहि दक्षिणी संस्थानांत झाली नाहीं, येवढी शैक्षणिक प्रगति कोल्हापुरां-

तच प्रथम झाली. क्रीडांचं कौतुक इथंच झालं; आणि केलेला आसराहि इथंच मिळाला ! ! नव्हे, राजकीय जागृतीचा लढासुद्धां खुल्या दिलानं इथंच सुरू झाला—हें लक्षांत घेण्यासारखं आहे.

खुल्या दिलानं असं मी म्हणतों याला कारण आहे. शेतकऱ्यांचे प्रचंड मोर्चे जरी—माधवराव बागल की जय ! करीत कोल्हापुरांत आले; तरी सारे मोर्चे " राजाराम महाराज की जय " करीत परत गेलेले मीं डोळ्यांनीं पाहिले आहेत. लोकांचं माधवरावांवर प्रेम होतं हें तितकंच खरं, तितकंच हेंही खरं होतं कीं, लोकांची आपल्या राजावर भक्ति होती. स्वत: माधवराव आणि राजाराम महाराज यांचंहि कांहीं एकमेकांवर कमी प्रेम नव्हतं. मला आठवतं, मोर्चा आला रे आला, महाराज जातीनं सामोरे जात आणि आधीं सर्वांना पोटभर जेऊं घालीत. शेतकऱ्यांच्या म्हाताऱ्या सुरकुतलेल्या अंगावरून प्रेमानं हात फिरवीत ते म्हणत, " कशालारे यांना उन्हांतान्हांतनं आणलंस ? तूं एकटा आला असतास तरी तूं मागशील तें दिलं असतं मी तुला. "

मराठ्यांच्या राजाचे हे उद्गार ऐकले कीं तमाम शेतकऱ्यांच्या अंगावर झुणकाभाकरीनंहि मूठभर मांस चढे आणि सारे अभिमानानें गर्जत " राजाराम महाराज की जय ! " कारण, लोकांना राजा हवा होता आणि माधवरावहि हवे होते. देण्याघेण्याबाबत कुणाचाच विरोध नव्हता पण ग्यानबाची मेख होती ती एकाच ठिकाणीं—कोल्हापूरच्याच राजकीय क्रांतीचीं सूत्रं संस्थानाबाहेरून खेळवलीं जात होतीं. माधवरावांना सल्लामसलत हद्दीबाहेरून मिळत होती. सारं असमाधान या मतलबी सूत्रधारांबद्दल होतं. माधवरावांना हें कोणीं बोललं नसेल असं नाहीं, पण ते म्हणत, " जी गोष्ट चांगली आहे ती मी स्वीकारणारच. ती कुठून आली याचा विचार गौण आहे. " तर अधिकारी म्हणत, हा नुसता तत्त्वांचा लढा नाहीं. राजकारणांत तत्त्वापेक्षां तपशीलांना अधिक महत्व असतं म्हणून हा लढा थांबव-

त्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करणार! आज ना उद्यां सारंच पोराला मिळणार असलं, तरी म्हातारा बाप जसा उनाड पोराला घाबरतो, तसलाच कांहींसा सारा प्रकार झाला होता. महाराज म्हणत–" अरे माधव, तूं प्रधान हो हवा तर. " तर माधवराव म्हणत कीं " प्रधान झालों तर मीहि बिघडेन. म्हणून सारं लोकांच्याच स्वाधीन करा ना! सत्तेचं विकेंद्रीकरण हीच उद्यांची खरी लोकशाही आहे. "

माधवरावांची ही विचारसरणी चूक नव्हती. पण माधवराव आपली सारीं सूत्रं परकीयांच्या तंत्रानं हलवीत होते, ही त्यांची खरी चूक होती. माधवरावांच्या प्रामाणिकपणाबद्दल, निष्ठेबद्दल अथवा त्यागाबद्दल कोणालाच शंका नव्हती. पण खरी शंका एकच होती–देशभक्त म्हणून पुढारीपणाचे हार त्यांच्या गळ्यांत पडत होते. पण माधवराव खरेखुरे पुढारी होते काय? पुढारीपणाला लागणारी मुत्सद्देगिरी माधवरावांच्या ठिकाणीं आहे काय? राजनीति ही वारांगनेसारखी असते, असं तिचं वर्णन अनादिअनंत काळापासून करण्यांत येत आहे. ही वारांगनेची कला कलावंत माधवरावांच्या ठिकाणीं कोठून असणार. अशीच त्यांच्या " घरच्या " विरोधकांची समजूत होती.

त्यावेळच्या एकजात स्थानिक आणि बाहेरच्याहि वृत्तपत्रांतून माधवरावांचे फोटो झळकत होते. त्यांच्या बातम्यांचे मथळे मोठ्या टाईपांत शिरोभागीं तळपत होते. आणि स्वतः माधवरावहि तिरंगी झेंड्याबरोबर भगवा झेंडाहि हातांत घेऊन क्रांतीचा जयघोष करीत होते. लोकांना ते नेते हवे होते, म्हणूनच सारे एकमुखानं गर्जत होते कीं, " माधवराव बागल कीं जय! "

क्रांतीचं तें दिव्यदर्शन अजुनी माझ्या डोळ्यासमोर तरळत आहे. कोल्हापूरच्या बिंदु चौकांत अफाट जनतासागर उसळला आहे. त्या सागराची डोंगरलाट दिसावी त्याप्रमाणें माधवराव व्यासपीठावर उभे आहेत.

खादीच्या सूटांत आपल्या उंच सांबरी टोपीपेक्षांहि वर हात करून माधवराव धीरगंभीर स्वरांत म्हणत आहेत, "बोला, वंदे मातरम् !"

या जयजयकारांतूनच स्वातंत्र्य सूर्याचा उदय आज देशभर झाला आहे. सारीं संस्थानं आतां विलीन झालीं. माधवराव ज्या तत्त्वासाठीं तळमळत होते त्या तत्त्वाचाहि विजय झाला आहे. पण मला वाटतं, महाराजांना जो माधवरावांच्या तपशीलाचा गोंधळ दिसला तो आज उघड झाला आहे. म्हणूनच माधवराव आज मंत्री झालेले नाहींत; किंवा मुत्सद्दीहि ठरलेले नाहींत. मंत्री होण्यांतच मोठेपणा आहे असं नाहीं. आणि म्हणूनच माधवरावांनीं आपल्या हातानीं मंत्री निर्माण केले. पण स्वत: मंत्री होण्याची अभिलाषा स्वप्नांतहि बाळगली नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र माधवरावांना आज जाणवत असेल कीं त्यावेळचे आपले मित्र आजकाल परागंदा झाले आहेत. कारण ते मित्र नव्हतेच मुळीं. होते सारे संधिसाधु भाट ! छत्रपतीसारख्या महाराष्ट्राच्या श्रद्धास्थानाशीं लढा करतांना त्यांना माधवरावांची ढाल हवी होती. तो लढा संपतांच हातांतली ढाल आतां अडगळ वाटूं लागली आहे. वास्तविक, अद्याप क्रांतीचा लढा संपलेला नाहीं. उलट स्वातंत्र्यापेक्षांहि निकराचे लढे सुराज्याकरतां देशाला लढावे लागणार आहेत. पण मराठा संस्थान आतां नसल्यानें माधवरावांची गरज मात्र उद्यां सरली आहे.

म्हणूनच एक प्रकारचा अज्ञातवास माधवरावांच्या वांट्याला आला आहे कीं, काय, अशी सहज शंका मला कधीं कधीं विव्हळ करते. पण लगेच मी म्हणतो कीं, अशा लौकिक यशापयशांनीं माधवरावांच्या आयुष्याचं मोजमाप करणंहि चूक आहे. माधवराव पुढारी असोत वा नसोत; माधवराव मुत्सद्दी ठरोत वा न ठरोत; त्यांचा आत्मा जन्मतःच कलावंताचा आहे. म्हणूनच स्वतःच्या आणि देशाच्याहि हरेक संगरांत आत्माहुती देण्यास ते सारखे आघाडीवरच राहिले आहेत.

याच सेवा बुद्धीनं आणि कर्तव्य निष्ठेनं माधवराव आयुष्यभर जगले. आज त्यांच्या वयाला साठ वर्षें होत आलीं असतील. माझी खात्री आहे; उद्यां मरणाची वाटहि माधवराव जीवनाच्याच निष्ठेनं चालतील ! म्हणूनच मी पाहतों, कोल्हापुरांतील मांगवाड्यांतील साधासुधा कार्यक्रम असो, गोव्यांच्या स्वातंत्र्याचा लढा असो, किंवा संयुक्त महाराष्ट्रासारखी न्याय्य मागणी असो--माधवराव जीवनमरणाच्या निष्ठेनं हरेक सामाजिक क्षण जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतांना दिसतात. लोकांनाहि याची पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच कसल्याहि कार्यासाठीं माधवराव बिंदु चौकांत व्यासपीठावर उभे राहून लोकांचं सहकार्य मागतात, तेव्हां पूर्वीच्याच उत्साहानं अजुनी जनतासागराची गर्जना आकाशाला भिडते--"माधव-वरात्र बागल की जय !"

मला वाटतं, हेंच माधवरावांच्या कार्याचं खरं यश आहे; त्यांच्या आयुष्याचं खरं सार्थक आहे. ते उद्यां पुढारी म्हणून राहातील, अथवा न राहतील, मंत्री होतील किंवा न होतील; घरांत असतील किंवा तुरुंगांतहि मर-तील! पण लोकांची त्यांच्या जीवनाबद्दलची कृतज्ञता तिळमात्रहि कमी होणार नाहीं.

याची प्रचीति मला आली तीहि केवढ्या औचित्यपूर्ण प्रसंगानं ! दोन वर्षांपूर्वीच माधवरावांनीं आपलं चरित्र लिहिलं आहे. त्या "जीवन-प्रवाह"चा प्रकाशन समारंभ कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्यें केवढ्या वैभवानं पार पडला ! माधवरावांचे चाहते आणि विरोधकहि सारे कर्तव्य बुद्धीनं हजर असतांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी बोलायला उठले आणि बोलण्याच्या ओघांत माधवरावांच्या जीवनांतील कांहीं लौकिक वैफल्यांचा निर्देश केला मात्र--

कालपरत्वें त्यांना डोक्यावर घेणारे पत्रकार मुडद्याप्रमाणें स्तब्ध होते. तरीहि सदैव त्यांना डोक्यावरून मिरवणारी जनता मात्र गप्प बसली

नाहीं. त्यांमधील एकटा केवढ्या तिरीमिरीनं उठला आणि तर्कतीर्थांनाहि त्यांनीं भर सभेंत दटावलं कीं–" माधवरावांबद्दल चांगलं बोलायचं असेल तर बोला. दुसरं तिसरं आम्ही ऐकून घेणार नाहीं."

तर्कतीर्थ शांतपणें उत्तरले, " मी त्यांच्या कार्याचं समीक्षण करीत आहे. त्यांचा टीकाकार मित्र म्हणून तसं करणं माझं कर्तव्य आहे."

" तें तुमचं कर्तव्य बाहेर जाऊन करा. आमचं कर्तव्य आम्हांलाहि केलंच पाहिजे." त्या जनतामुखांतून हे उद्‌गार बाहेर पडायचा अवकाश, थिएटरांत टाळ्यांचा कडकडाट झाला आणि तो शांत झाल्यावर एकच वाक्य बोलून प्रेक्षकांमधील तो गृहस्थ खालीं बसला. तो गहिंवरल्या स्वरांत म्हणाला, " माधवराव पुढारी असतील किंवा नसतील. माधवराव आमचे देव आहेत हें लक्षांत ठेवून बोला."

तर्कतीर्थांना आपलं भाषण आवरावं लागलं ! मी मनाशीं म्हणालों, इतिहास घडवतो कोण ? आणि तो लिहितो कोण ? माझी खात्री आहे, उद्यांचा इतिहास जर खरोखरीच लोकांच्या खऱ्याखुऱ्या प्रतिनिधीनें लिहिला तर माधवरावांबद्दलचे हे जनताजनार्दनाचे उद्‌गार काळालासुद्धां बदलतां येणार नाहींत–मग पुसून टाकण्याची तर गोष्टच सोडा ! घरीं येईपर्यंत एकच उद्‌गार माझ्या मनांत घुमत होता, " माधवराव पुढारी असतील किंवा नसतील ! माधवराव आमचे देव आहेत ! !

० ० ०

# ४ : पुढारीकार

आमचं कोल्हापूर करवीर क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे; इतकं कीं साऱ्या हिंदुस्थानभर दक्षिण काशी म्हणूनहि कोल्हापूरची महति मानली जाते. तसं पाहिल्यास कोल्हापूरचं महात्म्य अनेक तऱ्हांनीं स्वयंसिद्ध आहे. जगन्-माता जगदंबेचं जसं तें अधिष्ठान आहे; तसंच कोल्हापूरला वळसा घालणाऱ्या पंचगंगेतहि अनेक भाविक लोक आपलं पापक्षालन करून पावन होतात; तर कांहीं लोकांना मराठ्यांच्या गादीचं श्रद्धास्थान म्हणून कोल्हापूर महत्त्वाचं वाटतं. कोल्हापूरला आलं रे आलं, जुना राजवाडा, नवा राजवाडा हीं स्थळं तर ते पाहतीलच, परंतु त्याबरोबर पन्हाळ्यालाहि फेरी मारल्याशिवाय ते रहाणार नाहींत. केवळ निसर्ग–सौंदर्याबद्दलहि कोल्हापूर कांहीं कमी प्रसिद्ध नाहीं. संध्या मठापाशीं उभं राहून रंकाळा तलावाची रम्य संध्याकाळ ज्यांनीं पाहिली नाहीं ते खरोखरच हतभागी समजले पाहिजेत. पण या सर्वांबरोबर आणखी एक कोल्हापूरचं मोठं आकर्षण आहे असं मला वाटतं––आणि तें म्हणजे, टॉऊन हॉलच्या शेजारींच बसलेली " पुढारी " या वृत्तपत्राची टुमदार कचेरी ही होय !

निदान मी तरी कोल्हापूरला आलो रे आलो–जगदंबेचं दर्शन माझं चुकेल–पण न चुकतां माझे पाय छत्रपती प्रेसकडे वळतात. कारण एकच — " काय संपादक ? " म्हणून हक्कानं चहा पिण्याचं माझं तें आवडतं स्थळ आहे. " या दिग्दर्शक ! " म्हणून मग टेबलावरल्या कागदांच्या ढिगाऱ्यांतून संपादकहि आपली मान वर काढतात; आणि " केव्हां आलांत ? " म्हणून माझी विचारपूस ते मोठ्या आस्थेनें करतात. कां कुणास ठाऊक, गणपतरावांच्या मुखावर शोभून दिसणाऱ्या या अकृत्रिम हास्याची मला इतकी संवय झाली आहे, कीं तें पाहिल्याशिवाय मी कोल्हापूरला आलों, असं मला कधींच वाटत नाहीं; आणि खोटं नाहीं, त्यांच्या संगीतामधल्या अर्धापाऊण तासांतहि कोल्हापूरचं संपूर्ण ज्ञान मला होतं; आणि कळतं कीं–आमच्या आर. बी. पाटलांची " सिटी बस सर्व्हिस " सध्यां " एस. टी. " नं ताब्यांत घेतली आहे, रुईया बंधूनीं शुगरमिल कशी झकास चालवली आहे, जे. पी. नायकांनीं घरं पाडलीं म्हणून पूर्वीं लोकांनीं बोंब मारली खरी पण आतां तिथं नव्या इमारती उठल्या असून सारे रस्ते कसे पुण्यामुंबईसारखे ऐसपैस झाले आहेत.

म्हणजे मी हें सारं तपशीलवार विचारून घेतों असें नाहीं. पण गणपतरावांच्या ऑफिसमध्यें अंबाबाईच्या देवळासारखी रीघच लागलेली असते माणसाची ! त्यांच्या बोलण्यावरूनच मला, न विचारतां कळतं कीं, संयुक्त महाराष्ट्र न झाल्याबद्दल पं नेहरूंना दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. महाराष्ट्रीय नेत्यांमध्येंच जिथं एकमत नाहीं, तिथं कोण तुम्हांआम्हांला विचारणार ? लोकमान्य टिळकांच्या पश्चात् दुर्दैवानं अनुयायांपेक्षां पुढाऱ्यांचीच पैदास इतकी झाली आहे महाराष्ट्रांत, कीं कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं आणि असं आहे तोंपर्यंत महाराष्ट्राचा प्रभाव भारताच्या राजकारणावर पडणं अगदीं अशक्य आहे.

श्री. गणपतराव जाधव यांच्याशीं आजकाल अशा गुजगोष्टी कर-

तांना माझी करमणूक होत असली, तरी मला कधीं कधीं आठवतं आणि स्वत:शींच मी हंसून म्हणतों कीं, " याच माणसाची पहिली भेट घेतांना मी किती संकोचलों होतों नाहीं ? " कारण सांगूं?ज्यांचं लिखाण छापून येतं अशा माणसांबद्दल मला पूर्वी फार आदर वाटायचा ! आणि पुढारीकार गणपत-राव तर काय–माफ करा, त्यावेळीं ते " सेवककार " होते–रोज त्यांचं लिखाण छापून बाहेर पडायचं ! मग मला त्यांच्याबद्दल केवढा आदर वाटत असेल याची कल्पनाच करा ! मला अजून आठवतं " सेवक " या नांवाचं साप्ता-हिक ते प्रसिद्ध करीत होते आणि आमच्या राजाराम कॉलेजच्या शेजारींच एका माडीवर त्यांचं ऑफिस होतं. त्यांची माडी मी चढेन असं मला स्वप्नांतहि कधीं वाटलं नव्हतं–कारण––

लेखक हा काय माझा व्यवसाय नव्हता आणि छंदहि नव्हता. पण संगतीनंच माणसाला सारीं व्यसनं लागतात हेंच खरं ! माझ्या कांहीं मित्रांना लेखणीचा " नाद " होता आणि आपले मित्र काय जें कांहीं करतात तें आपण कां करूं नये, या असूयेनं मी प्रथम लेखणी हातांत धरली. पांढऱ्या वर काळं करतांना आपलं लिखाण कितपत चांगलं उतरेल याबद्दल मी साशंक होतों; पण एवढा आत्मविश्वास नक्की वाटत होता, कीं माझ्या मित्रांचं जें कांहीं लिखाण छापून येतं, त्यापेक्षां आपलं लिखाण कांहीं कमी असणार नाहीं, एवढयाच एका आत्मविश्वासानं एक रात्र मी जागून काढली, आणि––

दुसरे दिवशीं भीतभीतच मी गणपतरावांच्या " सेवक " ची माडी चढलों आणि माझी पहिली कथा मी त्यांच्यासमोर ठेवली. त्यांनीं ती नुसती खालींवर पाहिली आणि " असूं दे " एवढयाच शब्दांनीं माझी बोळवण केली. मीहि " सुटलों एकदांचा " म्हणून कांहीं न बोलतां बाहेर सटकलों––

माझं लक्ष मात्र सारं गोष्टीकडे होतं. आपली गोष्ट छापून येते कां

साभार परत येते ? एक आठवडाभर मला कांहीं सुचलं नाहीं. छापून आली तर उत्तमच ! आणि परत आली तर ? आपण लेखणीच्या नादाला लागलों आणि तिनं आपल्याला दगा दिला, हें घरांत समजणार ! पण या संदिग्ध अवस्थेंत गणपतरावांनीं मला फार काळ ठेवलं नाहीं. दुसऱ्याच शनिवारीं "सेवक" चा ताजा अंक आमच्या सोप्यांत पडला आणि त्यांत माझी पहिली कथा "चंद्रकोर" ही छापून आली होती. माझा आनंद काय वर्णावा— पहिलं प्रेम, पहिलं चुंबन—पहिल्या कथेची गोडीहि त्यापेक्षां खात्रीनं कमी नाहीं. कॉलेजांतील माझ्या मित्रांनाहि ती आवडली आणि मग काय विचारतां ? जॉर्ज वॉशिंग्टन हातांत कुऱ्हाड पडल्याबरोबर बागेंतील वृक्षांवर तो चालत्रीत सुटला ना ? त्या उन्मादांत मीहि साहित्याच्या प्रांगणांत स्वैरपणें मोकाट सुटलों. कथा काय—कविता काय—रूपककथा काय—सुचेल तें आणि जमेल तें मी लिहीत सुटलों आणि कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत जी कांहीं साहित्यिक विद्यार्थी मंडळी होती, त्यांत माझी गणना होऊं लागली श्री. शि. आ. स्वामी, वि. वा. पत्की, कवि राजस ही मंडळी तेव्हां साहित्याच्या क्षितिजावर चमकूं लागलीं होती. त्या मालिकेंत माझेंहि नांव जसें घेतलें जाऊं लागलें, तसा मला अभिमान वाटूं लागला.

मात्र हें होत असतांना गणपतरावांचं माझ्यावर बारीक लक्ष्य होतं, हें मला दिसून आलं. तसं गुरुशिष्याचं नातं आमचं कधींच जमलं नाहीं. उलट त्यावेळचे प्रसिद्ध कादंबरीकार वि. स. खांडेकर आणि आमचे प्राध्यापक ना. सी. फडके यांच्याच शैलीची माझ्या लेखनावर अधिक छाया पडली होती. ती चांगली का वाईट, हें जरी गणपतरावांनीं मला स्पष्टपणें कधीं सांगितलं नाहीं तरी केवळ भाषा सजवण्याच्या माझ्या मोहाला त्यांनीं आळा घातला आणि भाषेपेक्षांहि विचारांनीं लेखनाला अधिक शोभा आणि सखोलता येते, हें मला वेळोवेळीं पटवून दिलं. त्याचं उदाहरण म्हणून एक प्रसंग सांगण्यासारखा आहे—

१२८१५



काय झालं, त्यावेळीं कोल्हापूरला सरस्वती (सिनेटोन)चा “ भगवा झेंडा ” हा बोलपट नुकताच लागला होता; आणि त्या निमित्तानं, शिवाजी महाराजांचं गुरुपद रामदास स्वामींना देऊन, स्वराज्य स्थापनेचं श्रेय रामदासांना देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे, असा वाद जोरानं सुरूं झाला. झालें-- येवढें निमित्त मला पुरें होतं. मी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापण्याच्या कल्पनेचा उगम त्यांच्या बाळपणापासूनच कसा झाला होता, या संबंधींचा एक झणझणीत लेख लिहून तो “ सेवक ” कडे धाडला. पण तो एकदम न छापतां, गणपतरावांनीं मला बोलावून घेतलं आणि सांगितलं कीं, “ दिनकरराव, तुमची भाषा चांगली धारदार आहे. पण तुमच्या प्रतिपादनाला ऐतिहासिक सत्याचा आधार दिल्याशिवाय त्याला वजन प्राप्त होणारे नाहीं. ” असें म्हणूनच ते नुसते थांबले नाहींत, तर माझ्यासाठीं खास जमा केलेल्या बखरी, न. र. फाटक आणि प्रबोधनकार ठाकरे यांचें ऐतिहासिक लेख इ. त्यांनीं मला अभ्यासायला सांगितलें आणि जेव्हां मी त्यांचा आधार घेऊन नवा विस्तृत लेख तयार केला तो गणपतरावांनीं चांगली जाहिरात करून छापला आणि योगायोग पहा---कोल्हापूरच्या लोकांनींहि तो डोक्यावर घेऊन “ भगवा झेंडा ” या बोलपटाला संस्थानांत बंदी आणण्यापर्यंत त्यांची मजल गेली आणि कोल्हापुरांत टीकाकार म्हणूनहि माझा भाव चांगलाच वाढला. मात्र मला एवढी जाणीव होती कीं, मला लेखनाला स्फूर्ति देण्याचं खरं श्रेय गणपतराव जाधवांनाच आहे.

या घटनेनं एक गोष्ट माझ्या चांगली लक्षांत भरली, कीं गणपतराव कडवा विरोध करोत, किंवा हार्दिक सहकार्य करोत–तसें करायला पटणारीं. भरीव कारणं त्यांना लागतात. केवळ स्टंट म्हणून सवंग लोकप्रियतेसाठीं बेगडी देशभक्तीचा जसा ते उदोउदो करणार नाहींत, तशीच ते जनतेच्या रागाला भिऊन आपली प्रामाणिक भूमिकाहि सोडणार नाहींत.

नाहीं; तद्वत विरोधकांनाहि त्यांनीं कधीं कमी लेखलं नाहीं किंवा त्यांच्यावर कसल्याहि दुष्ट हेतूंचा आरोप केला नाहीं. "गणपतराव छत्रपतींचे भाट आहेत, अधिकाऱ्यांचे ते सेवक आहेत," असा आरोप होत असतांनाहि तथाकथित देशभक्तांवर सुद्धां त्यांनीं चुकूनसुद्धां धंदेवाईकपणाचा आरोप केला नाहीं, हें लक्षांत घेण्याजोगं आहे.

मला वाटतं, दुसऱ्यावर हेतूंचा आरोप करणारीं माणसं स्वतःच अधः-पतित असतात. आपलंच प्रतिबिंब त्यांना सर्वत्र दिसतं आणि मग जगाला ते शिव्या देत सुटतात. मग ते राजकीय नेते असोत किंवा वाङ्मयीन वाव-दूक असोत ! यावर कोणी म्हणेल, कीं गणपतराव अगदीं स्वार्थाच्या पलीकडले आहेत काय ? मुळींच नाहीं. स्वार्थाशिवाय कोण आहे जगांत ? पण माणसाची योग्यता ठरते ती त्याच्या स्वार्थावरून नाहीं; तर आपला स्वार्थ साधायला तो ज्या मार्गाचा अवलंब करतो त्यावरून ! गणपतरावांचा मार्ग मी कित्येक वर्षे डोळ्यांनीं पाहिला आहे. "पुढारी ऑफिस ते घर" या मधल्या त्यांच्या मार्गाइतकाच तो सरळ आहे. त्यांत चढउतार आहेत पण वांकडेपणा बिलकूल नाहीं.

वास्तविक, संपादक म्हटला कीं माझी कल्पना पूर्वी निराळी होती. सिनेमाकंपन्यांच्या दारांत तो असायचाच ! पण सिनेमाच्या माहेरघरांत राहूनहि गणपतरावांनीं जाहिरातीसाठीं कधीं निर्मात्यांचे उंबरठे झिजवले नाहींत, किंवा जाहिरात दिली नाहीं म्हणून कोणावर टीकेची झोडहि उठवली नाहीं. जें रास्त असेल तेंच नेहमीं विधायक दृष्टीनें लिहावं हा त्यांचा बाणा आहे; आणि म्हणूनच मी नेहमीं म्हणतों, कीं कोल्हापूरचा दर्जा कोणी कटाक्षानं सांभाळला असेल तर तो गणपतरावांनींच ! हा दर्जा आणि पावित्र्य सांभाळण्याच्या वृत्तीमुळेंच असले, दिखाऊ दयेची, स्वप्नाळू ध्येयाची आणि धंदेवाईक देशभक्तीची त्यांना विलक्षण चीड आहे. कारण, अफाट अशा अज्ञानी आणि दरिद्री वर्गाची खरींखुरीं सुखदुःखं कोणतीं

याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. त्यांची मनोमन श्रद्धा आहे, कीं शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विषमतेमधून बाहेर पडल्याखेरीज बहुजनसमाजाचा तरणोपाय नाहीं. याच विचारामुळें त्यांचें लिखाण वाचतांना कोणाच्याहि ध्यानीं येईल कीं त्यांची तत्वप्रणाली कॉंग्रेसशींच अधिक जुळती असून, श्रमजीवि वर्गाला ते कॉंग्रेसमध्यें जाऊन, तीच काबीज करण्याचा त्यांचा सल्ला आहे.

वास्तविक, कॉंग्रेसचे ते प्रखर टीकाकार आहेत. पण ती टीका आत्मीयतेमुळेंच कळवळ्यानं केलेल्या सत्यासारखी असते. त्याच्या उलट कोणत्याहि जातीय संस्था अथवा संघ यांबद्दलची त्यांची प्रतिक्रिया पाहतां मराठादि समाजांना अशा संकुचित ध्येयापासून दूर राहण्याचाच आग्रह ते सदोदित करीत आले आहेत.

असं असलं तरी गणपतराव जातीय-वादी नसले तरी " जातिनिष्ठ " वाटतात याला कारण आहे. गणपतराव कितीहि ध्येयवादी असले तरी त्यांचा ध्येयवाद आंधळा नाहीं. तत्वाच्या उच्चारापेक्षां आचाराला ते अधिक महत्त्व देतात. म्हणून कोणाच्याहि हें सहज ध्यानांत येईल कीं, गणपतरावांचा टीकाविषय झालेल्या व्यक्तींत तत्व आणि तपशील यांचा कुठंतरी विसंवाद आहे. हा विसंवाद चुकूनहि आपल्यामध्यें आढळणार नाहीं असाहि त्यांचा दावा नाहीं. मात्र अशावेळीं मिस्कीलपणें ते एवढंच म्हणतील कीं, " माझी कृति देशाला कधींच अपायकारक होणार नाहीं. कारण मी कितीहि जातिनिष्ठ झालों तरी मराठा—म्हणजेच बहुजन समाज—इतका विशाल आहे, कीं माझी दृष्टि नेहमींच राष्ट्रीय राहील ! "

हा त्यांचा युक्तिवाद नाहीं, तर खरोखरीच त्यांची तशी श्रद्धा आहे. त्यांच्या या श्रद्धेचा अनादर करून जेव्हां त्यांच्यावर जातिनिष्ठेचा आरोप केला जातो, तेव्हां मला मोठी गंमत वाटते. अशा टीकाकारांचं तोंड बंद करण्यासाठीं मग मी त्यांना एकच गोष्ट सांगतों— काय झालं—

स्त्रीला प्रसूति वेदना होतात कां नाहीं, यावर एकदां वाद माजला. इतका कीं, अखेर बहुमतानं त्या वादाचा निकाल लावावा असं ठरलं. झालं—लगेच त्याप्रमाणं मतमोजणी झाली आणि पंधरा विरूद्ध पांच मतांनीं जाहीर करण्यांत आलं कीं, स्त्रीला प्रसूति वेदना मुळींच होत नाहींत. हा निकाल न पटल्यानें ताबडतोब पांच सभासदांनीं सभात्याग केला, तेव्हां असं आढळून आलं कीं, सभात्याग करणाऱ्या पांच स्त्रिया होत्या आणि बाकीचे सर्व पंधरा पुरुष होते. तरीहि पुरुषांनीं जाहीर केलंच, कीं बहुमताचा निर्णय स्त्रियांना मान्य नसल्यामुळें स्त्री ही लोकशाहीची द्वेष्टी आहे–आणि–

दुर्दैवानं गणपतरावांची भूमिका त्या पांच स्त्रियांसारखी आहे. कारण, पत्रकारांतहि वर्णभेदाचीं सुखं भोगणारे मिरासदारच संख्येनं अधिक आहेत. ही संख्या सारखी होईल तेव्हांच गणपतरावांच्या जीवनकार्याचं खरं मूल्यमापन होईल नाहीं कां ? पण त्याला अवकाश आहे. मात्र या लेखानं त्या कार्याची सुरुवात जरी झाली तरी मला धन्यता वाटेल !

० ० ०

## ५ : मामा

बेनाडीला आमच्या घराला लागूनच गांवदरी आहे ना? पावसाळ्यांत ती जोंधळ्याच्या पिकानं झांकून जाते. कधीं कधीं तंबाखूच्या उभ्या आडव्या सारीपाटानं ती शोभून दिसते; आणि जेव्हां कांहींच पिकं नसतात. तेव्हां आबालवृद्धांच्या क्रीडांगणाचं रम्य स्वरूप तिला प्राप्त होतं. सकाळीं गुरं चारणारीं पोरं तिथं विटीदांडू खेळतात; आणि संध्याकाळीं सूर्य कलतीला लागला कीं शाळेंतले मास्तर मुलांसह तिथं आट्यापाट्या मांडतात खोखो, कुस्त्या यांचीसुद्धां एकच धमाल उडते आणि—

माझं लक्ष मात्र या खेळाकडे कधींच लागलं नाहीं. एक म्हणजे शरीराला त्रास देणारा खेळ कधींच मला आवडला नाहीं; आणि दुसरं म्हणजे मातींत लोळण्यापेक्षां पतंगाशीं आकाशांत विहार करणं मला अधिक पसंत पडे. शिवाय मला असंहि वाटायचं—खेळांत मी रमलों तर सायकल वरून अचानक येणारे मामा मला प्रथम दिसायचे नाहींत—आणि मग किती घोंटाळा होईल! कारण, मामा काय रोज येणारे नव्हते—आले तर दसरा—दिवाळीला आणि सुट्टीला चार दोन दिवसांकरतां ते येणार—

आणि खरंच–असा विचार मनांत चालू असतांच मामांची सायकल मला लांबवर आडीच्या मळ्यापाशीं दिसे. ती दिसली रे दिसली, हातांतला पतंग मी वाऱ्यावरच सोडून देई आणि धांवत जाऊन मामांना रस्त्यावरच गांठे ! हेतु इतकाच कीं, त्यांच्या हातांत असेल नसेल तें आपल्या हातांत घ्यावं आणि त्यांचं ओझं हलकं करून, हरकून साऱ्या गांवाला सांगत सुटावं, " तात्या, मामा आले ! गणूदादा, मामा आले ! काकी, मामा आले ! "

खोटं नाहीं, माझ्या हांकेबरोबर घरांघरांतून बायका–मुलं घाईघाईनं बाहेर दारांत येत आणि सारीं एकमुखानं विचारत— " कवा आलासा, मामा ? "

शब्दापेक्षां गोड हास्यानंच जणूं मामा सर्वांना सांगत, ' आतां हेंच ! ' आणि मग काकींच्या वाड्यांतील आम्हां मुलांचा मुक्काम तिथंच म्हणा ना ! कारण त्यांना जरी आम्ही सारेच मामा म्हणत असलों, तरी ते माझे मामा नव्हते. काकींच्या गणूदादांचे ते खरे मामा होते. पण त्यांचं ऐकून आम्ही मुलंच काय––सारं गांवच त्यांना मामा म्हणत असे––कारण––मामा या शब्दांत जें प्रेम आहे––जी आत्मीयता आहे––जो जिव्हाळा आहे––

हेंच पहा ना––मामा आले म्हणजे सायकलीची घंटी वाजवत कधींच येत नसत. त्यांचे दोन्ही हात असे कांहीं भरलेले असत कीं, आमची अगदीं चंगळ होई ! हंटली पामरचीं बिस्किटं, बुलनचं कोटिंग, शर्टिंगचे नमुने, नव्या फॅशनचीं पातळं यांचं वांटप करतां करतां काकींचा हात अक्षरशः दुखून जाई ! आणि त्यांतच नारळीच्या झाडाला नारळ लटकतात ना ? त्याप्रमाणें मुलांना अंगाखांद्यावर झेलत मामा स्वयंपाकघरांत येऊन बसले कीं कांहीं विचारूं नका. काकींचा आवाज चांगला हुकमी आहे; म्हणूनच मामांचा निभाव लागे–आणि तात्यांशीं, आण्णांशीं किंवा तातू काकांशीं हवापाण्याच्या गोष्टी ते करूं शकत.

मामांचं हें वेड मुलांनाच होतं असं नाहीं. मामा आल्याचं गांवभर

कसं होई कुणाला ठाऊक! काकींचा चहा व्हायच्या आधींच, शिरपूदादांचं चहाचं आमंत्रण येई आणि सारे मास्तर जणुं मोर्चा घेऊन येऊन मामांना म्हणत, "शाळा तरी बघायला चला, शंकरकाका वाट बघत बसलेत शाळेंत!"

आणि मजा म्हणजे, मामा हें सारं अगदीं न गोंधळतां करत. तसा मामांचा मुक्काम बेनाडीला मोजकाच असे–पण वेळांत वेळ काढूनहि ते मित्रांना चहापान करीत. शिरपूदादांच्या घरीं जेवायला जात आणि मुलांबरोबर पुन्हा जोंधळ्याचा हुर्डा खायलाहि हजर! त्यामुळेंच असेल, मामा म्हणजे प्रत्येकाला आपली मालमत्ता वाटे! त्यांना भाऊबीजेचं ओवाळतांना काकींना जेवढा आनंद होई, तेवढाच आनंद वाडीच्या मळ्यांत त्यांना गुऱ्हाळाचा रस पाजतांना आणाप्पा जनवाड्यालाहि होत असे–आणि मामा परत गेले तरी किती तरी दिवस—मी अभिमानानं शाळकरी मुलांना म्हणत असे– "पुन: येणार म्हणालेत मामा मला."

साहजीकच जेव्हां मला कळलें कीं, मामा आतां नुसत्या सणासुदीलाच घरीं येणार नाहींत; तर आपणच कोल्हापूरला त्यांच्याकडे रहायला जाणार आहोंत, तेव्हां आम्हां मुलांना काय वाटलं असेल याची कल्पनाच केलेली बरी! कारण, त्यावेळीं मी मराठी चौथीच्या वर्गात शिकत होतों; आणि गणूदादा चौथी पास झाल्यानें त्यांचें इंग्रजी शिक्षण सुरूं करावें असें घरच्या मंडळींनीं ठरवलें होतें. वास्तविक मामा त्यावेळीं मराठा बोर्डींगमध्यें रहात होते आणि बोर्डींगमध्येंच गणूदादानाहि ठेवतां आलं असतं. पण मामांनीं असा सल्ला दिला आणि आमच्या अण्णांनाहि तो पटला, कीं गणूदादांबरोबरच साऱ्या मुलांनाहि कोल्हापूरला न्यायला काय हरकत आहे? इंग्रजी शिक्षणाचं लोण त्यावेळीं नुकतंच आमच्या गांवाला पोंचलं होतं आणि शिक्षणाचं महत्त्वहि सर्वांना पटलं होतं. कारण, शिक्षणामुळेंच जगद्-गुरुपद शाहू महाराजांनीं आमच्या "बापूंना" बहाल केलं होतं आणि

एक दोन डिगऱ्या घेऊनच कांहीं कुळकर्णी मंडळीहि बेळगांवला नांव मिळवीत होती. त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवूनच मामाहि कायदेपंडित होण्याच्या कक्षेला पोंचले होते; आणि मामाचं अनुकरण हा तर आम्हां मुलांचा धर्म बनला होता.

अर्थात् एका भल्या पहांटे दोन गाड्या भरून आमचा संसार कोल्हा-पूरच्या मोहीमेवर निघाला त्याचा आनंद काय वर्णावा! कागलच्या धर्म-शाळेंत दुपारचीं जेवणं करतांना कोल्हापूरचा स्वर्ग दोन बोटं उरल्यासरखं वाटलं! आणि कोल्हापूरला पोंचतांच मुलांनीं आपल्याकडे रहावं असा आग्रह "बापूंनीं"---क्षात्रजगद्गुरूंनीं---खूप केला; पण मामांचं म्हणणं पडलं, आपण मुलांनीं त्यांच्या वैभवाच्या वाऱ्यालाहि राहूं नये हेंच बरें! कारण, दरबारी रीतीरिवाजाप्रमाणं त्यांचे नोकरचाकर जातां येतां मुजरा करणार! आणि मुजरा घेण्याची संवय लागली, कीं थोरामोठ्यांचा स्वतः-बद्दल गैरसमज होतो; मग मुलांचा काय सहज होईल! त्यापेक्षां शिक्षण अपुरं राहून जगाबद्दलचा गैरसमज झालेला परवडतो; पण दुसऱ्याचा मोठे-पणा आपला समजून स्वतःबद्दलचा गैरसमज होऊं न देणं, अधिक शहाण-पणाचं!

अखेर टाऊनहॉलशेजारीं आमचं बिऱ्हाड स्थापन झालं आणि मामा आमच्या घरांतले कर्ते पुरुष बनले. त्यावेळचा दिनक्रम मला अजून आठ-वतो! सर्वांत आधीं आई आणि काकी उठत; त्यांचं चूलपोतेरं होईपर्यंत मामा मुलांना स्टोव्हभोंवतीं बसवून चहापाणी करीत; जेवणं झालीं कीं शाळा होई आणि संध्याकाळीं अंगणांतल्या जाईजुईला पाणी घालीपर्यंत रात्र होई! त्यावेळीं आमच्या लक्षांतहि आलं नाहीं; पण आज मला नवल वाटतं, कीं मामांनीं स्वावलंबनाची शिकवण किती हंसत खेळत दिली होती. त्यांचे मित्र पी. बी. पाटील, एस. पी. सावंत, पी. के. पाटील अधीमधीं जेवायला असत; त्यांना वाढण्याची मुलांत अहमहमिका चाले! बाजारहाट करण्याची

ईर्ष्या वाटे! मात्र हें सारं काम म्हणून नव्हे–तर प्रेमबुद्धीनं करायला लावण्यांत मामांचा हातखंडा होता. "दिनकर, अमुक एक कर," असं त्यांनीं कधीं म्हटलं नाहीं; पण त्यांनीं कांहींतरी करायला सांगावं असं मात्र मनापासून वाटे! कारण, मामांच्या सहवासांत प्रेमाशिवाय दुसरं कांहींच करतां येण्यासारखं नव्हतं–आणि प्रेम करायचं म्हणजे सेवाच करायची नाहीं कां?

याची ओळख मात्र त्यावेळीं आणखी एका गोड घटनेनं झाली! मामा आम्हां मुलांबरोबर खेळत, बोलत, हिंडत—त्या मुलांमध्यें माझ्या अक्काहि होत्या त्यांच्या लग्नासंबंधींचीं बोलणीं कधीं माझ्या कानांवर आलीं नाहींत. पण जेव्हां अचानक एकदम जाहीर झालं कीं मामांचं लग्न अक्कांशीं होणार! तेव्हां मला वाटतं, अक्कांच्या इतकाच आम्हांलाहि आनंद झाला. मामांचं खूप खूप काम करावं असं सारखं वाटे. आतां तर काय, लग्नाचंच काम उभं राहिलेलं होतं. मला आठवतं, रात्रंदिवस खपून नरसिंग काकांनीं मांडव घातला, अवघ्या मुलांनीं ध्वजतोरणं बांधून तो शृंगारला, आणि लग्नाची अशी काय धमाल उडाली म्हणता, कीं "दत्तू पाटलाच्या पोरीचं लगीन" हा उभ्या गांवच्या चर्चेचा विषय झाला. जो तो म्हणत होता–म्हणत होता कां–कुन्नुर बारवाडपर्यंत आवई उठली होती, "अरे बघ चल! जगद्गुरूनं हत्ती धाडलाय् पोरीच्या वरातीला" तर कांहीं म्हणत, "अरं व्हय–पर हत्ती जाणार कसा रस्त्यानं?"

खरंच, आमच्या बेनाडीचा नकाशा कोणत्या इंजिनियरनं आखलाय कुणास ठाऊक! बैलगाडी काय सरळ जात नाहीं चावडीसमोरच्या मारुतीपर्यंत! मग हत्तीवरल्या अंबारीची वरात पोंचणार कशी? पण वरातीसाठीं लग्न अडलंय् कां कुणाचं? वाटेंत येणारे कोनेकोपरे पाडले घरांचे आणि पुन: बांधून दिले, असा लग्नाचा धडाका चार दिवस गाजला बेनाडीला!

लग्नाच्या या सोहळ्यांत एक गोष्ट माझ्या नजरेंत भरली आणि ती म्हणजे मामांचा मित्रपरिवार! त्या परिवारांत त्यांचे मित्र आहेत; अधि-

कारी व्यक्ति आहेत; त्यांच्या मदतीसाठीं अधीरलेले गरीब लोकहि आहेत. तो पाहिला कीं मनुष्यसंग्रहाची निसर्गदत्त देणगीच मामांना आहे कीं काय, असं वाटूं लागतं. या परिवारांत त्यांचे विरोधकहि आहेत; नाहींत असं नाहीं. पण विरोध करतांनासुद्धां मामांच्याबद्दलचा आदरच ते अधिक प्रकर्षानं प्रकट करतांना आढळतात.

मामांच्या आयुष्यांत मित्रांच्या सहकार्याला आणि प्रतिस्पर्ध्यांच्या विरोधाला व्यक्त स्वरूप आलं, तें मामा सार्वजनिक जीवनांत भाग घेऊं लागले तेव्हांपासून. वास्तविक, सामाजिक जीवन जगण्याची त्यांची संवय कांहीं नवीन नव्हती. त्या संवयीनंच मामा कॉलेजांत असतांना नाटकांत कामं करीत; सभासंमेलनांत भाग घेत, पण जेव्हां ते धंदेवाईक वकील होऊन, कोल्हापूरच्या सामाजिक आणि राजकीय जीवनांत भाग घेऊं लागले तेव्हांपासून विरोधहि त्यांच्या वांट्याला येऊं लागला. याच वेळीं शनिवारांतलं घर सोडून आम्ही शुक्रवारांतल्या मोठ्या घरांत आलों आणि योगायोगानं मामांचा मोठेपणाहि वाढीस लागला. अभ्यासूवृत्तीमुळें वकिलींत जसा त्यांचा जम बसला; तसाच सेवावृत्तीमुळें सार्वजनिक जीवनांतहि ते मोठ्या उमेदीनं उतरले. प्रथम त्यांनीं नगरपालिका आणि इलाखा पंचायत निवडणुका जिंकून काबीज केल्या आणि प्रत्येक ठिकाणीं नव्या नव्या योजना हातीं घेऊन आपली कारकीर्द त्यांनीं संस्मरणीय करून ठेवली आहे. कोणतीहि कारकीर्द पाहतांना मामांचा एक मोठा गुण नजरेंत भरतो आणि तो म्हणजे मामांचं निसर्गप्रेम ! आज कोल्हापूरच्या पुरातन पुष्करणींमध्यें ज्या बागा बहरल्या आहेत; किंवा गारगोटीसारख्या भागांतील जंगलामध्यें जे राजमार्ग दृग्गोचर झाले आहेत, त्यांचं श्रेय मामांनाच आहे.

मामांचं हें निसर्गप्रेम इतकं अनिवार आहे, कीं त्यामुळेंच आम्हांसर्वांनाहि निसर्ग—यात्रा काय कमी पडली नाहीं. येरवीं कोल्हापुराबाहेरहि पडण्याचं कारण आम्हांला नव्हतं, पण मामांचा आग्रह एवढा दांडगा, कीं

त्यामुळेंच सहकुटुंब सहपरिवार त्यांनीं जवळ जवळ साऱ्या भारताचा प्रवास केला आहे. त्यांच्या बरोबरच गोकाकचा धबधबा मी पाहिला; गिरसप्पाचा धबधबा तुडवला; आणि बदामीचं शिल्पहि डोळ्यांत सांठवून, गोकर्णाच्या समुद्रस्नानाचं पुण्य मीं जोडलं आहे. जें जें भव्य आहे तें सारं डोळे भरून पाहावं आणि मन विशाल करावं, असा जणुं त्यांचा पिंडच आहे. एक लोकभिमुख समाजसेवक म्हणून त्यांची नोंद कोल्हापूरच्या इतिहासांत झाली, तरी माझ्या मनावरली त्यांची नोंद मात्र एकच आहे. मामांना निसर्गाचं वेड आहे; आणि निसर्गाच्या खऱ्या लेकरांवर त्यांचं प्रेम आहे! या वेडा-मुळेंच कोल्हापूरला बंगल्यांत राहण्यापेक्षांहि पन्हाळ्याच्या बंगलींत राहणं त्यांना आवडतं आणि पिवळ्या चांपयाच्या झाडाखालीं झोंपून अंतराळीं पाहणं त्यांना मानवतं. "असं कां?" म्हणून कधीं कोणीं त्यांना विचारलं, तर एकच उत्तर देतील–"देवाजवळ क्षुद्रता नाहीं म्हणून!"

क्षुद्रता नाहीं, हीच माझ्या मतें मामांची खरी ओळख आहे. याच बुद्धीनं ते मदत देतात आणि प्रसंगीं विरोधहि करतात, पण हें दोन्हीं क्षुद्र-तेचा अंत करण्यासाठीं! याचा अधिक व्यापक अर्थ समजून घेण्यासाठीं मी एकदां म्हणालो होतों, "क्षुद्रता नको ना? मग तुम्ही बागलांच्या लढ्याला विरोध कां करतां?"

त्यावेळीं माधवराव बागलांचा कोल्हापूरच्या राजसत्तेशीं लढा सुरू झाला होता आणि मामा छत्रपतींच्या बाजूनं उभे होते. वास्तविक, बाग-लांच्या कार्याला तत्त्वतः विरोध नव्हता, पण तपशीलांत छत्रपतींच्या प्रति-स्पर्ध्यांचं जें अनुयायित्व बागलांनीं पत्करलं होतं आणि नकळत आपलं गौणत्व मान्य केलं होतं, त्याला त्यांचा विरोध होता. ते म्हणत, "छत्र-पति हें मराठ्यांचं श्रद्धास्थान आहे. त्या श्रद्धेनं लोकोद्धाराचे सेतु हां हां म्हणतां बांधतां येतील. त्या श्रद्धेचा अंत झाला तर लोकोद्धाराचं एक अमोघ आयुध आपण गमावून बसूं!"

असं म्हणतांना ते पटवून देत कीं, छत्रपतींच्या विरोधकांनीं कांहींहीं म्हटलं तरी शाहू छत्रपति आणि राजाराम महाराज यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक जीवनांत इतकी विलक्षण जागृति झाली आहे कीं, ती साधायला आमच्या पुढाऱ्यांना शेंकडों जन्म घ्यावे लागले असते ! त्यांची अशी प्रामाणिक श्रद्धा आहे, कीं आंधळ्या सत्तेपेक्षांहि अज्ञान हाच जनतेचा खरा शत्रु आहे आणि तो जितक्या लौकर नेस्तनाबूत होईल तेवढा त्यांचा उद्धार समीप आहे.

ही श्रद्धा त्यांच्या ठिकाणीं इतकी गाढ आहे, कीं केवळ याच एका श्रद्धेसाठीं आपलं जीवन यापुढं जगायचं त्यांनीं ठरवलेलं दिसतं ! कारण, राजकीय किंवा सामाजिक कार्यापेक्षांहि शैक्षणिक कार्यावर त्यांनीं सध्यां आपलं लक्ष केंद्रित केलं आहे ; आणि या त्यांच्या प्रयत्नाला गोड फळंहि आलेलीं दिसत आहेत. गारगोटीचं मौनी विद्यापीठ, कोल्हापूरचं पाटणकर हायस्कूल किंवा ताराराणी विद्यामंदिर यांचा वाढता विस्तार पाहिला कीं या ज्ञानाच्या कल्पवृक्षाखालीं उद्यांची जनता अज्ञानाच्या अंधारांतून निश्चितपणें बाहेर पडेल असा भरवंसा वाटतो. निदान मामांना तरी तो वाटत असावा. कारण जेव्हां मी मामांना पाहतों, तेव्हां रात्र असो, दिवस असो, मामा वेड्यासारखे आपले ताराराणी मंदिराच्या इमारतीकडे पहात असतांना दिसतात ! तें पाहिलें कीं ताजमहालकडे पहात बसणाऱ्या म्हाताऱ्या शहाजहानची मला आठवण होते. फरक इतकाच कीं, शहाजहानची मुमताज–ताजमहालमध्यें अखेरची झोपली आहे; मामांची मुमताज–अज्ञानी जनता–या ताजमहालामधून जिवंत होऊन बाहेर पडणार आहे !

म्हणूनच मामांच्यावर माझी आंधळी भक्ति आहे. देवाला कौल लावण्याप्रमाणं फक्त अडचणीच्या वेळींच मी त्यांच्याकडे धांव घेतों, आणि–

मामांच्या शब्दांबाहेर जाण्याचं सामर्थ्य माझ्यांत नाहीं, हे इतरां-

नाहि ठाऊक असावं. कारण जेव्हां घरांत माझ्या लग्नारूवन वादळ उठलं, तेव्हां मला त्यापासून परावृत्त करण्याला कोणीच धजलं नाहीं. फक्त मामाच तें कार्य करूं शकतील असं अण्णांनाहि वाटलं असावं. कारण मला कांहीं न बोलतां ते एवढंच म्हणाले, " जा—मामांनीं भेटायला बोलवलंय तुला ! '

माझ्या काळजांत धस्स झालं ! लग्नाच्या आणाभाका देऊन मी बसलों होतों, आणि आतां मामांनीं विरोध केला तर ? मी भीत भीतच त्यांच्या बंगल्यावर गेलों. तेव्हां घरांत कोणी नव्हतं. आक्कासुद्धां दाराआडच उभ्या होत्या. मामांनीं मला " बैस " म्हणून पहिला प्रश्न विचारला, " काय रे, प्रेमांत पडलायस म्हणे तूं. "

मी कांहीं बोललों नाहीं. डोळ्यांत येऊं पाहणारे अश्रु मी आडवीत होतों. ते पुढें म्हणाले. " पडण्यापेक्षां प्रेमांत तूं चालावंस अशी माझी इच्छा आहे. "

मी प्रश्नांकित नजरेनं त्यांच्याकडे पाहिलं. मामा येवढंच म्हणाले, " मला वाटतं, ग्रॅज्युएट झाल्याशिवाय तूं लग्न करूं नयेस हें बरें ! कारण बापाच्या इच्छेविरूद्ध तूं लग्न केलंस, तर बापाच्या अन्नावर तूं जगूं नयेस हें एक—आणि बी. ए. व्हायला दोन वर्षं लागतील हें दुसरं ! दोन वर्षं आपलं प्रेम टिकतं कां नाहीं, हेंही तुला पाह्यला मिळेल ! "

मी कांहींच बोललों नाहीं. मात्र मला प्रथमच जाणीव झाली कीं, प्रेमाच्या भरवंशावर जीवनसंग्रामाला मला सिद्ध व्हायचं आहे. मामांचा माझ्या प्रेमाला विरोध नाहीं—बस ! मग ती गोष्ट मला केलीच पाहिजे. या निर्धारानं मी पदवीधर झालों आणि लग्नाकरितां आशीर्वाद मागायला सरळ त्यांचे पाय धरले ! मी घराबाहेर पडलों होतों पण मामांचा आधार मला हवा होता. आक्कांनींही तें ओळखलं होतं. त्या म्हणाल्या—" जा—वरातीचं नारळ मात्र बाहेर कुठं ठेवूं नकोस ! "

त्यांना अधिक बोलतां आलं नाहीं. लग्नाकरतां नर्सोबाच्या वाडीचं

तीस मैल अंतर मी अश्रु पुशीत काटलं ! देवाब्राह्मणांच्या साक्षीनं आमच्या डोक्यावर अक्षता पडल्या आणि मीं बाहेर पाहिलं–रात्र झाली होती. पाऊस धो धो पडत होता. सुमनला बरोबर घेऊन मी वादळीवाऱ्यांत कोल्हापूरला आलों. मध्यरात्र झाली होती. सारं कोल्हापूर शांत झोपलं होतं. फक्त मामांच्या माडीवर दिवा जळत होता. मोटारीचा हॉर्न वाजतांच मामा धांवत खालीं आले. आम्ही त्यांच्या पाया पडलों. आक्कांनीं देवासमोर नेलं, आणि देवासमोर ओटींतला नारळ ठेवतांच सुमनला त्या म्हणाल्या–" हें घर –पाटलाची सून सोन्याच्या पावलानं आली पाहिजे ! " आणि असें म्हणून आपल्या हातांतलें सोन्यांचे बिलवर त्यांनीं सुमनच्या हातांत चढविले ! हें उदार अंतःकरण आक्कांचें होतें–आक्का मामांच्या होत्या–आणि मामा आमचे होते ! मला किती धन्यता वाटते, कीं ते अजुनी माझे आहेत. कारण तेव्हांपासूनच सिनेमाच्या क्षेत्रांत मी आयुष्याचा संग्राम पत्करला आहे. त्या संग्रामांत विजय–पराजय दोन्ही मी सोसतों आहे. पण सारखं वाटतं–मामांना याचं काय वाटेल ? पण तें सुद्धां पडताळण्याची संधि मला मिळाली. परवांच कांहीं दिवसांपूर्वी ना. भाऊसाहेब हिरे यांनीं कोल्हापूरला भेट दिली असतां, त्यांच्याशीं माझी ओळख करून देतांना मामा म्हणालेलं मी कधीं विसरणार नाहीं. " हा माझा मेहुणा आहे. याचा मला अभिमान वाटतो. "

मामांचे हे शब्द आठवले कीं डोळ्यांत पाणी तरारतं माझ्या ! कारण—का कुणास ठाऊक, दुःखापेक्षांहि आनंद झाला कीं, डोळ्यांत लौकर पाणी येतं माझ्या ! !

° ° °

कोल्हापूरचे सुप्रसिद्ध शिक्षण प्रेमी
आमदार श्री. विश्वनाथ तुकाराम पाटील
बी. ए. एल्. एल्. बी.
यांचे भाव चित्र.

# ६ : तात्या

पुण्या–मुंबईच्या लोकांना मी कोल्हापूरचा असं सांगतों; पण जेव्हां मी कोल्हापूरला जातों तेव्हां मात्र माझं मन कोल्हापूराबाहेरच ओढ घेऊं लागतं. मी कोल्हापुरला अगदीं प्रथम आलों, तेव्हांचे दिवस मला आठवतात आणि नकळत वीसपंचवीस वर्षांपूर्वींचा प्रवास माझं वेडं मन करूं लागतं.

" कागल निप्पाणी संकेश्वर–चला निघाली–निघाली ! " म्हणून हॉटेलांतल्या फोनोशीं स्पर्धा करणारे मोटर–एजंट मला आठवतात. खरोखरीच रोजच्या प्रवाश्यांवर त्यांचं केवढं प्रेम असे ! अगदीं आपुलकीच्या हक्कानं ते त्यांची ट्रंक आणि वळकटी उचलीत; आणि " साहेब, या बसा. फ्रंट सीट तुमच्यासाठींच रिकामी ठेवलीय अजून ! " म्हणून वळकटीला टपावर आणि साहेबाला पुढच्या सीटवर ते अक्षरशः फेंकून देत. त्यांत त्रास असे–पण सध्यांच्या एस. टी. ची बेपर्वाई खात्रीनें नसे. सारा प्रेमाचा कारभार !

आणि मग आमच्या महागांवकरांच्या " लक्ष्मी मोटार सर्व्हिस " ची टपालगाडी ड्रायव्हरनं क्लिनरला " हां, माणसं मोजून बसव " म्हणून इषारा

दिला कीं, रस्त्याच्या टांगेवाल्यांना शिव्या देत गांवाबाहेर चालूं लागे. रेल्वेच्या फाटकाजवळचं टेंबलाबाईचं वळण सोडायचा अवकाश, ड्रायव्हरनं मोटार टॉपमध्यें टाकली, कीं धारेला लागलेल्या नावेप्रमाणें लक्ष्मीमोटार कागलला पोंचे आणि ड्रायव्हरला सिगरेट देऊन कागलचं पान रंगायच्या आंत मागचा क्लीनर एकदम बोंब ठोकायचा—"सौंदळगं आलं. पाटील, उतरा खालीं !"

खरंच, मोटार पुलाजवळच्या गर्द चिंचेच्या झाडाखालीं उभी असायची; आणि मी आंत रेटणाऱ्या फौजदारसाहेबांना बाहेर रेटत खालीं उतरायचा. त्याबरोबर माणसाला बघून माकडं झाडावर चढतात ना ? त्या सफाईनं लेकाचा क्लीनर टपावर चढायचा आणि माझी वरची सायकल अशा कांहीं कौशल्यानें अलगद खालीं सोडायचा कीं, ती टणकन् उडी घेऊन बरोबर माझ्या हातांत यायची.

उगीचच घंटा वाजवून सायकलीवर टांग टाकायची मला संवय असे आणि मग माझी बी. एस. ए. अशा रुबाबांत सौंदळगे गांवांतून बाहेर पडे, कीं आसपासच्या कौलार घरांतून कोणी बाहेर डोकावयाच्या आंतच मी बेनाडीच्या रस्त्याला लागे ! पुण्या-मुंबईला डेक्कन क्वीननं मी आजकाल कैक फेऱ्या मारतों; पण त्यावेळच्या सायकलच्या प्रवासाची सर कशालाच नाहीं ! वारा पाठीमागून असा ढकलायचा कीं, अगदीं वाऱ्याच्या वेगानं माझी सायकल मल्लयाच्या डोंगराचं वळण घेई आणि आडीजवळ ओढ्यावरल्या झुबकेदार झाडींत ती बराच वेळ अदृश्य होई. त्या लिंबाच्या दाट सांवलींतून मी बाहेर पडायचा अवकाश—

सायकल चढाला लागली, कीं समोर माझी बेनाडी दिसूं लागे ! डाव्या बाजूच्या माळावरच लिंगायत पाटलांनीं घर बांधलेलं होतं, तें किती तरी दिवस तसंच आहे. त्या माळाच्या पायथ्याशीं पोंचलं रे पोंचलं, उजव्या बाजूच्या आमच्या मान्यांच्या शेतांतून आमचा रयत यल्लू देशिंगे ओरडा-

यचा—" या पाटील ! आण्णा ( माझे वडिल ) आतांच गेलं सवळाला ! " मग मी डावीकडे नजर टाके आणि सवळाच्या हिरव्यागार मळ्यांत जनवाड्याचं पोर मोट मारतांना मला दिसे.

पण वाटेंत थांबण्याचा मोह मात्र मला कधींच होत नसे. वाटायचं घरांत पोंचल्याशिवाय कांहीं खरं नव्हे; आणि या विचारानं घसरटीलासुद्धां मी जोरांत पाय मारी आणि माझी सायकल बाणासारखा रस्ता कापी. दोन्ही बाजूला बाभळीची अशी गर्द झाडी होती, कीं पिवळ्या फुलांची जणुं रांगोळीच घातलेली असे ! तिच्या घमघमाटांत बाभळीचा डिंक खाण्याची लहर उचल खाई ! पण छे—ती खोड आतां मला शोभण्यासारखी नव्हती. कारण, वाटेवरच शिरपूदादांनीं नवी विहीर काढली होती आणि तिच्या पंपावरल्या पिठाच्या गिरणींत गांवांतल्या बाया बापड्या पाळीचं दळण घेऊन उभ्या असत—त्यांच्या नजरा बघून मलाच लाजल्यासारखं होई आणि मी तारेवर कसरत केल्याप्रमाणं समोरच्या खडकाळ ओढ्यांतून मार्ग काढून गांवच्या अगदीं जवळ येई.

माझा ऊर अगदीं भरून येई. प्रत्येक खेपेला माझा गांव मला नवीन वाटे. मोटार सर्व्हिस सुरू झाली म्हणून गांवदरींतच एकादं हॉटेल सुरूं झालेलं असे—तर कुणाची तरी नवी सून पाण्याला चाललेली असे; ती लाजून कुंपणाकडे झुकली कीं, तिच्या हातांतला चुडा लालभडक लुगड्यावर किती शोभून दिसे ! गांव लहानच पण वाड्यांनीं इतका झांकून टाकला होता कीं पडक्या—वेशीवर पोंचेपर्यंत आबा पाटलाच्या वाड्याच्या मंगलोरी कौलाराशिवाय दुसरं कांहींच दिसत नसे. म्हणूनच वेशीवरल्या वाड्याला कधीं एकदां वळसा घालीन असं मला व्हायचं आणि——

आणि काय—हां हां म्हणतां मी आमच्या घराच्या भव्य तटासमोर हजर व्हायचा ! त्याच्या दिंडींतून मी आंत डोकवायचा अवकाश— तुळशीला पाणी घालायला जाई ( तात्यांच्या पत्नी ) परसांत आलेल्या असा-

यच्या. त्यांना मी नेमका कसा दिसे कोण जाणे ! " दिनकरराव आले हो " म्हणून पूजा टाकूनच त्या साद घालायच्या आणि त्याबरोबर डाव्या बाजूच्या दारानं जिवाची धांदल करीत एक किरकोळ व्यक्ति बाहेर पडायची. " सायकल राहूं दे तिथंच. आणील अण्णा जा " म्हणून मला कांहीं करूं न देतां ते मला ओढतच आंत नेत आणि सोप्यांत आलो रे आलों, " अग, घोंगड्यावर सतरंजी तर टाक. आते, तुझ्या जगद्‌गुरूंचा तक्क्या दे बाई. " म्हणून अशी कांहीं आंतबाहेर करत, कीं मी अगदीं गोंधळून जाई ! अखेर त्यांच्या मनाप्रमाणं झालं म्हणजे कुठं ते स्थिर होत आणि " बायाक्का ( माझी आई ) केव्हां येणार–जयसिंग ( माझा भाऊ ) आला नाहीं ! " हा त्यांचा पहिला प्रश्न असे. पण त्याला उत्तर देण्यापेक्षां पंढरीचा वारकरी विठोबाच्या पायांवर मस्तक ठेवतो ना त्या भक्तिभावानं मी त्यांच्या पायाला हात लावी; आणि मला वाटे, मी धन्य झालों ! मला केवढ्या प्रेमानं उठवून ते उराशीं धरत ! कां कोण जाणें, तात्यांचा हा प्रेमळ स्पर्श झाल्याशिवाय मी बेनाडीला आलों असं मला कधींच वाटलं नाहीं.

तात्यांच्याशिवाय बेनाडीला अस्तित्व नाहीं, असं मला वाटायचं; त्याला कारणंहि तशींच होतीं. इंग्रजी शिकण्याकरतां म्हणून लहानपणींच आम्ही बेनाडी सोडलें आणि कोल्हापूरला आलों. पण त्यावेळेपर्यंत आमचं घर म्हणजे तात्यांचा संसार असाच माझा समज होता. कारण, माझे वडील जरी बेनाडीकर असले, तरी बेनाडीला त्यांचं वास्तव्य कधींच नसे. कुणाचा खटला आहे, जा चिकोडीला; दळवी वकिलांची निवडणूक आहे, रहा बेळगांवला. अशी आण्णांची मुशाफिरी सदैव चालू असे; आणि ती आजतागायत अखंड चालू आहे. साहजीकच त्यांच्यापेक्षां तात्यांचा लळा मुलांना अधिक होता. सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंपेपर्यंत तात्यांच्या जणुं देखरेखीखालीं आम्ही वाढत होतों.

मला आठवतं, सकाळीं मी जागा होई, तेव्हां समोरच्या गरडाच्य ।

घरांत जात्यांची घरघर ऐकूं येई; आणि ती थांबायचा अवकाश, पाठोपाठ तात्यांचं श्लोकपठण सुरूं होई. तें ऐकत मी किती वेळ तरी अंथरुणांत लोळत पडे, तें तात्यांनीं " दिनू ऊठ बघूं " म्हणून पाठीवर प्रेमाचा हात फिरवला कीं उठे आणि आंघोळीचं पाणी तापवायच्या चुलीसमोर बसून थंडी घालवली कीं दप्तर घेऊन शाळेला जाई ! तात्यांना स्वतःचीं दोन मुलं होतीं; तरीहि आपलीं मुलं व भावाचीं मुलं असा भेदभाव त्यांनीं कधीं केला नाहीं. जितक्या आस्थेनं ते स्वतःच्या मुलांना शिकवत, त्यांचं खाणंपिणं बघत; तितकंच आमच्याही खाण्यापिण्यावर त्यांचं लक्ष असे. सर्वांनीं शिकावं, शहाणं व्हावं म्हणून कसलाहि दुजाभाव न धरतां ते शिकवत आणि जेव्हां गणितांत माझी एकादी चूक होई, तेव्हां माझी ईर्ष्या जागृत करण्यासाठीं ते म्हणत, " मर्दा, दत्तू पाटलाचा मुलगा तूं ! ठाऊक आहे कां, बेळगांव जिल्ह्यांत पहिला आला होता तुझा बाप ? "

अशा तऱ्हेनं—आमच्या खाण्यापिण्यांत आणि शाळेंतच त्यांचं लक्ष असे, असं नाहीं. तर १० वाजतां आम्ही शाळेंतून परत आल्याबरोबर ते आम्हांला घरांत आंघोळहि करूं देत नसत. नरसिंग काकांना ते म्हणत, " जारे, पोरांना पोहायला घेऊन जा कसा. बारडीभर पाण्याची आंघोळ चांगली नव्हं. " आणि मग तळ्यांत, तर कधीं विहिरीवर उनाडक्या करून आम्ही आलों कीं त्यांना बरं वाटे, आणि एकाच पंक्तींला बसवून पोटभर खाऊं घातलं, कीं मग ते आराम करीत ! शाळेचा अभ्यास तर ते घेतच. पण त्यांच्या आवडीची " ज्ञानेश्वरी " व " तुकारामाची गाथा " यांचेहि पाठ ते आमच्या माथीं मारत. आम्हांला त्यांतलं काय समजतं आणि काय नाहीं, याची पर्वाहि ते करीत नसत. ते आपले सांगतच सुटत—

" म्हणे बिभीषण शहाणा, परि तो महामूर्ख जाणा !
...काय तो रामाशीं भेटला, भेटुनी रामचि नाहीं झाला ? "

आपल्याइतकेंच आम्हींहि त्यांच्या अध्यात्मांत लक्ष घालावं असा

त्यांचा आग्रह असे; आणि त्यासाठीं रात्रीं एकनाथा न्हाव्याचे घरीं " ज्ञानेश्वरी " सांगतांना आपण कोणकोणते दृष्टांत समजावून देणार आहोंत, याची रंगीत तालीमहि ते करीत–आणि वाद जिंकल्याच्या अविर्भावानं म्हणत—' अरे, कसले तुमचे फडके खांडेकर ! आमचा तुकाराम आणि ज्ञानेश्वर वाच ! ! "

त्यावेळीं तात्यांचं मीं ऐकलं नाहीं. पण तात्या असं आग्रहानं कां म्हणत, हें नंतर मला कळलं ! नक्की साल मला आठवत नाहीं. पण एके दिवशीं रात्रीं तात्यांनीं मला आपल्या खोलींत बोलवून घेतलं आणि त्यांचा दुःखीकष्टी चेहरा पाहून मी घाबरलों. तात्या आपले दुःखाचे कढ आवरत होते. ते मला म्हणाले, " तुझ्या बापाची मला काळजी नाहीं. तो मुलखाचा वांड आहे. झाडाखाली जेवल आणि आभाळाखाली झोपल तो " असं म्हणून त्यांनीं आपले डोळे पुसले आणि मला उराशीं धरून म्हणाले ते, " पण मला काळजी वाटते बायकाची– तुम्हां पोरांची ! "

आणि असं म्हणून त्यांनीं मला पहिल्यांदा जाहीर केलें कीं, आबा पाटलांनीं दावा साधला. एक नवाच दत्तक त्यांनीं आमच्या घरांत घातला असून, आमचा अर्धा घांस काढून घेण्याचा त्यांचा डाव आहे. त्यावेळीं मला फारसं कळत नव्हतं, पण येवढं आठवतं कीं, तेव्हांपासून अण्णांनींहि जमिनींतलं लक्ष काढलं आणि आपल्या हातांनीं पाळलेल्या डाळींबाच्या आणि मोसंबीच्या बागा त्यांनीं उन्हातान्हांत वाळूं दिल्या. शंकराला तांबडी फुलं आवडतात; म्हणून वाटेवरल्या भाविकांनीं " मल्लैय्या " करतां डाळींबाचीं फुलं तोडलीं तरी त्यांना आडवलं नाहीं, किंवा मोसंबीचीं झाडं राखण्याकरतां शेताला कुंपण घातलं नाहीं. अण्णांच्या या वागण्याचा अर्थ तात्यांनीं ओळखला असावा. ते मला म्हणाले, " वाईट वाटून घेऊं नकोस. दत्तकाचं बारसं जेवलाय् तुझा बाप. आपल्या हयातींत त्याला कवडी लाभूं देणार नाहीं तो. तुम्ही मात्र लौकर मोठे व्हा ! " आणि झालंहि तसंच.

मला कळतं तसं, दत्तकाच्या खटल्याकरतां अण्णांनीं आपलं अर्धं आयुष्य खर्ची घातलं आणि हायकोर्टाचा निकाल दत्तकाच्या बाजूनं लागला, तरी दत्तकाला घराबाहेरच दारांत उभा केला. अखेर कूळकायद्याच्या भीतीनं दत्तकच आपसातीला आला आणि वाडवडलांच्या भांडणाचं लोण पिढ्यान् पिढ्या चालूं नये म्हणून आम्ही मुलांनीं तें प्रकरण संपवलं! अशा तऱ्हेनं दत्तकाचं पर्व संपलं तेव्हां मला तात्यांची तीव्रतेनं आठवण झाली आणि वाटलं, आज ते असते तर त्यांना दुःखांतहि केवढा दिलासा वाटला असता!

पण त्यांनीं दिलासा अगदीं वेगळ्याच पद्धतीनं मानला होता. एक म्हणजे जगाकडे कांहींशा स्थितप्रज्ञेनं पहायला ते शिकले होते; किंवा देवानं त्यांना पहायला लावलं होतं म्हणा. कारण फक्त दोनच मुलं त्यांना होतीं; तरी त्यापैकीं एकाला लहानपणींच बालग्रहाची बाधा होऊन तो वेडसर झाला होता. त्याला शहाणा करण्यासाठीं त्यांनीं जिवाचा आटापिटा केला. पण तें मुलाबद्दलचं बापाचं कर्तव्य म्हणूनच! कारण त्याबद्दल कुणी खेद व्यक्त केला कीं, ते म्हणत—" देव दयाळू आहे बाबा. माझा एक मुलगा वेडा झाला, तरी दुसरा धड आहे हें काय कमी आहे?"

पण तात्यांनीं पूर्वजन्मीं काय पातक केलं होतं देव जाणे! जेव्हां मला कोल्हापुरांत कळलं कीं, तात्यांचा दुसरा मुलगाहि फार आजारी आहे तेव्हां आमच्या सर्वांच्या काळजांत धस्सं झालं! स्पेशल मोटारी कोल्हापुराहून सुटल्या!! मामा तर (खासदार व्ही. टी. पाटील) डॉक्टरना घेऊन कुटुंबियांसह धांवले.

गांवीं पोचलों तेव्हां घर शांत होतं. डॉक्टरनीं धाकट्या "काकासाहेबाला" पाहिलं. मला मात्र त्याला पाहवलं नाहीं. त्याची इवलीशी छाती लोहाराच्या भात्याप्रमाणें हालत होती. त्याची आई वेड्यासारखी रडत होती.

आणि तात्यांच्या काळजांत कालवाकालव होत होती. मामांनीं डॉक्टरकडे पाहिलं, तेव्हां त्यांना बाजूला नेत डॉक्टर म्हणाले, " तीन दिवस खात्री देत नाहीं मी. त्याला ऑक्सिजन दिला पाहिजे. "

तात्काळ त्याला उचलण्याची मामांनीं तयारी दर्शविली; पण डॉक्टरनीं सांगितलं, कीं तो हालवण्याच्या अवस्थेंत नाहीं. तेव्हां क्षणाचाहि विलंब न करतां डॉक्टरसह आम्ही कोल्हापुरला धांवलों; आणि ऑक्सिजन घेऊन परतलों. पण वाटेंतच माळावर आम्हांला निरोप पोंचला कीं, — "डॉक्टरना परत पाठवा ! "

झालं ! देवानं तात्यांच्यावर मरणापेक्षांहि मोठा भयंकर प्रहार केला होता ! आम्ही गेलों तेव्हां तात्या अंथरुणावरच पायांत डोकं खुपसून बसले होते. आम्ही दिसतांच त्यांना भान राहिलं नाहीं. " दिनू, तुझा काका साहेब गेला रे " म्हणून ते ढसाढसा रडले—अगदीं लहान पोरासारखे रडले. तें पाहून काळालाहि वाटलं असतं कीं देवानं तात्यांचं इतकं वाईट करायला नको होतं. ज्यांनीं कोणाच्याहि मुलांवर प्रेमाशिवाय दुसरं कांहींच केलं नाहीं, त्यांच्याच पोराला देवानं अचानक उचलून न्यावं ! खरंच असं कांहीं पाहिलं, कीं देव मुलं देतो कां ? याचाहि बोध होत नाहीं मनाला.

पण आमच्या आधीं तात्याच जगाला सांगूं लागले, " माझा एक मुलगा वेडा आहे. दुसरा देवानं नेला आहे. बाकींचीं तर धड आहेत. " म्हणून आम्हांला ते योपटीत आणि पूर्वी इतक्याच निर्विकारपणें तुकारामाचे अभंग सांगत—

" काय तो झाला लंकापति
नाश होईल कल्पांतीं "

तेव्हां मात्र मला खरोखरीच वाटलं कीं आयुष्याच्या उतारावरहि तात्यांना धीर देणारीं पुस्तकं आपण वाचलीं पाहिजेत. म्हणून एका सुटींत

मी त्यांचं पुस्तकाचं कपाट उघडलं आणि ग्रंथ चाळूं लागलों. तेव्हां मला आश्चर्याचा धक्काच बसला ! त्यांतल्या कपाटांत ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम हे तर होतेच--पण त्यांच्या सोबतीला आमचीं शाळेंतलीं प्रगति पुस्तकं होतीं. परीक्षांचे निकालहि होते. माझा नुकताच प्रसिद्ध झालेला " कोवळीं किरणं " हा कथासंग्रहहि होता. मी तो पाहून शरमून म्हटलं, " तात्या, फडके खांडेकरांना तुम्हीं नांवं ठेवतां आणि माझं पुस्तक सांभाळतां, हें आश्चर्य आहे. "

तेव्हां ते म्हणालं मला आठवतं, " अरे, तूं मोठा व्हावंस असं मला नेहमीं वाटतं ना. म्हणून मोठ्यांच्या बरोबरीनं मी तुला ठेवतों. कारण आपल्या घराण्यांत पुष्कळांनीं नांव काढलं. तुझा बाप कलेक्टरच्या बरो-बरीनं हिंडला, चुलता जगद्गुरु झाला आणि मामा वकील गाजला ! आमच्या घरांत लेखकच कोणी नव्हता. तो तूं झालास ! "

माझ्याबद्दलचा त्यांचा हा अभिमान आंधळा होता, हें जरी खरं असलं; तरी त्यांना मनापासून वाटे, कीं मी कांहींतरी चांगलं करावं ! म्हणू-नच जेव्हां मी लग्नाच्या वेळीं वडलांशीं विरोध पत्करला, तें त्यांना रुचलं नाहीं. पण जेव्हां प्रेमाशीं प्रतारणा करणंहि मला शोभणार नाहीं हें त्यांना मी पटवून दिलं, तेव्हां ते शांत झाले आणि रागावायला आले असतां आशीर्वाद देऊनच गेले.

यानंतर मात्र त्यांच्या माझ्या भेटी दुर्मीळ झाल्या. कारण, याच सुमारास मी नवयुग चित्रपट कंपनींत नोकरी धरली आणि मी कै. विनायक-रावांच्याबरोबर पुण्याला गेलों. एक वर्षांतच विनायकरावांनीं प्रफुल्ल पिक्चर्स ही नवी संस्था काढली आणि मी पुन्हां परतलों. मात्र मला अतिशय वाईट वार्ता समजली कीं, तात्यांना कॅन्सर झाला असून मिरजेला त्यांचं ऑपरेशन झालं आहे. त्यांना भेटायला जाणं माझं कर्तव्य होतं; पण

आज उद्यां करतां करतांच एके दिवशीं मी पाहतों तर तात्याच माझ्या दारांत हजर !

तात्या म्हातारे झाले हें मला दिसत होतं. पण त्यांच्या हातांत काठी मी कधींच पाहिली नव्हती. प्रथमच ते काठी टेकीत टेकीत आलेले मी पाहिलं आणि माझ्या काळजांत चर्रर झालं ! मी त्यांना पाहण्याऐवजीं तेच मला पाह्यला आले होते. मी त्यांना हात देऊन आंत घेतलं; आईनं त्यांना बसायला पाट दिला. इकडच्या तिकडच्या औपचारिक गोष्टी झाल्या, तेव्हां तेच म्हणाले—" मी गांवाला चाललोंय् दिनू ! म्हटलं जाण्यापूर्वी तुझा संसार बघावा. "

पाळण्यांत नुकतीच जन्मलेली माझी पहिली मुलगी आशा झोंपली होती. आईनें आपल्या सुनेला म्हटलं, " सुमन, मुलगी दे बाई त्यांच्या हातांत. " तेव्हां सुमनहि आशाला घेऊन पुढं झाली मात्र—तात्या म्हणाले, " लांबच ठेव. लांबूनच बघतों मी. मी आतां चाललों आहे. माझी सांवली नको तिच्या अंगावर. "

तात्यांचे ते शब्द ऐकल्याबरोबर माझे भावनांचे अभेद्य बांध फुटले. मी मुलासारखा रडूं लागलों. आई रडायला लागली आणि सुमनलाहि मग राहवलं नाहीं. तेव्हां तेच सर्वांना म्हणाले, " वेड्यानों, रडता कां ? तुमचा संसार बघून हंसायला मी आलों आणि तुम्हीच रडता ? "

मी ऐकलेले तात्यांचे हे अखेरचे शब्द ! त्यानंतर त्यांना बघायला म्हणून एकदां मी बेनाडीला गेलों खरा ! पण तात्या तेव्हां कांहीं बोलूं शकत नव्हते. देवाच्या खोलींत फक्त जीर्ण देह धगधगत होता. तें दृष्य डोळ्यांना असह्य होऊनच मी कोल्हापुरला परतलों —आणि—

पाठोपाठ बातमी आली कीं तात्या गेले !

हो, तात्या खरंच गेले होते. आई, वडील, मामा सारे हातांतली कामें

टाकून बेनाडीला धांवलीं. मला मात्र कोणी बरोबर " चलहि " म्हटलं नाहीं आणि मीहि येण्याचा हट्ट धरला नाहीं नेहमींप्रमाणं ! कारण—माझं काय होतं आतां त्या बेनाडींत ?

मी गेलों नाहीं. कारण, माझी खात्री होती. तात्या धांवत पळत माझं स्वागत करणार नाहींत; कां मला त्यांच्या पायांवर मस्तक ठेवतां येणार नाहीं. तात्या सोप्यांत नसणार. तात्या देवघरांतहि नसणार——

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३८९५ वि: चारित्र
क्रमांक १०८३ नों. दि. २३.११.६२

## ६ : भालजी

कै. मा. विनायकांचा नि माझा बालपणापासूनचा परिचय असल्यानें श्री. भालजी पेंढारकर आणि बाबुराव पेंढारकर यांचाहि माझा चांगलाच परिचय असावा, असा अनेकांचा समज आहे. म्हणूनच त्या उभयतांसंबंधीं जेव्हां कांहीं खाजगी माहिती पाहिजे असते, तेव्हां बरेच लोक माझ्याकडे चौकशी करतात. पण जेव्हां मी " खरंच, मला कांहीं माहीत नाहीं. " असें उत्तर देतों, तेव्हां त्यांना तें खरें वाटत नाहीं. त्यांना वाटतं, मी मुद्दाम कांहीं गोष्टी त्यांच्यापासून लपवतों आहे. वास्तविक, कांहींहि लपवण्याचा माझा हेतु नसतो आणि मला वाटतं, कांहीं लपवण्याचा त्या उभयतांचाहि स्वभाव नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे, कीं विनायकांशीं दृढ परिचय होऊनहि माझा भालजी–बाबुरावांशीं तसा फार कमी संबंध आला; आणि जो कांहीं आला–तो धंद्याच्या निमित्तानंच येऊन, तुलनात्मक दृष्ट्या पाहतां भालजींशींच त्यांतल्या त्यांत जरा अधिक आला इतकंच ! नट म्हणून बाबुरावांनीं माझ्या एकदोन चित्रांत कामं केलीं आहेत; " जयमल्हार "च्या वेळीं लेखनाच्या कामीं त्यांचा सल्ला मला मिळाला आहे; असं असलं तरी,

स्टूडिओचे मालक म्हणून भालजी पेंढारकरांशीं माझा त्याहिपेक्षां अधिक काळ संबंध आला आणि तो तेवढ्याच प्रकारें मर्यादित राहिला आहे, याचं अनेकांना आश्चर्य वाटतं. नव्हे, माझं मलाहि आश्चर्य वाटतं.

वास्तविक, अन्य प्रकारेंहि त्यांच्या संगतींत जितकं जातां येईल तितकं जावं, अशी माझी फार इच्छा होती. मला आठवतं—जसं विनायकांचं नांव मी प्रथम "विद्यापीठांत" शिक्षण घेतांना ऐकलं; त्याच प्रमाणं भालजींचं नांवहि मी विद्यापीठांतच ऐकलं. त्यावेळीं विद्यापीठाला आर्थिक सहाय्याची गरज होती— शिक्षणसंस्थांना ती नेहमींच असते—आणि ती भागवण्याकरतां वर्षातून एकादं नाटक बसवण्याची विद्यापीठांतील कलाप्रेमी शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची प्रथा होती. त्या प्रथेला अनुसरूनच, मला वाटतं, भालजींनीं त्या वेळीं "क्रांतिकारक" हें नाटक लिहिलं होतं आणि विद्यापीठानं तें आर्थिक मदतीसाठीं रंगभूमीवर आणलं होतं. त्या नाटकाचा विषय अथवा प्रतिपादन मला आतां फारसं आठवत नाहीं. पण एवढं नक्की आठवतं, विनायकांनीं त्यांत दरोडेखोराची भूमिका केली होती; आणि भालजींनीहि त्यांत छोटीशीच पण अत्यंत प्रभावी अशी एका महारोग्याची भूमिका केली होती.

त्यावेळीं भालजी हे लेखक म्हणूनच अधिक प्रसिद्ध होते; आणि मला वाटतं—अनेक मुक्या चित्रांचं दिग्दर्शनहि त्यांनीं केलं असावं. भालजींच्या लेखणीचा जहालपणा मुक्या जमान्यांतहि प्रतीत झाला होता; इतका कीं "वंदे मातरम्" हें त्यांचं मुकं चित्र त्यावेळीं सेन्सॉरच्या रोषाला बळी पडलं होतं. आज संवाद—गाणीं—आणि पार्श्वसंगीत यांच्या भडकपणानं एकादं दृश्य आक्षेपार्ह ठरावं, हें पटतं; पण मुक्या जमान्यांतहि भालजींचीं वाक्यें पडद्यावर टिकूं शकलीं नाहींत, यावरूनच त्यांच्या लेखणीची दाहक प्रकृति लक्षांत भरते. त्यावेळीं स्वातंत्र्याची चळवळ शिगेला पोंचली होती; आणि "वंदे मातरम्" हा भारताच्या स्वातंत्र्याच्या परवलीचा शब्द

ठरला होता. साहजीकच, त्यांच्या " वंदे मातरम् " या चित्राला सरकारी रोषाचा फटकारा बसतांच, आम्हां प्रेक्षकांना भालजींबद्दलच्या प्रेमाची भरती झाली असल्यास, त्यांत नवल तें काय ?

आज मात्र मला खरोखरीच नवल वाटतं. ग्रंथगत साहित्य फारसं न लिहितांहि श्री. फडके–खांडेकरांची लोकप्रियता त्यांनीं मिळवली होती. चित्रपट मुके असतांहि त्यांच्या बद्दलचं प्रेक्षकांचं प्रेम बोलकं झालं होतं. चित्रपट बोलका होतांच त्या प्रेमाला सागराची भरती यावी हें साहजीकच नव्हतं का ? मला अजुनी आठवतं–प्रभातचे " अयोध्येचा राजा, अग्नि–कंकण, मायामच्छिंद्र " हे चित्रपट ज्या अधीरतेनं आम्ही पाहिले, त्याच अधीरतेनं भालजींचे " शामसुंदर " आदि चित्रपटहि आम्ही पाहिले आणि पंचवीस आठवड्यांची पहिली " सिल्व्हर ज्युबिली ", मला वाटतं, त्यांच्याच " शामसुंदरनं " साजरी केली. प्रभातच्या चित्रांनीं दिगंत कीर्ति करावी यांत आश्चर्य कांहींच नव्हतं. कारण पांडवाप्रमाणं पांच चित्रवीरांचा पराक्रम " प्रभात"च्या पाठीशीं होता; पण एकांडे शिलेदार राहूनहि भालजींनीं जी बहादुरी गाजवली त्याला कर्णाच्या पराक्रमाशिवाय दुसरी उपमाच नाहीं.

हा पराक्रम भालजींनीं स्वतंत्रपणें केला; कधीं सहकार्यानंहि केला; त्यांचा फारसा तपशील मला माहीत नाहीं. पण एकंदरींत पाहतां एक गोष्ट खरी–भालजी एकांडे शिलेदार म्हणूनच अधिक गाजले आणि लोकांनाहि आवडले. मलाहि ते फार आवडले होते. व्यक्ति म्हणून आवडण्याइतका सहवास फारसा घडलाच नव्हता; पण संवाद लेखक म्हणून त्यांनीं मला अक्षरशः वेड लावलं होतं; विनायकांमुळें हें वेड वाढीसहि लागलं होतं.

मला आठवतं–त्यावेळीं प्रभातचा " सैरंध्री " हा चित्रपट चालू होता. त्यांत विनायकांनीं कंचुकीची भूमिका केली होती. त्या निमित्तानं " सैरंध्री "चे संवाद मला पाह्यला मिळाले होते आणि त्यांनीं मला इतकं वेड लावलं होतं, कीं ते मला अक्षरशः पाठ झाले होते; इतकेंच नव्हे तर

"सैरंध्री" हा चित्रपटहि मी अनेकदां पाहिला होता. ऐतिहासिक चित्रपटांचे संवाद तर त्यांचा हुकमी एक्का होता. मराठी मनाला डिंवचून, त्याला पराक्रमाची जाग देणारी विलक्षण धार त्यांच्या शब्दांना होती.

मराठ्यांचा इतिहास हा भालजींचा मानबिंदु आहे; आणि त्यांतहि शिवछत्रपतींची कारकीर्द म्हणजे त्यांना आपल्या प्राणापेक्षांहि प्रिय आहे. जर त्यांना कोणीं म्हणालं कीं, "बोला; मराठ्यांचा इतिहास आम्ही फाडून टाकूं; कां तुमचे प्राण आम्ही काढून टाकूं ?" तर माझी खात्री आहे——भालजी उत्तरतील, "मराठ्यांचा इतिहास फाडणाऱ्या महाभागाची माय अजून व्याली नाहीं" आणि असें म्हणूनच ते थांबणार नाहींत, तर त्यानं आणखी कांहीं उत्तर द्यायच्या आंतच आपले प्राणहि ते त्याच्या हातीं देतील. कर्णानं आपल्या अंगावरलीं कवचकुंडलं याचकाच्या हातीं दिली तशी ! कारण, हिंदुत्वावर भालजींची विलक्षण श्रद्धा आहे. त्यांची श्रद्धा आहे–श्रद्धेशिवाय कोणताहि समाज टिकणार नाहीं. आणि याच श्रद्धेनं "देश, देव आणि धर्म" यांच्यासाठींच मी मरेन म्हणून ते जगत आले आहेत. पडद्यावर शिकवणहि हीच देत आले आहेत आणि हीचि शिकवण देतां देतां ते लेखणी ठेवणार आहेत. त्यांच्यांतली ही धर्मश्रद्धा किती प्रभावी आहे याची प्रचीति पाहायला लांब जायला नको. मराठ्यांच्या इतिहासावर आणि विशेषतः शिवचरित्रावर जे चित्रपट आजवर तयार झाले, त्यांची गणति केली तरी असं आढळून येईल, कीं अर्धीअधिक संख्या भालजींच्याच चित्रांची भरेल !

नुसत्या चित्रांनींच त्यांचं समाधान होत नाहीं. कधींहि भाषणाचं आमंत्रण न स्वीकारणारे भालजी शिवजयंतीच्या भाषणाला धांवून जातील ! अजुनी त्यांची श्रद्धा असावी–हें निधर्मी राज्याचं वेड लोकांना आज ना उद्यां पटेल आणि हिंदुस्थान हा नांवाप्रमाणं हिंदूंचा बनेल ! काळाचा प्रवाह कुणीं थांबवला आहे ? आणि अदृष्ट कुणीं पाहिलं आहे ? पण जे पाहूं शकतात

तेच द्रष्टे ठरतात आणि त्या उद्यांच्या जगण्यासाठीं आज लाखों मरणं मरायला ते तयारहि होतात. हें आपलं मरण भालजींनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलं आहे.

म. गांधींचा खून झाला आणि त्या असंतोषानं हिंदुत्ववाद्यांच्या घरादारांची राखरांगोळी झाली. भालजींचा लाख मोलाचा स्टुडिओहि या रोषाला बळी पडला आणि आम्हांला मुंबईला बातमी आली, कीं भालजींचे हातपाय तोडून लोकांनीं त्यांना आगींत ढकललं! मला मात्र ही बातमी खरी वाटली नाहीं. कारण भालजी एकटे मरणार नाहींत—निदान मारले जाणार नाहींत याची मला खात्री होती. मरतांना मारणारे चारदोन तरी बरोबर घेऊनच भालजी जातील आणि उरलेल्यांना हळहळ करायला लावतील, येवढा त्यांचा पराक्रम आहे; आणि त्यांच्या वैऱ्यालाहि तो कबूल करणं भाग आहे.

अशा प्रखर आणि दाहक माणसाशीं माझा संबंध कसला येणार ? पण तो धंद्याच्या निमित्तानं एकोणीसशें पन्नास सालीं आला. " राम राम पाव्हणं " हें चित्र त्यांच्याच प्रभाकर पिक्चर्समध्यें घेण्याचं आमचं ठरलं आणि आम्ही कोल्हापूरला गेलों. प्रभाकर पिक्चर्समध्यें पाऊल ठेवतांना माझ्या मनाची विलक्षण कालवाकालव झाली. हाच स्टुडिओ मी पूर्वी अनेकदां पाहिला होता. कोल्हापूर सिनेटोन, हंस पिक्चर्स, इत्यादि चित्रसंस्थांचे संसार येथेंच थाटले होते. लाखो रुपयांचा त्यांचा संसार येथेंच पडला होता. पण मी प्रत्यक्ष पाहिलं तेव्हां तेथें कांहीं नव्हतं. फक्त एकच होतं—राखेंतून फुलबाग फुलविणाऱ्या स्थितप्रज्ञ माणसाची कर्तबगारी! मूळचे स्टुडिओ जमीनदोस्त झाले होते; तरी तेथेंच नवे काम चलाऊ स्टुडिओ उभे राहिले होते. ऑफिसच्या जागाहि राखेंत मिसळल्या होत्या. तेथें अर्धी बाजू उभी झाली होती आणि कामचलाऊ लॅबरोटरीहि हालचाल करूं लागली होती. खरंच, भालजींच्या ठिकाणीं दुसरा कोणी असता, तर त्यानं

त्या स्टुडिओच्या आगींतच उडी घेतली असती आणि तो जगांतून निघून गेला असता. पण भालजींची जिद्द दांडगी होती. ती जाळून जळणारी नव्हती; मारून मरणारी नव्हती.

खोटं नाहीं--मुंबईचे अनेक धंदेवाईक स्टुडिओ मी पाहिले होते. पण कोल्हापूरचा भालजींचा स्टुडिओ पाहिला आणि स्टुडिओला "कला-मंदिर" असं कां म्हणतात, याची प्रचीति मला आली. मंदिराची स्वच्छता स्टुडिओच्या आवारांत होती; आणि राऊळाचं पावित्र्य स्टुडिओच्या अंतरंगांत होतं. एका स्टुडिओंत श्री गणेशाची स्थापना होती आणि दुसऱ्या स्टुडिओंत भगवान सूर्यनारायणाची स्थापना होती. त्या दैवतांच्या पूजेसाठींच जणूं स्टुडिओच्या विस्तीर्ण आवारांत नाना जातींचीं फुलझाडं फुललीं होतीं. त्या आवारांतच एका पारावर श्री मारुतीरायाची प्रतिष्ठापना केली होती.

या पवित्र वातावरणांतच मीं मला कीर्ति देणारे चित्रपट काढले, हा योगायोगच म्हटला पाहिजे. ते चित्रपट काढतांना माझं आणि भालजींचं कितपत पटेल, याची माझ्या अनेक मित्रांना शंका होती; पण ती इतकी अस्थानीं ठरली, कीं स्वतः भालजी एकदां मला म्हणाले, "माझ्या स्टुडिओंत येवढीं चित्रं काढूनहि एकहि तुमची तक्रार माझ्याकडे येऊं नये--आश्चर्य आहे." मलाहि तेंच आश्चर्य वाटतं! भालजीशीं मतभेद सोडाच--त्यांचं अन् माझं उलट अधिकच जमूं लागलं होतं. इतकं कीं त्यांचं एक चित्र "मायबहिणी' त्यानीं मला लिहायला आणि दिग्दर्शन करायलाहि दिलं. तेव्हां तर सर्वांची खात्री झाली, कीं आतां या दोघांचं कायमचं फाटणार! पण झालं उलटंच--चुकूनहि मला कधीं ते कांहीं बोलले नाहींत. उलट रोज सकाळीं ते येत--काम सुरूं झालंय--हें पहात आणि आपल्या ऑफिसमध्यें जात. एके दिवशीं काय झालं--न्हाणी घरांत "बेबी शकुंतला" कपडे उतरते, हें चित्रण मी करणार होतों. भालजींच्या प्रकृ

तीला हें दृश्य मानवणारं नव्हतं, हें मलाहि माहीत होतं. भालजी तें चालू असतांना सेटवर आले; कांहीं न बोलतां बघत उभा राहिले; मी 'स्टार्ट' म्हणतांच, बेबी शकुंतलाहि न्हाणी घरांत आली आणि अगदीं कॅमेऱ्याच्या "क्लोज" ला येतांच पाठमोरी होऊन, ती उभी राहिली. पुढें ती कपडे उतरते, हें मी सूचनांनीं दाखवणार होतों. भालजी यावेळीं कांहीं बोलणार, असं सर्वांना वाटत होतं. पण कांहीं न बोलतां त्यांनीं मला बाजूला घेतलं आणि विचारलं, "याची आवश्यकता काय आहे?"

मी म्हणालों, "बुद्धिसौंदर्यांत रमणारी मुलगी देहसौंदर्याच्या नादीं लागली आहे--हेंच मला सुचवायचं आहे."

भालजी म्हणाले, "कांहीं हरकत नाहीं--चालू दे." आणि ऑफिसांत निघून गेले.

त्यानंतर आमचं चित्र पूर्ण झालं; इतरहि अनेक चित्रं मीं तेथें काढलीं; तेव्हां एकच अनुभव मला आला--भालजींचं समाधान करतां आलं तर ते कोणत्याहि गोष्टीला विरोध करीत नाहींत. कधीं कधीं हें समाधान करतां आलं नाहीं तरीसुद्धां आमची त्या मागची तळमळ आणि धडपड दिसली, तरी ते समाधानी असत.

याचा अर्थ धंद्याच्या क्षेत्रांत त्यांचं माझं दुमत झालं नाहीं, असं नाहीं. पण दुमत करतांनाहि एक गोष्ट माझ्या लक्षांत आली. भालजी हाडाचे कलावंत आहेत; धंदेवाईक नाहींत. धंदेवाईकासमोर माझ्यांतला कलावंत हार खातो आहे, असं जेव्हां जेव्हां त्यांना दिसलं, तेव्हां तेव्हां त्यांनीं मला आर्थिक मदतहि केली आहे. मात्र ती प्रत्यक्ष कांहीं उचलून देऊन नव्हे; तर माझीं अनेक लहान मोठी देणी माफ करून! हेतु एकच माझ्यांतला कलाकार--माझ्यांतला माणूस मारला जाऊं नये!

आज सुद्धां मी आर्थिक आघाडीवर अनेक जखमा घेऊन लढतों आहे; अशा वेळीं भालजी हीच माझी प्रेरणा आहे. भालजींना याची

कल्पनाहि नसेल. तेहीं अशा अनेक जखमा घेऊन लढत आहेत. पण सर्वांत कठीण समस्या कोणती असेल, तर सध्यां चित्रपट धंद्याला आलेलं बाजारी स्वरूप! भालजींचा सारा जन्म स्टुडिओ चालविण्यांत आणि कायम पगारी नोकरांकडून कामं करवून घेण्यांत गेला. त्यांना आतां "फ्री लान्सिंग" पद्धतीची किती दगदग होत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. बरें, इतकंहि करून निर्मात्यांच्या जन्ममरणाचं सोयरसुतक कलाकारांना नाहीं. यालाच कंटाळून असेल–त्यांनीं सुरूं केलेलें एक हिंदी चित्र ठरल्या–प्रमाणें प्रगत होईना, हें पाहून त्यांनीं त्या चित्राच्या सर्व कलाकारांना ऑफिसांत बोलावलं आणि सर्वांना पूर्ण पगार देऊन कोल्हापूर सोडण्यास सांगितलं. त्याचा साभिमान निर्देश करून भालजी अनेकदां मला म्हणा-लेत, "पाटील, वाटलं तर पोटासाठीं डोंबाऱ्याचा धंदा करा. पण अशा भाडखाऊंना जवळ करूं नका. अहो, चित्राचं सोयरसुतक ज्यांना नाहीं ते कलाकार कसले! अशानं धंदा होणार नाहीं. झाला तरी फार दिवस टिकणार नाहीं."

चित्रपट धंद्याला सध्यां जे दिवस आले आहेत–त्याची मीमांसा ही अशी आहे. याचा विचार जाणकार कलाकार आणि निर्माते यांनीं कर-ण्याची वेळ आली आहे. तो विचार वेळींच नाहीं झाला तर धंद्याचं भवि-तव्य काय आहे, हें सांगायला ज्योतिषाची जरूरी नाहीं.

आज धंद्यानिमित्त मी मुंबईला असलों तरी जेव्हां जेव्हां मी कोल्हा-पुरला जातों, तेव्हां भालजींची भेट घ्यायला चुकत नाहीं. जिथं आपण धंद्याची सुरुवात केली ती जागा पाहून कांहीं उदात्त अशा पूर्व स्मृति जाग्या होतात आणि भालजींचे आशिर्वादहि मस्तकीं धारण करायला मिळतात. तसं मी विनायकांना गुरु मानतों आणि विनायक हे माझे गुरु खरेच! पण भालजींच्या एका वाढदिवस समारंभांत मी म्हणालों होतों तेंही तितकंच खरं आहे. मी म्हणालों होतों, "द्रोणाचार्यांना वाटत होतं–कौरव पांडव

हेच माझे काय ते शिष्य! पण एकलव्याची भेट होतांच त्यांना खऱ्या शिष्याची ओळख झाली. एकलव्याइतकी माझी योग्यता नाहीं. पण येवढं खरं–एकलव्यानं मातीचे द्रोणाचार्य गुरुस्थानीं पूजिले होते. त्या दृष्टीनं भालजी हेच माझे द्रोणाचार्य आहेत."

त्यावेळीं "देश, देव आणि धर्म यासाठीं जगा आणि यासाठींच मरा" असा आशिर्वाद आम्हांला त्यांनीं दिला होता. तो ऐकतांना मला वाटलं, ज्ञानेशाची मराठी भाषाच जणु माझ्यावर अमृत होऊन वर्षत आहे. कां कोण जाणे, अनेकांच्या मराठी भाषा मी ऐकल्या आणि अभ्यासल्या; पण भालजींच्या भाषेइतकी शुद्ध आणि रसाळ भाषा मी कधींच ऐकली नाहीं, ऐकायला मिळणारहि नाहीं. त्यांच्या अंगावर एकहि साहेबी अलंकार नाहीं. मला वाटतं, मराठी भाषा म्हणूनच त्यांच्या मुखीं संतवाणीच्या स्वरुपांत निर्धास्तपणें राहिली आहे.

० ० ०

## ७ : भैया !

मी "कुलदैवत" चित्र काढीत होतों तेव्हांची गोष्ट. म्हणजे साधारणतः १९५५ सालची म्हणा ना. त्या पूर्वीचीं माझीं बहुतेक चित्रं मी कोल्हापुरलाच काढलीं होतीं; म्हणून धंद्याच्या सोयीसाठीं प्रसंगीं हजार–बाराशेंची उधारउसनवार करावी लागते ना? तसे व्यवहार माझे मुंबईत कोणाशीं अद्याप तरी प्रस्थापित झाले नव्हते. म्हणून मी माझ्या तंत्रकारांना आणि कलाकारांनाहि सक्त जाणीव दिली होती, कीं वितरकाकडून पैसे येतील त्याच वेळेला मी पगार देत जाईन; त्याच्या आधीं कृपा करून कोणी मला "ॲडव्हान्स" वगैरे मागून कोड्यांत टाकूं नये. या विनंतीनुसार लोकांनीं मला सहकार्य दिलंहि होतं. आणि कुलदैवत पूर्ण होत आलं होतं. फक्त माझा वितरकाकडचा शेवटचा हप्ता राहिला होता आणि तो मला चित्र सेन्सॉर झाल्यावर मिळणार होता. मुंबईचे "जय हिंद फिल्म एक्स्चेंज" हे माझे वितरक होते; आणि त्यांचे व्यवहार ठरवतांना घासाघीस झाली, तरी नंतर त्यांचं देणं घेणं अगदीं चोख असतं, असा त्यांचा लौकिक होता; आणि मला अनुभवहि तसाच आला. म्हणून शक्यतों आपणहि आपली गरज कधीं त्यांच्याकडे दाखवायची नाहीं, या पवित्र्यांतच मी होतों, म्हणा ना.

पण याच वेळीं शेळके मामा माझ्याकडे आले. ते माझ्याकडे रंग-भूषेचं काम करीत होते. त्यांच्या मोठ्या मुलीचं लग्न ठरलं होतं आणि त्याकरतां त्यांचा राहिलेला पगार मी शक्य तो लौकर द्यावा, अशी त्यांची इच्छा होती. काम लग्नाचं होतं आणि त्यांचे माझे संबंधहि अगदीं घरोब्याचे होते. इतर कसली आणि कोणाचीहि अडचण असती तर मी त्याला चित्र सेन्सॉर होण्याचा वायदा दिला असता. पण मी अभावितपणें बोलून गेलों, "मामा, तुम्हांला ठाऊक आहे सारं आणि मलाहि तुमची गरज पटते. यावेळीं एकच शक्य आहे, कोणी मला हातउसने पांचशें रुपये द्यायला तयार होतात कां पहा. मी त्याला व्याज द्यायला तयार आहे—"

मला वाटलं, शेळके मामांनीं या गोष्टीचा अंदाज आधींच घेतला असावा. ते चटकन मला म्हणाले, "तुम्ही सवापांचशेंचा चेक देता का एक महिना मुदतीचा ? पांचशें माझा पगार आणि पंचवीस त्याचं व्याज होईल."

तोंडांतून शब्द गेला होता खरा; आतां त्यावर खळखळ करण्यांत अर्थ नव्हता. मी चटकन माझं चेकबुक काढलं आणि विचारलं, "कोणाच्या नांवचा लिहूं ?"

"रामशिरोमण तिवारी" मामांनीं उत्तर दिलं.

मी मुकाट्यानं तो चेक भरला. तो मामांच्या हातीं देतांना त्यांच्या मुलीच्या लग्नकार्याला आपला पैसा लागतो आहे, याचा विलक्षण आनंद झाला मला.

त्यानंतरचा महिना कसा हां हां म्हणता गेला. मुंबईत अनोळख्या माणसाच्या हातीं माझा चेक पडला होता, त्याची रुखरुख मला इतकी लागली होती, कीं त्या तारखेच्या आंतच मी बॅन्केंत पैसे भरले आणि सुट-केचा निश्वास सोडला. अनोळख्या माणसाची—निदान पहिल्या खेपेला तरी—तोंडफोड नको. उद्यां ओळख झाल्यावर काय—

मनाशीं मी ही योजना केली खरी. चेक पास होतांच मी हें सारं

विसरूनहि गेलों, नित्याच्या कामाला लागलों. चित्र पास झालं आणि त्याचं प्रकाशनहि लौकर आलं ! आणि माझं धाबं दणाणलं ! तसे माझे आणि " जयहिंद " चे व्यवहार सरळ होते—पण त्या आधींच्या दोन वितरकांचा माझा अनुभव अगदीं कटु होता. त्यांचीं नांवं देण्यांत अर्थ नाहीं; पण त्यांच्या स्वार्थी आणि मतलबी व्यवहारांनीं मी गोत्यांत आलों होतों. एकानं "पोस्ट डेटेड चेकस्" देऊन दहा हजाराला मला बुडवलं होतं; आणि दुसऱ्यानं नको तीं कोर्ट प्रकरणं करून मला गोत्यांत आणलं होतं. मला वाटतं, कांहीं कांहीं वितरकांचा वितरणाचा धंदाच नसतो मुळीं ! अडलेल्या निर्मात्याला आडमार्गाला गांठणं आणि त्याचीं चित्रं स्वस्त्या भावानं घेऊन त्याला हैराण करणं हाच त्यांचा मुख्य धंदा असतो. निर्माता बिचारा रस्तोरस्तीं भटकत असतो; पण हे "दुकान" घालून बसल्यामुळें जगाला सज्जन दिसतात आणि तेवढ्या भांडवलावर कमालीच्या हलकटपणाचा त्यांचा व्यापार तेजींत चालत असतो. कांहीं झालं कीं मध्यस्थी करणाऱ्याला हे म्हणतात, " अहो, या निर्मात्यांचं घ्या काय ? चित्र चालो–पडो–पैसा आमचाच जातो ना ! "

त्यांचा पैसा असतो हें खरं; चित्र पडल्यावर सर्वच निर्माते त्यांचे पैसे परत करत नाहींत, हेंही खरं ! पण हेंही तितकंच खरं नाहीं का ? चित्र चालल्यावर निर्मात्याचा पैसा देणारे प्रामाणिक वितरक तरी किती आहेत ! आणि मी म्हणतों, चित्र चालणं किंवा पडणं हा नशिबाचा खेळ झाला; त्या आधींचा करारमदारांचा व्यवहार तरी माणुसकीला धरून झाला पाहिजे ना ? त्या अभावींच दोन वितरकांच्या कात्रींत मी अर्धाअधिक कापला गेलों होतों—ज्या जखमा भरण्यासाठीं कांहीं हुंड्यांचे व्यवहार मी केले होते आणि ते व्यवहार मी " कुलदैवत"च्या प्रकाशनाच्या आंत पूर्ण करीन, असं मी लिहून दिलं होतं.

——६.——

ते व्यवहार अपूर्ण राहिले होते आणि चित्र तर प्रकाशित होणार होतं. वेळ एक दोन दिवसांचाच होता आणि तो टळतांच ठकबाजीचा फौजदारी गुन्हा माझ्या हातून घडणार होता. तीन चार महिन्यांच्या उला-ढालींत कांहीं व्यवहार पूर्ण होतील, अशी माझी अपेक्षा होती; पण ती अपेक्षा फोल ठरली होती. त्या दोन तीन महिन्यांतच माझा एक वितरक नादार झाला होता आणि दुसरा कोर्टांत लढत होता. मीहि निर्धारानं कोर्टांत उभा होतों. झक मारत तो आपसातीला येणार, याची मला खात्री होती. पण गळ्यापर्यंत आल्याशिवाय कांहीं हालचाल न करण्याचा त्याचा स्वभाव होता आणि त्या स्वभावधर्मानुसार तो मला हुलकावण्या दाखवीत होता. आणि असं हें संगर चालूं असतांच कुलदैवताच्या प्रकाशनाचा दिवस उजाडला.

काय करावं मला कळेना. बरं ऐनवेळीं हजारांनीं हातउसने मला कोण देणार ? मला शेळके मामांची आठवण झाली. त्यांच्याकरतां चेकवर मला साडेपांचशें रुपये मिळाले होते. तिवारी मला चेकवर पुनः पैसे देईल कां ? नव्हे—त्यानं द्यायलाच हवे होते आणि तेंही अवघ्या चार दोन तासांच्या अवधींत !

मी मामांना शोधूं लागलों. मामा कोळसेवाल्याच्या दुकानीं गेलेत, असं मला कळलं. मी कोळसेवाल्याकडे धांव घेतली आणि मामांना गांठून दोन हजारांची मागणी केली. हव्या त्या रकमेचा चेक न मागतांच मी सही करून त्यांच्या हातीं दिला; आणि चौकशी करून मला सांगायला सांगितलं ! मी घरीं येऊन मामांची वाट बघत बसलों—पण मामा आलेच नाहींत. माझ्या काळजाची धडधड वाढायला लागली. कां कोण जाणे—कायद्याची मला भयंकर भीति वाटते. आतां काय होणार ? नव्हे—उद्यां कसा उजाडणार ?

दिवे लागणीला कोळसेवाला भैया माझ्या दारांत उभा राहिला. मी

बायकोला विचारलं, " कोळशाचं बिल किती राहिलंय ? "

" असेल पन्नास साठ रुपयाचं. "

याचा अर्थ दोन महिने मी बिल भागवलं नव्हतं. मी कोळसेवाल्याला म्हणालों, " भैया–आज पैसे मिळणार नाहींत. माफ करना. "

" मी पैसे मागायला आलोंच नाहीं. "

" मग ? "

" पैसे द्यायला ? "

" द्यायला ? " मी कांहीं तरी पुटपुटलों. " हां " म्हणून तो घरांत आला आणि शर्टाच्या खिशांतून त्यानं शंभराच्या वीस नोटा माझ्या टेबलावर ठेवल्या. माझा विश्वासच बसेना डोळयांवर. या भैयाला मी गेलीं आठदहा वर्षं पहात आलों होतों. तेवढ्याच वर्षांचा माझ्या घरचा आणि त्याचा व्यवहारहि होता. पहावं तेव्हां एक धोतर आणि शर्ट घालून भुतासारखा हिंडतांना दिसायचा मला. हें भूत मला प्रसन्न झालं होतं ? याचं नांव तिवारी ! आणि कसलंहि तारण न मागतां हा मला दोन हजार रुपये मागितल्या बरोबर देतो ! त्याला माझ्या मुद्रेवरचे भाव कळले असावेत. तो म्हणाला—" तुम्हीं दुपारीं आला ना. तेव्हां पासून वसूली करतोंय. आतां जमले दोन हजार. "

आणि आपण कांहींच केलं नाहीं अशा भावनेनं तो उठला आणि चालूं लागला. मी म्हणालों, " चहा तरी घेऊन जा. " पण त्यानं कांहींच घेतलं नाहीं. दुकानावर कोणी नाहीं, म्हणून तो चालायला लागलासुद्धां ! माझा जीव भांड्यांत पडला. एका गुन्ह्यांतून भैयानं माझी सुटका केली होती. बायको हें सारं पहातच होती. तिनं मला विचारलं, " आपला कोळसेवाला भैया का ? "

" हो–कोळसेवाला भैया. "

मी उत्तरलों—माझ्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू तरळत होते. माझी एका नामुष्कीच्या अपराधांतून सुटका झाली होती; नव्हे—भैयानं ती केली होती. नांवांत काय आहे ? असं कोणीं एका महान लेखकानं म्हटलं आहे. पण मी महान नसलों; तरी सामान्य लेखक आहेच. मला वाटायला लागलं——नांवांत कांहीं नाहीं कसं ? नांवांतच बरंचसं आहे ! नाहीं तर, तिवारी हें नांव असतांहि आम्ही त्याला कोळसेवाला भैयाच कां म्हणत होतों ? भैयासारखाच तो माझी लाज राखायला धांवला नव्हता कां ?

वास्तविक, भैयासारखीच त्याची नेहमींची वागणूक असे. कोळशाचा व्यापार तो करत होता. पण मोत्यांचा व्यापार करणाऱ्याचं काळीज त्याच्या छातींत दडलं होतं. कोल्हापूरच्या वास्तव्यामुळें मला त्याची फारशी ओळख नव्हती, पण माझ्यापेक्षांहि घरच्या लोकांना त्याची खरी ओळख होती. उधारीकरता कधींहि विचारणा त्यानं केली नव्हती; उलट माझ्या लहान लहान मुलांचं घरच्या माणसापेक्षांहि अधिक प्रेमानं तो कौतुक करायचा. नुसत्या पैशानंच नव्हे—माझ्या घरादारावर त्याची वडीलभावाची दृष्टि होती. कोण कोणत्या शाळेंत जातो, कुणाचा कितवा नंबर आहे, अशा हरेक बाबींत त्याची बारीक चौकशी असायची आणि त्या चौकशीनं त्यानं माझ्या बायकोला आदर्श गृहिणीपदाची पदवीहि बहाल केली होती. सिनेमाच्या धंद्यामुळें मी स्थिर असा कधीं नसतोंच—तरीहि माझ्या गैरहजेरींत माझ्या पत्नीनं घराला जें घरपण आणलं होतं, त्याचा त्याला अभिमान वाटायचा.

माझ्याबद्दलहि त्याला एक प्रकारची आत्मीयता वाटत होती. एकदां माझ्या बायकोनं सहज त्याला " मला इतकी मदत कां करतोस, " असं विचारलं होतं. त्याचं उत्तर ऐकून मीहि चकित झालों होतों. तो म्हणाला होता, " नोकराचा पगार दादानं कर्ज काढून दिलाय. ही त्याची दानत आहे तोपर्यंत त्याला कांहीं कमी पडणार नाहीं. "

माझ्या या दानतीवर विश्वासूनच भैयानं अनेकदां माझी नड काढली

आहे. त्या नडी लहान होत्या—मोठ्याहि होत्या. पण एकदांहि त्यानं माझ्या-बद्दल शंका घेतलेली नाहीं—किंवा विचारलेलं नाहीं. त्याचं एकच तत्त्व आहे, "दादा काम करतो आहे ना ? प्रामाणिकपणानं करतो आहे. तोंपर्यंत आपले पैसे शाबूत आहेत." त्याला हें ठाऊक आहे, कीं पगार किंवा घेणीं वसूल करण्यांत मी कच्चा आहे. लेखी करार माझ्या हातीं आहेत; जे कोर्टांत गेले त्यांचे निर्णय माझ्या बाजूचे आहेत; तरीहि माझ्या विरुद्धचे निर्णय ज्या कठोरपणानं अंमलांत आणले जातात, तो कठोरपणा मी माझ्या देणेकऱ्यांच्या बाबतींत दाखवूं शकत नाहीं. तो माझा स्वभावच नाहीं. याबद्दल माझी न् माझ्या बायकोची अनेकदां बोलणीं होतात; त्याचं रूपांतर भांडणांतहि होतं. अशा वेळीं भैय्याच आमचा "आर्बिटेटर" असतो. तो मला माझ्या अव्यवहारीतपणाबद्दल दोष देतो; पण त्याच वेळीं माझ्या बायकोलाहि समजावतो, "लक्षांत ठेव—दादा दुसऱ्याची अब्रू घ्यायला उठत नाहीं, म्हणूनच देवानं सारखं त्याला काम दिलंय. तुझा सिनेमाचा धंदा म्हणजे आळवावरचं पाणी ! तें पाणी झऱ्यासारखं वाहतंय तें दादाच्याच उदारपणानं."

त्याचा हा आशीर्वाद मला सुद्धां पटतो. त्याच्यावरली माझी श्रद्धा म्हणूनच नव्हे—तर त्याची प्रचीतीहि मला कधीं कधीं मिळते. परवांचीच गोष्ट सांगतों. आमचा अतुल अगदीं अचपल आहे. डोळ्यांचा पहारा ठेवला तरीसुद्धां अनेकदां तो डोळ्यांआड होतो. त्या दिवशीं तो असाच जरा डोळ्यांआड झाला आणि आमच्या राहत्या घराच्या पहिल्या माळ्यावरून खालीं पडला ! प्रतिभेनं हें सांगायचा अवकाश—खालची मंडळी अतुलला घेऊन वरच येत होतीं. मी त्याला तसाच डॉक्टरकडे नेला. वाटेंत तो कांहीं बोलला नाहीं. पण डॉक्टरांनीं तपासतांच त्यांना बघून हंसला. डॉक्टरहि आनंदून म्हणाले, "तुम्ही नशिबवान आहांत पाटील. याला कांहीं झालेलं नाहीं."

आणि मला भैय्याची–त्याच्या उद्गारांची आठवण झाली, " दादानं कुणाचं वाईट केलं नाहीं. देवहि त्याचं वाईट करणार नाहीं. " हें कळतांच भैय्या घरीं आला आणि अतुलशीं खेळायला लागला. माणसापेक्षां देवाच्या न्यायावर त्याची अधिक श्रद्धा आहे. माझे अव्यवहारीपणाबद्दलचे परिणाम त्याला दिसतात; पण तरी तो हंसतो—" घाबरूं नकोस. तुझा शेवट चांगला आहे. "

तसा स्वर्गावर माझा विश्वास नाहीं. पुनर्जन्मावरहि अविश्वास नाहीं. विश्वास मात्र एकाच गोष्टीवर आहे–सदाचारावर! समाधानानं जगणं आणि समाधानानं मरणं म्हणजेच स्वर्गसुख भोगणं अशी माझी कल्पना आहे. हें समाधान मला भैयाच्या अशा आशीर्वादांनीं मिळतं, येवढं मात्र खरं!

आणि म्हणूनच, माझा स्वर्ग मोठमोठ्या हवेलींचा नाहीं, अप्सरांच्या नाचाचा नाहीं, किंवा उंची कपडालत्त्यांचाहि नाहीं. साध्या चंद्रमौळी झोंपडीचा तो आहे. त्या झोंपडींत जायचं म्हणजे मला कांहीं मिळवायला नको. फक्त एकेक मोह कमी केले पाहिजेत—घेण्याचे आणि देण्याचे सुद्धां! आज ना उद्यां माझे सारे मोह संपतील अशी माझी श्रद्धा आहे–माझ्या कर्माइतकीच भैयाच्या आशीर्वादावर! तें स्वप्न खरं झाल्यावर एकच रम्य चित्र मी मनाशीं रंगवीत आलों आहे. मोठमोठ्या हवेल्यांचं उद्घाटन करायला मंत्री महाशयांना बोलावण्याची प्रथा आहे. त्या प्रथेला अनुसरून अनेक समारंभ मी मंत्र्यांच्या हस्तें साजरे केले आहेत. शेवटचा माझा कुटिर प्रवेशाचा समारंभ मात्र मी मुद्दाम मागें ठेवला आहे. कारण त्यावेळीं इतर सोहाळा कांहीं नसणार! मी आणि माझी सुमन येवढीच असतील त्यावेळीं—कारण माझ्या चिमण्यांना तेव्हां पंख फुटलेले असतील आणि त्या केव्हांच उंच हवेंत भराऱ्या घेत असतील! त्यांच्या विहगनेत्रांना मात्र एकच दृश्य दिसेल. आमचा भैया त्या झोंपडीचं दार उघडतो आहे आणि आम्ही नवरा–बायको त्यांत निवृत्तीकरतां प्रवेश करतों

आहोंत ! एकाच श्रद्धेनं भैयाचा हात या झोंपडीला लागला आहे. या झोंपडींतच आम्हांला खरं सुख मिळेल. खरी शांति मिळेल ! कारण मुंबईच्या बकाली वस्तींतसुद्धां आम्ही अब्रूनं घरांत रहावं–ही त्याची इच्छा होती–त्याची तळमळ होती; नव्हे, आहे !

हो–भैयाची–कोळसेवाल्या भैयाची ! माझ्या कष्टावर आणि प्रामाणिकपणावर विश्वास असणाऱ्या भैयाची ! ! मला माझ्यापेक्षां मोठे असे दोन भाऊ होते, असं म्हणतात. मला कळायला लागण्याआधींच ते देवाघरीं गेले ! ती दोन भावांची उणीव भरून काढण्यासाठीं तर हा भैया माझ्या जीवनांत आला नसेल ! मला सांवरण्यासाठीं—माझ्यावर रागवण्यासाठीं– ?

० ० ०

## ८ : शांतीभाई

१९४७ सालची गोष्ट. आमचे गुरु आणि प्रफुल्ल पिक्चर्सचे चालक मा. विनायक यांचा नुकताच अपमृत्यु झाला होता. वास्तविक सिनेमांतली नोकरी म्हणजे आळवावरचं पाणी, असं म्हणतात. पण मा. विनायकांच्या बाबतींत आम्हांला त्याचा अनुभव नव्हता. महिना दोन महिन्यांचे पगार कधीं कधीं थांबत; पण एकदमच त्यांची भरपाई व्हायची आणि आम्हांला वाटायचं, हें असंच चालायचं– आणि असंच चालणार आहे. आम्हीं बेकार आहोंत किंवा निराधार आहोंत, अशी भावना मनांत कधींच उद्भवली नव्हती. पण मा. विनायक एकाएकीं वारले आणि विनायकांच्या मुलांप्रमाणं आम्हांलाहि प्रथमच वाटलं, ' आतां आमचं काय होणार ? '

याच वेळीं विनायकांचं ' मंदिर ' हें चित्र अपुरं राहिलं होतं. तें पूर्ण कोणीं करावं, याबद्दल वाद सुरू झाला होता. विनायकांचे धनिक श्रीमान् भूमरेडी यांची अशी इच्छा होती, कीं तें व्ही. शांताराम यांनीं पूर्ण करावं. आधींच त्याकरतां बराचसा पैसा खर्च झाला होता. ' मंदिर ' पूर्ण झाल्याशिवाय त्या पैशाला कांहीं अर्थ नव्हता. शूटिंग चार-आठ दिवसाचंच बाकी असेल तर व्ही. शांताराम यांनीं तें पूर्ण करण्याची इच्छा व्यक्तहि

केली होती. त्याप्रमाणं भूमरेडींच्या विनंतीवरून शांताराम यांनीं मला आपल्या राजकमल कलामंदिरांत बोलवून घेतलं. त्यापूर्वीं मी राजकमलच्या आणि विनायकांच्या एका हिंदी चित्राकरतांहि राजकमलमध्यें अनेकदां गेलों होतों. पण यावेळीं जातांना मला वेगळाच प्रत्यय आला. एखाद्या निर्वासित बालकाला वाटावं तसं मला वाटलं.

पण शांताराम यांनीं मला फारच प्रेमानं वागवलं. 'मंदिर 'च्या झालेल्या भागाची पाहणी केली आणि राहिलेल्या भागाची विचारणा केली. त्याचा अंदाज करतांना असं आढळून आलं, कीं 'मंदिर ' चार–आठ दिवसांच्या कामानं पूर्ण होण्यासारखं नाहीं. त्याकरतां निदान वीस–पंचवीस दिवस तरी शूटिंगला लागतील आणि तेवढे दिवस देऊं करणं शांताराम यांना शक्य नव्हतं.

झालं ! 'मंदिर ' कोणीं पूर्ण करावं याबद्दल पुनः चक्र फिरूं लागलं. कोणीं बाबुराव पेंढारकरांचं नांव सुचवलं; कोणीं जुन्नरकर–जोगळेकर यांचीं नांवं सुचवलीं; नव्हे, अंबपकरांना विचारावं, अशीहि कोणी क्लृप्ति काढली. यां सर्वांबद्दल मला आदर आहे; पण असं असूनहि मी भूमरेडींना म्हणालों, 'हें पहा, शांताराम किंवा बाबुराव चित्र पूर्ण करणार असतील तर मी वाटेल तें सहकार्य द्यायला तयार आहें; पण त्या व्यतिरिक्त कोणी दिग्दर्शक म्हणून आला तर मात्र त्याच्या समोर सहाय्यक म्हणून फायली धरून उभा राहायला मी तयार नाहीं. '

यावर काय उपाय काढावा हें भूमरेडींना कळेना. त्यांनीं शांताराम यांचा सल्ला घेतला आणि शांताराम यांनीं त्यांना सांगितलं, 'तुम्ही दिनकरलाच कां नाहीं दिग्दर्शक करीत ? नवीन दिग्दर्शक तयार केल्याचं श्रेय तुम्हांला मिळेल आणि माझी खात्री आहे, त्याच्या ऐवजीं दुसरा कोणींहि आला तरी दिनकरशिवाय त्याला कांहीं करतां येणं शक्य नाहीं. कारण विनायकानं काय घेतलंय हें त्यालाच ठाऊक आहे आणि त्याच स्कूलचा

असल्यानं तो कामहि चांगलं करूं शकेल. ”

श्री. भूमरेडींना हें पटलं असावं. त्यांनीं मला दिग्दर्शक केलं; शूटिंगच्या दिवशीं मी शांताराम यांचा फोनवरून आशीर्वाद मागितला; त्यांनीं तो दिला आणि मी एकदांचा दिग्दर्शक झालों !

पण नंतर काय ? एवढ्या भांडवलावर स्वतंत्रपणें उभं राहण्याची कुवत अंगांत आली नव्हती. बरं, सहकारी–दिग्दर्शक म्हणून काम करावं, तर तेंही मनाला पटेना. आणि मुंबईत नोकरीशिवाय रहाणं म्हणजे केवढं दिव्य ! शेवटीं ठरवलं–नोकरी मागण्यापेक्षां चित्राकरतां फायनान्सच मागितलेला काय वाईट !

मुंबईत हा एक सराईत प्रघात आहे. चित्राकरतां फायनान्स शोधणारे लोक आहेत; तसेच त्यांकरतां तो मिळवून देणारे दलालहि आहेत. त्यांचं कांहीं कमिशन असतं. तें त्यांना मिळालं, कीं मग ते धनिक अथवा वितरक गांठून देतात. मला याचा अनुभव नव्हता; पण माझे एक बेकार मित्र नुकतेच दिग्दर्शक निर्माते व्हायच्या मार्गावर होते. त्यांच्याकडे मी माझ्या गरजेची वाच्यता करायचा अवकाश——

त्यांच्या शेजारींच एक गृहस्थ बसले होते. अंगानं हडकुळे, रंगानं काळे, केस पांढरे, अंगांत कोट आणि खालीं गुजराथी पद्धतीचं धोतर ! त्यांनींच आपणहून मला विचारलं,

‘ आपण दिनकर पाटील का ? ’

‘ हो. ’

‘ विनायकांचे शिष्य ? ’

‘ हो ! ’

‘ मंदिर तुम्हीच पूर्ण केलंत ? ’

‘ हो. ’

‘ मग तुम्हांला हो फायनान्सला काय तोटा ? ’

मला कळेना मी कोठें आहे ? त्यांनीं विचारलं, ‘ तुम्हांला किती फायनान्स पाहिजे ? ’

मी भयभीत झालों, म्हणालों, ‘ मराठी चित्र आहे— पंचाहत्तर हजार पुरतील ! ’

‘ छे छे ! ’ ते गृहस्थ हंसले, ‘ एक लाखाची व्यवस्था करतों मी. विनायक टाइप पिक्चर काढायचं म्हणजे लाख रुपये लागणारच. बरं तुम्हीं रहातां कुठं ? ’

‘ नाना चौकांत. ’

‘ विनायक रहात होते तिथंच ? ’

‘ हो. ’

‘ मी उद्यां दुपारीं येतों—–आपण सविस्तर बोलूं. ’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
क्रमांक ...................... वि: ........
.................. नों: दि: ......

मला विलक्षण आनंद झाला. एक लाख रुपये एवढ्या सहजासहजीं जमतील, असं माझ्या स्वप्नांतही आलं नव्हतं.

दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें ते गृहस्थ आले. त्यांनीं बातमी आणली, कीं एक लाख रुपये द्यायला एक पार्टी तयार आहे. त्याकरतां स्टँप पेपर वगैरे उद्यां तयार ठेवा आणि—

त्याप्रमाणें मी स्टँम्प पेपरहि आणले. ते गृहस्थ ॲग्रिमेन्टचं ड्राफ्टींग घेऊनच आले. त्यावर नांव कोणाचंच नव्हतं. नांवाच्या जागा रिकाम्याच होत्या. तशीच पद्धत आहे धंद्याची, त्या गृहस्थांनीं खुलासा केला. कारण नुसतं ड्राफ्टींग पाहून कोणाला व्यवहाराची कल्पना येऊं नये. तें तर या धंद्यातलं रहस्य आहे. आणि असं म्हणून त्यांनीं माझ्याकडेच अडीचशें रुपयांची मागणी केली.

मी म्हणालों, ‘ मला तुम्ही लाख रुपये देणार ना ! त्यांतलेच कापून घ्या म्हणजे झालं. ’

‘ छे छे ! ’ ते गृहस्थ म्हणाले, ‘ ही सॉलिसीटरची फी आहे. ही

तुम्हीच दिली पाहिजे. एवढीही तुमची ऐपत नसेल तर लाख रुपये देणारा तुम्हांला देईल कसा ? '

मलाहि तें पटलं. पण पटलं तरी देणार कसे ? सात–आठ महिने बेकारीची झळ लागली होती. किरकोळ देणीं सुरू झालीं होतीं. त्यांतच हे अडीचशें रुपये आणायचे कुठून ? मला कल्पना सुचली, घरांत कांहीं दागिने होते——बायकोचे–मुलांचे ! ते गहाण ठेवून अडीचशें रुपये आणले तर ? गहाण ठेवणं म्हणजे काय विकणं नव्हे ! मोठ्या मिनतवारीनं मी बायकोलाहि याला तयार केलं आणि दुसऱ्याच दिवशीं अडीचशें रुपये त्या शांतीलालच्या हवालीं केले !

हो——शांतिलालच त्या गृहस्थाचं नांव ! कुठं मांटुग्याला रहातो म्हणे ! त्याचं घर–दार मी पाहिलं नव्हतं. पाहण्याची गरजच काय ? तो माझ्या दारीं न चुकतां ठरल्या वेळेला येत होता. त्यानंतर मात्र एकदोन दिवस तो आला नाहीं. मला वाटलं, त्यानं अडीचशें रुपये मारले तर नसतील ! आणि मारले असले तर ? मला घरदार फिरल्याचा भास झाला.

पण ऐनवेळींच शांतिलाल पुनः आला. मला धीर आला. तो म्हणाला, कीं मी दोन दिवस आलों नाहीं; कारण तुमच्याच कामांत होतों आम्ही. काकूभाईच्याकडे लाखों रुपये पडून आहेत– आतां मला माझ्या धनिकाचं नांव कळलं——काकूभाई ठक्कर ! धनिक काकूभाई आणि दलाल शांतिभाई ! मी तें मनाशीं चारदोनदां घोळलं. त्यानं खुलासा केला, कीं धान्याच्या काळ्या बाजारांत लाखोनीं 'काळा पैसा' मिळालाय काकूभाईला. त्यापैकींच एक लाख रुपये त्याला 'व्हाईट' करायचे होते. त्यालाच दोन दिवस लागले. आपलं ॲग्रिमेंट तयार असून, आतांच बरोबर चला आणि सही करून पहिला पांच हजाराचा हप्ता घेऊन या.

मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणं मी त्याच्या मागून चाललों ! टॅक्सी करून भातबाजारांत आलों. एका बॅंकेच्या व्हरांड्यांतच काकूभाईची पेढी होती.

समोरच्या मोकळ्या जागेंत मुनीम व्यापारी वगैरे मंडळी बसली होती. आंत पार्टीशनच्या मागें काकूभाईंची खास बैठक होती—मला पाहतांच त्यांनीं माझं स्वागत केलं. आमचं हस्तांदोलन झालं. ओळखदेख झाली. काकूभाईंनीं चहा मागिवला आणि तो येईपर्यंत त्यांनीं बोलायला सुरुवात केली, ‘ हें तुमचं ॲग्रिमेंट तयार आहे आणि हे तुमचे पांच हजार ! ’

टेबलाच्या ड्रॉवरमधून त्यांनीं एक नोटांचं पुडकं मला दाखवलं. मीं तें पाहिलं. मोजले नाहींत—पण त्यांत पांच हजार असतील अशी त्या आकारावरून खात्री झाली. मी ॲग्रिमेंटवर सही केली. काकूभाईनंहि केली आणि लगेच त्यानीं मला विचारलं—‘ दोन हजार रुपये आणलेत का ? ’

‘ कसले ? ’

‘ रॉयल्टीचे दोन हजार आधींच घेत असतों आम्ही. ’

‘ तीन हजार द्या ना हप्त्यापैकीं—म्हणजे—’ मी चांचरलों.

‘ छे. छे—व्यवहार म्हणजे व्यवहार, ’ काकूभाई म्हणाले, ‘ दोन हजार द्या न् हे पांच हजार घेऊन जा. ’

आली पुनः पंचाईत ! खिशांत दोन रुपये नव्हते—तिथं दोन हजार आणायचे कुठून ? ‘ आतां आणले नाहींत. उद्यां परवां व्यवस्था करतों, ’ म्हणून मी उठलों; पण काकूभाईंनीं चहाचा आग्रह केला. तो घेतला आणि मी घरीं आलों.

योगायोग पहा—घरीं सुप्रसिद्ध सिनेतारका रत्नमालाबाई आल्या होत्या. त्यांची माझी ओळख थोडीफार होतीच. मी चित्र सुरू करणार आहे, अशी गांवांत वावडी उडत होती. मला पहातांच त्या म्हणाल्या, ‘ मग राहिलंय कशांत ? ’

मी सारा इतिहास त्यांना सांगितला. त्या म्हणाल्या, ‘ हें नक्की आहे ना ? ’ मी म्हणालों, ‘ नक्की म्हणजे—पैसे टेबलावर काढून ठेवले होते माझ्यासाठीं. पण हे गुजराथी लोक म्हणजे पक्के व्यवहारी. ’

रत्नमालाबाईनीं मला सांगितलं, ‘ कांहीं काळजी करूं नका. मी उद्यां पाठवते पैसे. ’

आणि खरोखरीच कांहीं चिठ्ठीचपाटी न करतां दुसरे दिवशीं बावडेकर माझ्याकडे दोन हजार रुपये घेऊन आले. मी ते घेऊन धांवतच काकूभाईकडे गेलों. तो केबिनमध्यें कोणाशीं तरी बोलत होता. मी आलोंय हें कळतांच त्यानं त्याला बाहेर काढलं आणि मला आंत बोलावून घेतलं. मी दोन हजार रुपये घेऊन आलों आहें, हें कळतांच तो म्हणाला, ‘ जरा लौकर नाहीं यायचं. आतांच बँकेंत भरले मी पैसे. कांहीं हरकत नाहीं. चेक देऊं कां तुम्हांला ? ’

ॲग्रिमेंटवर सह्या झाल्याच होत्या. मग चेक घ्यायला काय हरकत आहे, म्हणून त्यांनीं मला आपला ॲग्रिमेंट आणि पांच हजाराचा क्रॉस–ऑर्डर चेक सही करून दिला. चहा घेतां घेतां त्यांनीं पुनः मला विचारलं, ‘ त्या शांतीभाईचा काय लफडा नाहीं ना ? ’

‘ कसला ? ’

‘ त्याच्या कमिशनचा ? ’

‘ मी देईन त्याला. ’

‘ बघा हं––मला तरास नको त्या साल्याचा. ’ म्हणून तो म्हणाला, कीं ‘ तो शांतिभाई महा हलकट माणूस आहे. पुष्कळांना फसवलंय त्यानं. कमिशन म्हणेल, वकील फी म्हणेल आणि तुमच्याकडून शंभर–दोनशें रुपये काढील साला. ’

मला अडीचशें रुपयांची आठवण झाली. मी म्हणालों, ‘ माझ्याकडून अडीचशें रुपये घेतलेत त्यानं. ’

‘ कशाबद्दल ? ’

‘ सॉलिसीटरच्या फीबद्दल. ’

‘ आणि तुम्ही दिलेत त्याला ! ’

‘ हो—’

‘ मला कां नाहीं विचारलंत ? साला लई बदमाष आहे. पुनः पै देऊं नका त्याला. त्याचा कमिशनबी देऊं नका मला सांगितल्याशिवाय. ’

काकूभाई फार चांगला माणूस आहे, म्हणत मी घरीं आलों. खातें उघडून मी पांच हजाराचा चेक बँकेंत भरला आणि रत्नमालाबाईंना सांगितलं, ‘ चेक कॅश होतांच तुमचे दोन हजार पाठवून देतों. ’

आणि दुसरेच दिवशीं मला विलक्षण धक्का बसला ! काकूभाईचा चेक ‘ स्टॉप पेमेंट ’ म्हणून परत आला होता. मला काय होतंय हेंच कळेना. अडीचशें रुपये शांतीभाईनं खाल्ले होते. दोन हजार रुपये काकूभाईने मारले होते. अडीचशें रुपये माझे तरी होते. आतां रत्नमालाबाईंना काय उत्तर देऊं ?

मी ताबडतोब वकीलाकडे गेलों. माझगांव कोर्टांत फौजदारी केस मीं दाखल केली. आयुष्यांत मीं दाखल केलेली ही पहिली आणि शेवटची केस ! त्याचं समन्स लावायलाच केवढा त्रास पडला मला. काकूभाईच्या पेढीवर शंभर फेऱ्या घातल्या तेव्हां एकदां कुठं तो सांपडला. त्यानं समन्स सही करून घेतलं आणि तो निर्विकारपणें हंसला. इतकं निर्लज्ज हास्य मीं जन्मांत कुणाचं पाहिलं नव्हतं. त्यावेळीं पेढीच्या दारांतले लोक म्हणाले मला, ‘ दोन हजार बुडाले म्हणा आणि गप्प बसा. बापाचं नांव न् पैसा घालवून कडका झालाय हा काकूभाई. तो तुम्हांला काय पैसे देणार ? आजकाल हेच धंदे आहेत त्याचे ! ’

आणि तेंच खरं झालं ! फौजदारी केस ‘ सिव्हिल कोर्टांत जा ’ म्हणून फेटाळली गेली आणि सिव्हिल कोर्टांत जाऊन घ्यायचं काय त्या काकूभाईचं ! उलट कोर्ट फीलाच पुनः पैसे भरावे लागले असते मला.

मी तो नाद सोडून दिला. हप्त्याहप्त्यानं रत्नमालाबाईंचे पैसे मीं फेडूं लागलों. त्यानंतर मी दिग्दर्शक झालों—निर्माता झालों—लेखक झालों.

हरेक क्षेत्रांत भरघोस यशहि मिळालं. आज मला काकूभाई कुठं दिसत नाहीं. त्याची पेढीहि जागेवर नाहीं, असं म्हणतात. शांतीभाईसुद्धां किती वर्षांनीं परवांच चौपाटी रोडवर दिसला मला! त्याचं तोंडहि पाहण्याची माझी इच्छा नव्हती; पण नको तीं तोंडंच टाळतां येत नाहींत माणसाला— तो पुढं येऊन हंसला, 'कसं काय चाललंय ?'

'ठीक चाललंय आपल्या कृपेनं.' मी दोन्ही हात जोडून म्हणालों.

यावर तो पुनः एकदां हंसला. मला वाटलं, यापेक्षां तो रडला असता तर अधिक चांगला वाटला असता.

० ० ०

# १० : आई-अण्णा

पूर्वसंचितावर येरवीं मीं विश्वास ठेवला नसता; पण तो ठेवावासा वाटतो याला कारण—माणसाचा जन्म! मनुष्य हा बुद्धिमान प्राणी आहे; बुद्धिबळावर त्यानं निसर्ग जिंकला आहे; आणि भक्तीच्या बळावर तो देवालाहि प्रसन्न करून घेतो, असं म्हणतात. फक्त एकच गोष्ट त्याला अद्यापि जिंकतां आलेली नाहीं—ती म्हणजे आपला जन्म! आयुष्यांत हरेक गोष्ट माणूस निवडूं शकतो; निवड चुकली तर ती बदलूं शकतो; नाकारूं शकतो. फक्त एकच एक निवड त्याच्या हातीं नाहीं. ती निवड बरी वाईट कशीहि असो, त्याला बदलतां येत नाहीं; आणि म्हणूनच अशा अपरिहार्य वेळीं पूर्वसंचितावर विश्वास ठेवणं भाग पडतं. पूर्वसंचित बरं वाईट जें कांहीं असेल, त्याप्रमाणं त्याचं फल माणसाला या जन्मीं भोगावं लागतं. माझं पूर्वसंचित चांगलं आहे, असं मला नेहमीं वाटतं; कारण एकच—मी माझ्या आई—अण्णांच्या पोटीं जन्मलों !

मी केव्हां जन्मलों, कुठं जन्मलों, हें मला सांगतां येणार नाहीं. मला वाटतं, हें कोणालाच सांगतां येणार नाहीं. जन्माच्या वेळीं माणूस

इतका अजाण असतो, कीं त्याला कांहीं म्हटल्या कांहीं कळत नसतं; इतका लहान मांसाचा लोळागोळा असतो, कीं त्याला आईच्या दुधावरच जगावं लागतं, वाढावं लागतं. अन्नदात्याला देव मानण्याची मानवाची प्रवृत्ति आहे. या प्रवृत्तीनंच असेल, माणसाच्या जीवनांत देवत्वाचा पहिला साक्षात्कार होतो, तो आईच्या अकृत्रिम मायेनं आणि वडिलांच्या कृपा-छत्रानं !

माझं मूळगांव वास्तविक बेनाडी-जिल्हा बेळगांवमधील चिक्कोडी तालुक्यांतील एक खेडं ! पण असं सांगतात, कीं मी जन्मलों तेव्हां कोल्हा-पुरांत प्लेग चालू होता आणि लोक आसपासच्या लहानसहान खेड्यांत आणि वाड्यांत रहायला गेले होते. माझी आईसुद्धां कोल्हापूर शेजारच्याच उचगांवांत रहात होती आणि तेथेंच एका लहानशा घरांत सूर्योदयाबरोबर तिनं मला जन्म दिला. सहा नोव्हेंबर एकोणीसशें पंधराचा तो दिवस! (याला आधार माझी जन्मपत्रिका) प्लेगाची सांथ शहरांत असली, तरी ते दिवाळीचे दिवस होते. दिवाळीच्या आदला दिवसच म्हणा ना-नरक चतुर्दशी ! दिवाळीचा एन दीपोत्सव नसला तरी त्या दीपोत्सवाची सुरवात झाली होती. जणुं काय, मी जन्मलों हें नगरीला जाहीर झालं आणि घरोघरीं अंगणीं आकाशीं दीपोत्सव साजरा झाला ! या योगायोगालासुद्धां नशीब लागतं, नाहीं का ?

तसा मी गर्भश्रीमंत नव्हतों आणि नाहींहि! पण दारिद्र्याची सांवली-किंवा झळ म्हणा-मला कधीं बाधली नाहीं. पाळण्यांतले दिवस कांहीं आठवत नाहींत. पण लहानाचा मोठा होत होतों तेव्हांचे आजोळचे दिवस आठवतात. सातारा जिल्ह्यांतील बत्तीसशिराळ्याचे श्रीमंत शिंदे यांचा आलिशान वाडा म्हणजे माझं आजोळ ! माझ्या आजीचा मी अति-शय लाडका होतों. बालपणीं पाठ्यपुस्तकांत वाचलेला रंगीत पाळणा तिनं

सुतार उत्तमसा मिळवून माझ्यासाठीं बनवला होता आणि पाळण्यावरच चिमण्या–राघूंचं सुंदरसं छत बांधलं होतं. वडलांच्या गांवीं म्हणजे बेनाडी-लाहि तो पाळणा कित्येक वर्षं मीं पाहिला. आम्ही सारीं भावंडं त्यांतच झोंपलों, त्यांतच वाढलों. आजीनं शिवलेली जरीची घोणची अजुनी आमच्य घरीं आहे. ती पाहिली कीं माझ्या आजीच्या अमाप मायेची आठवण होते; आणि म्हणूनच मीं ती जपून ठेवली आहे; जितकी जपतां येईल तितकी यापुढंहि जपणार आहे.

माझ्या आजीच्या माझ्या बद्दलच्या मायेला मर्यादा नव्हती; म्हणूनच आजोळीं मी अनिर्बंध असे. अजुनी मला आजोळचे ते दोन्ही चिरेबंदी वाडे आठवतात. त्या वाड्यामध्यें खेळतांना खोडकरपणें गल्लीं-तल्या कोंबड्या आणि शेळ्या पकडून ठेवण्याची मला खोड होती. त्या शेळ्यांचं दूधहि माझी थोरली बहीण काढत असे. त्या बद्दलच्या क्षुल्लकशा अनेक तक्रारी आजीकडे येत. पण आजीची सर्वांना ताकीद असे, "जें कांहीं नुकसान होईल त्याबद्दल पैसे घेऊन जा. पणं माझ्या नातवाला बोलायचं कारण नाहीं." आजीची ही आज्ञा पाळली जात होती, येवढं खरं! त्या आज्ञेनंच अनेक लहान मोठीं खेळणीं मला खेळायला मिळालीं; दिवाळीचं दारू सामान उडवायला मिळालं. अजुनी तो पुरातन किल्ल्या-प्रमाणं भासणारा शिंद्यांचा वाडा मला आठवतो. त्याची स्मृति माझ्या मनोमंदिरीं इतकी पवित्र आहे, कीं आजीच्या मरणानंतर जवळ जवळ पस्तीस चाळीस वर्षांनीं मी परवांच शिराळ्याला गेलों होतों. काम होतं महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धि खात्याच्या अनुबोधपटाचं! वारणा प्रकल्पा-बद्दलची माहिती मिळवतां येईल तेवढी मिळवली; आणि नंतर पहिली गोष्ट मीं कोणती केली असेल, तर माझ्या आजीच्या वास्तव्यानं पुनीत झालेली ती वास्तु मी डोळे भरून पाहिली आणि आजीच्या पवित्र स्मृतीला भक्ति-

भावानं वंदन केलं ! माझी आजी तेथें नव्हती; वाडाहि जुनापुराणा भासला मला. पण माझ्या आजीची माया आजीच्या माणसांनीं–श्रीमंत भाऊसाहेब शिंदे यांनीं मला दिली. माझ्याबरोबर माझी पत्नी सौ. सुमन हीहि होती. तिलाहि त्या मायेचा साक्षात्कार झाला आणि धन्यता वाटली. तिथला नागपंचमीचा तो सुप्रसिद्ध उत्सव, ओढयाकांठची पुरातन चिंच आणि गोरखनाथांचं देऊळ यांची स्मृतीहि सदैव ताजी आहे. अजुनी सारखं वाटतं, लहान व्हावं, तिथं जावं, हट्ट धरावा, आणि ––

आजीप्रमाणं माझ्या आईबद्दलच्या बालस्मृतीहि अशाच गोड गोड आहेत. एक गोष्ट खरी, स्वतःच्या मुलाचं कौतुक स्वतःच करण्याची पद्धति आमच्या घराण्यांतच नसावी. मुलांचं कौतुक होई––पण तें दुसऱ्यांच्या ! म्हणूनच चुलत्यांचीं मुलं माझ्या आई–आण्णांच्या अंगाखांद्यावर खेळलीं; आणि मी माझ्या तात्यांच्या आणि तातुकाकांच्या (ना. बाळासाहेब देसाई यांचे श्वशुर) अंगाखांद्यावर बागडलों ! परसांतल्या गोठ्यांत म्हशी असायच्या; त्यांचं धारोष्ण दूध प्यावं; डेऱ्यांत ताईनीं घुसळलेलं ताकलोणी खावं आणि आईनं भरवलेला दूधभात पोटभर खाऊन ढेंकर द्यावा, हा माझा दिनक्रम असे. शाळेबद्दलचं प्रेम मला फारसं नव्हतंच–किंबहुना भीतीच अधिक वाटायची. त्यामुळें श्री. शंकरकाका, धनगर मास्तर आणि मुचंडी मास्तर यांसारखे प्रेमळ पण शिस्तबद्ध गुरुजी लाभूनहि शाळा म्हणजे माझ्या घरांतला रोजचा सकाळदुपारचा खास "कार्यक्रम" असायचा. आमची शाळा सकाळ–दुपार भरे; त्यामुळें शाळेसाठीं मला दोनदां मार खावा लागे. या बाबतींत माझे चुलते तात्या आणि बापू (क्षात्रजगद्गुरु) कार्यतत्पर होतेच–पण आण्णांची नजर त्यांपेक्षांहि करडी असायची !

सुदैवानं त्या करड्या नजरेची जरब मला क्वचितच लाभे. कारण आण्णा घरांत––म्हणजे गांवांतच मुळीं–क्वचितच असायचे. कोणाची

निवडणूक आहे, कोणाची कोर्टकचेरी आहे, म्हणून ते बहुतेक वेळ तालु-क्याला, नाहीं तर जिल्ह्यालाच असायचे. याचा अर्थ असा नव्हे, कीं त्यांच्या ठायीं मुलांबद्दल माया नव्हती. दिवसां दरारा वाटणारे आण्णा रात्रीं आम्हांला प्रेमळ भासत. मला आठवतं, ते गांवीं असले कीं रात्रीं आंगणांत जाजम टाकून वाऱ्यावर पडण्याची त्यांना आवड होती. आम्ही मुलंहि जेवणं झाल्यावर त्यांच्या आसपास लवंडत असूं. अशा वेळीं ते आम्हांला नक्षत्रांची माहिती सांगत; गुरु, शुक्र, सप्तर्षि आदि तारे त्यांनींच मला दाखवले आणि वाटायचं, त्यांच्याच सांगण्यानं जणुं आकाशांतला चंद्र आंगणांतल्या लिंबावर बसायला येतो जातो. शाळा चुकवली, कीं या चांदण्या ते आम्हांला दिवसांहि दाखवित असत!

कारण कांहीं असो–आण्णांच्याबद्दल मला एक प्रकारची भीतीच अधिक वाटायची, येवढं खरं! म्हणूनच जेव्हां घरीं ठरलं, कीं शिक्षणासाठीं आम्हीं कोल्हापुरला जाणार आहोंत आणि मामांच्या (रावसाहेब व्ही. टी. पाटील) देखरेखीखालीं रहाणार आहोंत, तेव्हां मला केवढा सुटकारा वाटला. वडलांच्या तडाख्यांतून सुटलों, हाच सुटकेचा निश्वास त्यांत होता. वाटायचं–आण्णा खेड्यांतल्या घरांत कधीं नसायचे. ते कशाला येताहेत शहरांत? पण माझी वेळ बरी नव्हती; मला शाळेंत घालायला ते आलेच.

कां कोण जाणें–त्यांचा मराठा मुलांवर विलक्षण राग! मराठ्यांचीं मुलं म्हणजे आळशी, खोट्या श्रीमंतीचा त्याहीपेक्षां खोटा अभिमान आणि शिक्षणाची अनास्था त्यांच्या पांचवीलाच पुजलेली! म्हणून आम्हीं मराठा मित्रांच्या संगतीला लागत नाहीं ना, याबद्दल फार दक्ष! या दक्षतेनंच म्हणे, त्यांनीं आम्हांला चुलत्यांकडे किंवा मराठा बोर्डिंगांतहि ठेवलं नाहीं. आम्हांला शाळा लाभली तीहि विद्यापीठ म्हणजे तोफखाने–दीक्षित या

ब्राह्मणद्वयांची ! आणि मित्रहि लाभले ते गुणे, शेवडे, पोतनीस असे ब्राह्मण कुलोत्पन्नच ! वास्तविक, माझं मत म्हणाल तर हे माझे ब्राह्मण मित्र माझ्या इतकेच नालायक होते–(शिक्षणाच्या बाबतींत हं); पण हें वडलांना सांगण्याची धमक माझ्यांत नव्हती. पुढें मी थोडासा मार्गावर आलों, तें कॉलेजांत गेल्यावर–विलास शहाची मैत्री झाली म्हणून ! शहा आतां सोलापूरला वकील आहे. कॉंग्रेसच्या संघटनेंतहि महत्त्वाचा कार्यकारी घटक आहे. त्याच्या सांगण्यानंच माझं अभ्यासाकडे मन वळलं आणि बी. ए. ला मी, कधीं नाहीं तें, पहिल्या वर्षी पास झालों.

मात्र वडलांची बालंबाल खात्री–शिकावं ब्राह्मणांच्या मुलांनींच ! त्यांची संगत अधिक लाभावी म्हणून मला त्यांनीं विद्यापीठाच्या तपोवनांतहि ठेवलं ! हें तपोवन कोल्हापुरच्या दक्षिणेस चार मैलांवर आहे. जागा निसर्गरम्य आहे. रोज मी तेथें रहायला सायकलवरून जायचा आणि यायचा. छात्रालय म्हणून ते खरंच चांगलं आहे. पण माझ्या आजीला हें कसं पसंत पडावं ? तिच्या सांगण्यानंच मला तें सोडावं लागलं. तिचं म्हणणं असं, कीं पोरानं गांवाबाहेर रहायचं तर आईबाप आहेत कशाला ?

कोणाचं कांहीं ऐकण्याचा आण्णांचा स्वभाव नाहीं. पण येवढं खरं, आजीसमोर त्यांची मात्रा चालत नसे. याचा मला चांगला अनुभव आला म्हणजे–एकदां मी लागोपाठ पंधरा दिवस शाळा चुकवली तेव्हां. काय झालं, आमच्या विद्यापीठांत तेव्हां काका मोडक नांवाचे शिक्षक होते. त्यांचे भेदक डोळे, जाडजूड मिशा आणि तितक्याच जाड भुंवया, यांची मला विलक्षण भीति वाटायची. त्यांच्याच भीतीनं मी त्यांचा तास चुकवी. तास म्हणतां म्हणतां दिवसावर पाळी आली आणि मग मला कोल्हापूरच्या सुप्रसिद्ध टाऊन हॉलमध्यें दिवसभर "इसुक्या" खेळणं भाग पडूं लागलं. मी सकाळीं दप्तर घेऊन बाहेर पडे आणि शाळा सुटायची वेळ झाली, कीं

परतत असे. घरीं कोणालाच याची कल्पना नव्हती; आणि असणार कशी? परीक्षेंत नापास झालों तर? म्हणून मला चिंता वाटे. पण लगेच मी म्हणे—"मराठ्यांचीं मुलं पास कशी होणार?" पण परीक्षेची पाळीच आली नाहीं. एके रविवारीं सकाळीं दीक्षित मास्तरच आमच्या घरीं हजर! दिनकर पंधरा दिवस शाळेला आलेला नाहीं, तेव्हां तो आजारी आहे कीं काय? दीक्षित मास्तरांच्या शिष्यप्रेमानं आमच्या शाळेचं बेंड फुटलं आणि माझी खात्रीच झाली, कीं आज आपलं थोबाड फुटणार! माझ्या दुर्दैवानं वडील तेव्हां घरींच होते. ते दीक्षित मास्तर केव्हां जातात, याचीच वाट पहात होते. या संधीचाच मी फायदा घेतला आणि आजीच्या कुशींत लपलों. तिची क्षमा मागितली. पुन्हां असं करणार नाहीं, असं तिला वचन दिलं आणि तिची प्रार्थना केली, "आजी कांहीं कर, पण या प्रसंगांतून मला सोडव."

आजीचं अंतःकरण आईचंच! तिनं मला अभय दिलं आणि "दिन्या कुठें आहे?" या आण्णांच्या प्रश्नाला तंबीनंच उत्तर दिलं, "खबरदार माझ्या पोराला हात लावाल तर! नाहीं शिकला तर राहूं दे. पण मारून भित्रा करूं नका पोराला." वडील कांहीं बोलले नाहींत. आजीच्या कवचकुंडलांनीं माझी सुटका केली.

अशीच आणखी एकदां आजीनं माझी सुटका केली होती. मी सिनेमासाठीं केलेली चोरी उघडकीला आली होती. वडलांच्या तावडींत सांपडलों असतों तर माझी धडगत नव्हती. ती कबूल करतांच आजीनं मला अभय दिलं आणि आण्णांना "मी दिलेत त्याला आठ आणे." म्हणून परत पाठवलं होतं. एक कां दोन—आजीच्या प्रेमाच्या आणि अभय देण्याच्या अनेक गोष्टी मी सांगूं शकेन. माझ्या बालपणीं आजी हीच माझी देवता होती. मी मागेन तें ती मला देई. मग त्या कोपऱ्यावरल्या दुकानां-

तल्या चविष्ट ‘ लिमजा ’ असोत, नाहींतर पतंगाचा धारदार ‘ मांजा ’ असो.

अस असतांनाहि शाळेंत मी पास होत होतों. एकेक इयत्ता वर जात होतों. एकदां आम्ही भल्या पहांटे उठून कोल्हापुरानजिकच्या प्रयागाला सारवट करून चाललों होतों. पंचगंगेपार आंबेवाडीपर्यंत आम्ही गेलों नाहीं, तोंच आमचे मामा सायकलवरून पाठोपाठ आले आणि त्यांनीं बातमी दिली, कीं आजी सकाळीं चव्हाणांच्या घरून आपल्याकडे येत असतांना वाटेंत म्हशीनं तिला मारलं आणि डॉ. राशिंगकरांनीं तिच्यावर उपचार केले आहेत. ही बातमी ऐकतांच माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं. त्या आजारांतून आजी बरी होऊन अशी उठलीच नाहीं. बिचारी औषधालाहि कंटाळली. तिच्याच सांगण्यानं औषधाच्या अर्ध्या अर्ध्या बाटल्या मी ओतून टाकल्या ! तिचा शब्दन् शब्द पाळायचा येवढंच माझं व्रत होतं. पण पुढं पुढं ती बोलायची बंद झाली आणि—

एके दिवशीं सकाळीं आम्हां मुलांना लौकर शाळेला जायला सांगितलं. कां कोण जाणे–त्यादिवशीं शाळेंत माझं लक्षच कशाकडे लागलं नाहीं. मी धांवत घरीं येऊन पाहिलं तेव्हां आजी घरांत नव्हती. तिचं अंथरूणहि जाग्याला नव्हतं. एक पणती तिथं तेवत होती. या सूचनांचा अर्थ उघड होता. तो आईनं हंबरडा फोडून मला सांगितला, “ दिनू , तुझी आजी गेली रे ! ” त्यादिवसासारखा मी कधींच रडलों नाहीं. आयुष्यांत प्रथम मला वाटलं, मी पोरका झालों; आई–अण्णा असूनहि पोरका झालों.

किती तरी दिवस मी आजीला विसरूं शकलों नाहीं. सारखी ती माझ्या स्वप्नांत येई. अजूनहि अधींमधीं तिचं स्वप्न मला पडतंच. मात्र तेव्हांपासून मी मनाची तयारी केली, आतां मी आण्णांच्या तावडींत सांपडलों. आई आजीची उणीव भरून काढील, अशी माझी कल्पना होती. तसा प्रयत्नहि ती करी. पण आजीप्रमाणं आईचं आण्णांच्या समोर कांहें

चालत नसे. आण्णा आजीला घाबरत; तेवढीच आई अण्णांना घाबरते, असं मला वाटे. तिला बिचारीला एकच ठाऊक होतं. रात्रंदिवस राबायचं आण्णांच्या शब्दाबाहेर आई कधींहि गेली नाहीं; मुलांसाठीं कष्टांत कसूर केली नाहीं. मला नेहमीं वाटायचं, मी आजीचा येवढा लाडका होतों; आई आजीची किती लाडकी असेल ! तरीहि ती लाडावलेली शिंद्यांची लेक बेनाडकर पाटलांच्या घरांत राबत होती. मात्र त्या राबण्यांत पतिबद्दल भक्ति होती; मुलांबद्दल माया होती. कसलीहि आसक्ति नाहीं. नुसता त्यागच तिच्या कपाळीं लिहिला असावा. संसाराच्या अनेक चित्रकथा मी आतांशा रंगवतों. पण आईच्या संसाराचा विचार करतों तेव्हा मला वाटतं, शंकराशीं लग्न करणाऱ्या पार्वतीचं व्रतच आईनं अंगिकारलं आहे. पतिप्रेमानं सारं ऐश्वर्य आईनं लाथाडलं आणि भोगलं काय तर आण्णांच्या संन्यस्त वृत्तीचं तांडव !

मला वाटतं, आण्णांच्या वृत्तींत हा बदल व्हायलाहि कारण झालं ! आण्णा मला अरसिक कधींच वाटले नाहींत. पण याच सुमारास एक दत्तक प्रकरण आमच्या घरांत झालं आणि त्या दत्तकानं सारं घर जणुं विरक्त बनलं. तसे माझे आण्णाहि दत्तकच गेले होते; पण त्यांच्या भावजयीनंहि दत्तक घेतला आणि घरांतलं स्वास्थ्य पार नाहींसं झालं. आण्णांनीं हौसेनं मोसंबीच्या बागा लावल्या होत्या; डाळिंबांचा मळा पिकवला होता. पण दत्तकाचा सुरुंग लागायचा अवकाश—त्या उभ्या बागा आण्णांनीं वाळूं दिल्या आणि त्यांच्या चिकोडी बेळगांवला वाऱ्या सुरू झाल्या. आण्णा आयुष्यभर दत्तकाशीं लढले. निकाल त्याच्या बाजूचा लागूनहि त्याला शेतांत पाय ठेवूं दिलं नाहीं. शेवटीं कुळकायद्याची अंमलबजावणी आली तेव्हां आपसातीची शरणागति पत्करूनच दत्तकाला या प्रकरणाचा शेवट करावा लागला. या कोर्टप्रकरणानं आण्णांनीं अकारण श्रम आणि पैसा

घालवला, असं कांहीं म्हणतात. पण मराठा रक्ताची रग ज्याला ठाऊक आहे त्याला पटेल, कीं " जिद्द " हीच मराठ्यांच्या पांचवीला पुजलेली देवता आहे. ती देवता भक्ताच्याच बळीनं प्रसन्न होण्याइतकी उग्र आहे, ही गोष्ट निराळी ! उद्यांच्या भक्तिहीन आणि बुद्धिनिष्ठ जगांत तिची पूजा होणार नसली; तरी तिच्या पूजकांपुढें बुद्धिमंतांनाहि आपली मान क्षणभर खालीं करावीशी वाटेल, यांत शंका नाहीं.

आण्णांनीं त्या चंडिकेची पूजा आरंभली होती. म्हणूनच आण्णा मला चंडिमातेइतकेच उग्र वाटत होते. त्यांचा धाक डोळ्यांसमोर ठेवूनच मामांच्या सांगण्याप्रमाणं कोल्हापुरांत कालक्रमणा करावयाचं मी ठरवलं. हो, एक सांगितलं पाहिजे. मी शाळा चुकवीत असलों, तरी बुद्धीनं " ढ " नव्हतों. थोडयाशा अभ्यासानंच मी परीक्षा पास व्हायचा. नापासाचा पहिला शिक्का मात्र मला मॅट्रिकच्या वेळीं मुंबई युनिव्हर्सिटीनं मारला. अशा वेळीं आण्णांचं व्याख्यान अगदीं ठरलेलं—— " शिकावं ब्राह्मणांच्याच मुलांनीं. " तें ऐकतांना मला वाटायचं, आण्णा इतकं बोलतात त्यापेक्षां मारत कां नाहींत मला ? आजी असतांना मरायला धांवायचे आणि आतां फक्त बोलतातच कां ? एकदां एक सिनेमा पाहिल्याबद्दल रविवारांतल्या " अमेरिकन इंडिया सिनेमा " पासून घरापर्यंत मारत आणलं होतं मला त्यांनीं. आतां मी घरांत असूनहि नुसतं बोलतात म्हणजे आश्चर्यच नाहीं काय ?

पण हें आश्चर्य नव्हतं. मुलांना वागवण्याच्या त्यांच्या स्वभावालाहि एक पद्धति होती. मुलांना बरं वाईट कळत नाहीं, अशा वेळीं त्यांना मारणं ठीक आहे. पण त्यांना कळायला लागल्यावर त्यांना विचार करायला लावणं, हेंच श्रेयस्कर ! आणि खरंच, तेव्हांपासून त्यांचा माझा रागालोभाचा संबंध असा कमीच झाला. फक्त आधींमधीं कानांवर शब्द येत, " माझं

पायताण त्याच्या पायाला येतंय आतां. आतां काय बोलायचं कुणाला ?"

मीहि शाळेंतून कॉलेजांत गेलों. कॉलेजांतहि एक दोन "वन्स मोअर" घेतल्याच; घेऊं नये तिथंहि घेतल्या. कारण नकळत मी कॉलेजच्या वाङ्मयीन कंपूंत सामील झालों होतों. मला आठवतं, त्या मंडळांत माझे मित्र वि. वा. पत्की, शि. आ. स्वामी, कवि राजस, हीं मंडळी होती; तर कॉलेज बाहेरील सी. गो. सरदेसाई, द. ना. देशपांडे आणि ग. दि. माडगूळकर यांचीहि संगत वाढून माझ्या दिनश्चर्येला निराळंच वळण लागलं. विलास शहामुळें मला अभ्यासाची दिशा दिसली; आणि इतरांकडून वाङ्मयाची आवड लाभली. त्या आवडीमुळेंच मी कॉलेजच्या मासिकाचा संपादकहि झालों; आई आण्णांना माझा राग यावा, असंहि कांहीं घडत नव्हतं आणि माझं प्रेम वाढावं, असंहि कांहीं घडत नव्हतं.

पण जें घडलं त्यानं माझी सत्वपरीक्षा घडणार होती. याच वेळीं शारदा–मंडळाच्या वक्तृत्व–चढाओढीचा मी परीक्षक होतों; आणि त्या चढाओढींत बक्षीस पटकावणाऱ्या सुमन शिंदे नांवाच्या एका चुणचुणीत मुलीच्या प्रेमांत मी पडलों. या आमच्या प्रेमाला घरांतून विरोध होणार याची मला खात्री होती. पण ज्या विश्वासानं सुमननं माझ्या प्रेमाला प्रतिसाद दिली होती, त्या विश्वासाला पात्र होणं माझं कर्तव्य होतं. वडलांना हें पसंत नव्हतं आणि आण्णांना पसंत नव्हतं म्हणून आईसुद्धां मूग गिळून गप्प बसली होती. काय होणार याबद्दल मला विलक्षण भीति–शंका वाटत होती.

पण प्रेमिकांना सदैव धीर देणारं नैतिक बळ माझ्या पाठीशीं होतं. त्या नैतिक बळालाच मा. विनायक यांनींहि आपला हार्दिक पाठिंबा दिला आणि आम्ही एकोणतीस जून एकोणिसशें एकेचाळीस रोजीं नर्सोबाच्या वाडीस जाऊन विवाहबद्ध झालों. आतां अनुभवांतीं वाटतं, कीं आईवड-

लांचा राग म्हणजे चहाच्या कपांतलं वादळ ! लगेच तें शांतहि झालं आणि आज मला आनंद वाटतो, कीं माझी पत्नी हीच आण्णांची आवडती सून ठरली आहे.

मीहि त्यांचा आवडता झालों आहें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणं असेल कदाचित्–ब्राह्मण मित्रांच्या संगतीनंच मी लेखक झालों आहें आणि सिनेमाच्या क्षेत्रांत नांव काढलं आहे. नाहीं तर बेनाडकर पाटलांच्या पोरानं लेखक–दिग्दर्शक व्हावं, याला अन्य कांहीं कार्यकारण भाव ? येवढं खरं, आण्णांच्या भीतीची जागा आतां त्यांच्या बद्दलच्याच आत्यंतिक आदरानं घेतली आहे. त्यांनाहि माझा अभिमानच वाटत असावा. कारण ते पूर्वी नेहमीं म्हणत असत, "लोक मला जगद्गुरूंचा भाऊ म्हणून ओळखतात." आतांशा ते म्हणूं लागले आहेत, "पूर्वी लोक मला जगद्गुरूंचा भाऊ म्हणत. मध्यंतरीं व्ही. टीं. चा सासरा म्हणूं लागले. आतांशा दिनकर पाटलाचा बाप म्हणून ओळखतात."

काय झालं–कोल्हापूरला मी शूटिंगच्या कामाकरतां गेलों, कीं बहुतेक शाहू लॉजमध्यें उतरतों. एकदां आण्णा मला भेटायला आले; पण मी मुक्कामावर नव्हतों. शाहू लॉजच्या घोरपड्यांनीं त्यांना विचारलं, "कोण आलं होतं म्हणून सांगू त्यांना ?"

आण्णांनीं काय उत्तर द्यावं ? "दिनकरराव, तुमच्या खटकेबाज संवादाचं रहस्य मला कळलं !" म्हणून घोरपड्यांनीं मला सांगितलं. आण्णा त्यांना म्हणाले होते, "दिनकर पाटलामधला "द." आला होता म्हणावं तुझ्याकडे."

आण्णांचे हे कृतार्थ बोल ऐकण्याची संधि दिल्याबद्दल देवाचे मी नेहमीं आभार मानतों. देव दयाळू आहे, हें मला नेहमींच पटत आलं आहे. कारण त्यांच्या कृपेमुळेंच नाहीं कां, आईआण्णांच्या आशीर्वादाचं

छत्र मला सतत लाभत आलं आहे. आण्णांनीं मला काय दिलं, याचा विचार करतांना एकच कृतज्ञतेची भावना माझ्या मनांत सारखी उफाळून येते. शिक्षण आणि सांवली दिली हें काय कमी झालं ? त्या अभावीं प्रतिभावंत कवीहि म्हणत असतात,

" आई म्हणोनि कोणी आईस हांक मारी
ती हांक येइ कानीं, मज होय शोककारी "

हा शोक करण्याची पाळी देवानं अद्यापि माझ्यावर आणली नाहीं. आज ना उद्यां ती येणार ही जगरहाटी असली, तरी आतां मला समजूं लागलं आहे. त्या वेळीं शोक आवरून मी देवाला सांगणार आहें, " देवा, तूं दयाळू आहेस ना ! माझ्यावर निरंतर दया दाखवीत आला आहेस खरा. तीच दया पुढल्या जन्मींहि दाखव आणि मला माझ्या आईआण्णांच्याच पोटीं पुन: जन्माला घाल. जन्मोजन्मीं मला ऐकूं दे, अरे, हा दिनू नव्हे का ! दत्तू पाटलांचा शिराळच्या बायक्काचा पोरगा ! "

[ पूर्णविराम ]

# आमचीं अगदीं नवीं प्रकाशनें

**ग. दि. माडगूळकर**

१. काव्यकथा
२. युद्धाच्या सांवल्या
३. कृष्णाची करंगळी
४. तीन चित्रकथा
५. शशांक मंजिरी

**वि. वि. बोकील**

६. फोल आशा
७. तऱ्हेवाईक वायको
८. शहेनशहा
९. विजय
१०. तुकारामाचा परीस
११. निवडक वसंत
१२. मीनाच्या गोष्टी
१३. लाडका राजा

**अरविंद गोखले**

१४. माहेर

**ना. सी. फडके**

१५. जेहूलम
१६. बस नंबर बारा
१७. लव्हेंडर
१८. उन्माद
१९. प्रेम पहावं करून !

**कमला फडके**

२०. दरवळ

**चिं. वि. जोशी**

२१. द्वादशी
२२. मेषपात्रें
२३. निवडक गुंड्याभाऊ

**दा. न. शिखरे**

२४. स्वतंत्र भारताची भरारी

**कवि 'यशवंत'**

२५. हापिसर

**दिनकर द. पाटील**

२६. शंभर रुपये
२७. माझे शिल्पकार

**पंडित अनंत कुलकर्णी**

**संपादित**

२८. लाडक्या लेकी
( मराठी कथा नवनीत )
भाग १–२–३
२९. किशोरकुंज
भाग १–२–३

**सौ. सुहासिनी इर्लेकर**

३०. तृप्ति

**द. ब. मुद्गल**

३१. शब्दगंध

**प्रा. ल. ग. देव**

३२. हेमंत

**राम अनंत कुलकर्णी**

३३ मौज आणि फौज

**दत्त रघुनाथ कवठेकर**

३४. चांदण्यांतील सावल्या
३५. गुलाबाच्या पाकळ्या

३६. मंदा
३७. उजेडांतील अंधार
३८. नादनिनाद
३९. आपुलकीची झळ
४०. शालन्

**शंकर पाटील**

४१. धिंड

**प्रा. इंद्रराव पवार**

४२. पहिलें प्रेम

**वसंत शा. वैद्य**

४३. अकल्पिता

**मा. गो. काटकर**

४४. मधुधारा

**सुशीला चिकटे**

४५. प्रमोदिनी

कुलकर्णी ग्रंथागार, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. 92894
REFBK-0012415
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33८६४ वि: वार
क्रमांक 9063 नों. दि. 23-99-62

कोटींची भरीव मदत जाहीर केली. भाऊसाहेब हिऱ्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राची शक्ती खची झाली याचेही दुःख यशवंतरावांना होत होते. त्यातल्या-त्यात महाराष्ट्राच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट म्हणणे गोवामुक्ती. डिसेंबर १९६१ मध्ये गोवा स्वतंत्र झाला. गोव्याच्या स्वातंत्र्याच्या लढाईत महाराष्ट्राने पुढाकार घेतल्यामुळे त्याच्या यशापयशाचे परिणाम महाराष्ट्रीय जनमनावर घडत होते. राष्ट्रनेत्यांच्या गोवामुक्तीच्या कार्याने महाराष्ट्रास सर्वांत जास्त आनंद झाला.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर यशवंतरावांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा करून पंचायत राज्याची मुहूर्तमेढ रोवली. देशात पंचायत राज्य सुरू होऊन दोन वर्षे होत आली होती. महाराष्ट्र त्या मानाने मागेच होता. तथापि महाराष्ट्राचे पंचायत राज्य हे देशातील अधिक उत्तम प्रकारचे पंचायत राज्य तयार झाले आहे. लोकशाही विकेंद्रीकरण हे सर्वांत खालच्या म्हणजे तालुका पातळी-पर्यंत असावे असे मानले जाते; आणि तशा प्रकारचे पंचायत राज्य सर्वत्र सुरूही झाले आहे. तथापि ते संकुचित नेतृत्वाच्या, प्रसंगी ध्येयशून्य गटाच्या अगर गुंडांच्या ताब्यात जाण्याचा धोका जास्त आहे. शिवाय त्यात सत्तेचे खरे विकेंद्रीकरण नसते. तालुका पातळीवरील सर्व सत्तेचे विकेंद्रीकरण असले तरी आपल्या राज्यपद्धतीत खरी सत्ता ही जिल्ह्याच्या ठिकाणीच असल्यामुळे विकेंद्रित लोकशाहीच्या नियंत्रणाखाली जिल्ह्याची संपूर्ण सत्ता असल्याखेरीज खरे विकेंद्रीकरण होऊच शकत नाही. त्या दृष्टीने महाराष्ट्राने जिल्हा परिषदेद्वारा अमलात आणलेले लोक-शाही विकेंद्रीकरण हे खरे पंचायत राज्य होय.

१ मे १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य वर्धापन दिनाच्या शुभ मुहुर्तावर पंचायत राज्य स्थापन केले. त्या समयी दिलेल्या संदेशात यशवंतराव म्हणतात, "ग्रामीण लोकांची विचक्षण विचारशक्ती, ऐक्यभाव व कष्ट करण्याची कुवत लक्षात घेता पंचायत राज्याचा आपला प्रयोग पूर्ण यशस्वी होईल, व सबंध भारतभर लोकशाहीचा रंग दिमाखाने झळकेल अशी खात्री वाटते."

महाराष्ट्रातील वेरूळ अजंठ्याच्या लेण्यात भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. सह्याद्रीच्या काळ्या फत्तरांत भव्यता, दिव्यता आणि सौंदर्य ओतप्रोत भरलेले आहे. त्याचप्रमाणे यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर आपल्या आचार-विचारांनी सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांत लोकशाही, समाजवाद व मानवतावाद भिनवला आहे; यशवंतरावांच्या या कार्याच्या एकरूपतेमुळे महाराष्ट्राचा हा सह्याद्री, एक विचारपुरुष म्हणून, भारतात ताठ मान करून उभा आहे.

# ४० : हिमालयाच्या संरक्षणार्थ

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनादिनी पहिला आशीर्वाद देण्यासाठी भारताचे युगपुरुष पंडित जवाहरलालजी आले होते. महाराष्ट्राच्या स्वप्नपूर्तीचा तो ऐतिहासिक क्षण होता. महाराष्ट्राचे पंडितजींवर अपार प्रेम आहे, भक्ती आहे, आणि त्यांनीही महाराष्ट्राला आशीर्वाद दिले. त्या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांनी त्यांना असे आश्वासन दिले की, “ महाराष्ट्राचे हे जे राज्य निर्माण झाले आहे ते मराठी जनतेच्या कल्याणाचे काम तर करीलच, परंतु मराठी भाषिकांजवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले, जे उदात्त आहे त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू. कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे की, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल, भारताचे आणि महाराष्ट्राचे हित जेव्हा एकरूप होते तेव्हा भारतही मोठा होतो, आणि महाराष्ट्रही मोठा होतो ! हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तातून भिनलेला आहे. भारताचे प्रतीक हिमालय आहे; तर महाराष्ट्राचे प्रतीक सह्याद्री आहे. उंच उंच शिखरे असलेला बर्फाच्छादित हिमालय हे भारताचे प्रतीक आहे, तर दोन-दोनशे इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा काळ्या फत्तराचा सह्याद्री आमचे प्रतीक आहे. आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आलेच – तर आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरता महाराष्ट्राचा सह्याद्री उभी करील ! ! – असे मी आपणास आश्वासन देऊ इच्छितो.”

यशवंतरावांनी १ मे १९६० रोजी पंडित नेहरूंना वरील आश्वासन दिले, आणि अवघ्या अडीच वर्षांच्या आतच ते आश्वासन पूर्ण करण्याची संधी महाराष्ट्रावर आली ! २० ऑक्टोबर १९६२ रोजी सकाळी चीनने भारतावर मोठ्या प्रमाणावर चढाई केली, आणि धोला व खिन्जेमाने ही ठाणे घेतली. २५ ऑक्टोबरला तावांग पडले, आणि राष्ट्रपतींनी २६ ऑक्टोबरला देशात ‘ आणी-बाणी ’ जाहीर केली. ता. १ नोव्हेंबरपासून पंडितजींनी संरक्षणखाते स्वतःकडे घेतले, व मेननना संरक्षण उत्पादन खात्याचे मंत्री केले.

यशवंतरावांनी ता. १ नोव्हेंबर १९६२ रोजी महाराष्ट्राचे मुख्य मंत्री या नात्याने नभोवाणीवर भाषण केले, “ चीनने आज आपल्यावर तलवार उपसली

आहे; तिला तलवारीनेच उत्तर द्यावयाचे आहे ! शान्ततावादाचा पुरस्कार केला असला तरी आम्ही स्वाभिमान सोडला नाही; आणि आमच्या भूमीवर झालेले आक्रमण आमच्या बाहुबळावर उखडून काढल्याशिवाय राहणार नाही ! अपार कष्ट व त्याग करून मिळविलेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आम्ही सर्वस्व पणाला लावू. आज आलेले संकट आपल्या सर्व बळानिशी परतवून लावावयाचे हा एकच विचार व निर्धार आज आपण ठेवला पाहिजे. आम्ही जिंकूच जिंकू अशी विजयाची मनोवृत्ती आज लोकांमध्ये निर्माण झाली पाहिजे. तुमच्यापाशी बोलताना आज मला तीव्रतेने एका गोष्टीची जाणीव होते. महाराष्ट्र राज्य-स्थापनेच्या त्या चिरस्मरणीय प्रसंगी मी आपल्या पंतप्रधानांना असे आश्वासन दिले होते की, जर कधीकाळी भारताच्या हिमालयावर संकट आले तर महाराष्ट्राचा सह्याद्री आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या संरक्षणाकरता उभी करील. महाराष्ट्राचे मन मी जाणतो, तुम्हा सर्वांचा प्रतिनिधी या नात्यानेच मी ते आश्वासन दिले होते. पंतप्रधानांना दिलेले आश्वासन पुरे करण्याची वेळ आज आली आहे. ”

काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत ता. ७ नोव्हेंबरला श्री. मेनन यांचा राजीनामा स्वीकारल्याचे पं. नेहरूंनी जाहीर केले, आणि १० नोव्हेंबरला पंडितजींनी यशवंतरावांना दिल्लीस भेटीस बोलावले, व दुसऱ्या दिवशीच यशवंतराव संरक्षणमंत्री होणार असे जाहीर झाले ! त्याच दिवशी अशोक मेहतांनी मुंबईत सायंकाळी शिवाजी पार्कवर भरलेल्या राष्ट्रवादी कामगार मेळाव्यात ‘ श्री. चव्हाण यांची पं. नेहरूंनी संरक्षणमंत्रीपदावर नेमणूक केली ’ हे जाहीर केले. सभेस जमलेल्या एक लक्ष कामगारांनी दहा मिनिटे टाळ्यांचा कडकडाट करून या वार्तेचे स्वागत केले ! तुताऱ्याही वाजवण्यात आल्या. “ यशवंतरावांना संरक्षण मंत्रीपद देऊन पंडितजींनी महाराष्ट्राचा गौरव केला आहे. ” असे श्री. एस्. एम्. जोशी यांनी या मेळाव्यात सांगितले. मुंबईतील सर्व पक्षांच्या नेत्यांनी यशवंतरावांच्या नव्या नेमणुकीचे स्वागत केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने एकमुखी पाठिंबा जाहीर केला. त्याच दिवशी मंत्रीमंडळाच्या बैठकीत यशवंतरावांनी सांगितले की, “ पं. नेहरूंनी आपणास केंद्रीय मंत्रीमंडळात सामील होण्यास सांगितले आहे, आणि आपण त्यांचे निमंत्रण स्वीकारले आहे. संरक्षण मंत्रीपदाची सूत्रे आपण हाती घेणार आहोत. ”

राष्ट्रपति-भवनातून ता. १४ नोव्हेंबरला यशवंतरावांना संरक्षणमंत्री नेमल्याची घोषणा करण्यांत आली. त्याच दिवशी पुणे येथे शनवार वाड्यासमोर त्यांचे भाषण झाले.



संरक्षणमंत्री यशवंतरावांचा शपथविधी

मराठी ग्रंथ संग्रहालय
३८६८०
९२३२



पंडित
नेहरूंनी
केलेल्या
अभिनंद-
नाचा
स्वीकार



पंडीतजींच्या
समवेत
कार्यालयाकडे
जातांना
संरक्षणमंत्री
यशवंतराव
चव्हाण

तारीख १९ नोव्हेंबरला सेलाखिंड आणि बोमदिला ठाणे चिनी फौजेच्या हाती पडल्याचे जाहीर झाले. दुसऱ्या दिवशी पं. नेहरूंनी केनेडींना पत्र लिहून त्वरित मदतीची विनंती केली.

नियोजित संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांना मुंबईच्या जनतेने 'सह्याद्री' या निवासस्थानापासून सान्ताक्रूझ विमानतळापर्यंत हजारोंच्या संख्येने रस्त्याने अभिवादन करून आशीर्वाद दिले. इतक्या मोठ्या जमावाच्या स्वरूपांत मुंबईच्या जनतेने निरोप देण्याचा हा पहिलाच प्रसंग असेल. राष्ट्रप्रेमाच्या भावनेने देशाच्या संरक्षणाच्या प्रतीकावरील ते अलोट प्रेम होते. ता. २१ नोव्हेंबर रोजी राष्ट्रपतींनी यशवंतरावांची संरक्षणमंत्री म्हणून शपथ घेवविली, त्या वेळी पंतप्रधान व इतर मंत्री हजर होते.

यशवंतरावांचा संरक्षणमंत्री म्हणून शपथविधी झाला त्याच दिवशी पहाटे चीनने अगदी नाट्यपूर्ण रीत्या युद्धबंदीची घोषणा केली. त्यानंतर एक आठवड्यात अमेरिकेने व ब्रिटनने बिनशर्त मदत करण्याचे कबूल केले. चीनने युद्धबंदी केली तरी पुन्हा केव्हा आक्रमण घडेल याचा नेम नव्हता. त्यामुळे भारताची संरक्षण-सिद्धता जोरात चालूच राहिली.



**गृहमंत्री लालबहादुरशास्त्री महाराष्ट्राचे नेत्याशी चर्चा करतांना.**

महाराष्ट्राने पंडितजींना दिलेले आश्वासन क्षणाचाही विलंब न लावता पाळले. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी यशवंतरावांनी घेतली. महाराष्ट्राच्या

भावनात्मक ऐक्यासाठी आणि समाजवादाच्या उभारणीसाठी यशवंतरावांची महाराष्ट्राला फार गरज होती. त्यांनी किमान पाच वर्षे तरी नव्या महाराष्ट्राची घडी बसवून द्यावी असे महाराष्ट्रीय जनतेला वाटत होते. तथापि महाराष्ट्राने उत्तमातले उत्तम – सह्याद्रीचा कणखर फत्तर – यशवंतरावांच्या रूपाने हिमालयाच्या रक्षणार्थ दिला. महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून यशवंतरावांची श्री. विनायकराव पाटलांच्या जागी राज्यसभेवर एकमताने निवड केली. पुढे नाशिक लोकसभा मतदारसंघात रिकाम्या झालेल्या जागेवरही महाराष्ट्राने यशवंतरावांना एकमुखी पाठिंबा देऊन बिनविरोध निवडून दिले.

नागपूरनंतर यशवंतरावांनी आपला वाढदिवस अगदी घरगुती पद्धतीने साजरा केला होता. दिल्लीतही १९६३ सालातील वाढदिवशी त्यांनी सौ. वेणूताई-सह म. गांधीजींच्या समाधीपाशी प्रार्थना करून आल्यावर लगेच कचेरीच्या कामकाजास सुरुवात केली.

चीनने अकस्मात् युद्धतहकुबी केल्यामुळे चारसहा महिन्यांनी यशवंतरावांना परत महाराष्ट्र राज्याच्या कारभारात पाठविण्यासंबंधी बातम्या येत. त्यास उद्देशून ते म्हणाले, " मी दिल्लीत एका सैनिकाच्या भावनेने गेलो आहे. आपल्या पंतप्रधानांना सेनापती समजून ते जो हुकूम देतील तो पाळायचा या हेतूने एक व्रतस्थ म्हणून मी येथे आहे. इतर शंका अप्रस्तुत आहेत. पण त्याचबरोबर मला दिल्लीतून कोणीही काढू शकत नाही. मीच एखादे वेळी निघून येईन, पण तोपर्यंत मला तेथून कोणीही काढू शकणार नाहीत. "

संरक्षणमंत्री म्हणून काम पाहू लागल्यावर यशवंतरावांना आपल्या कारभारासंबंधी जाहीरपणे बोलण्याचे प्रसंग कमीच येत, शिवाय संरक्षण खात्याचे काम बोलण्यापेक्षा लष्करी शिस्तीने जलद गतीने उरकणे हेच महत्त्वाचे असल्यामुळे ते आपल्या कार्यालयातील कामात मग्न असत. अथवा सैन्याच्या तिन्ही विभागातील केंद्राची पहाणी करून आपले मार्गदर्शन करीत. हिमालयातील युद्धाचा अनुभव जमेस धरून त्यांनी सैन्याच्या डोंगरी पलटणी तयार करण्याकडे खास लक्ष पुरविले. हवाईदल आधुनिक साहित्याने सुसज्ज ठेवण्याचा प्रयत्न केला. नाविक-दलात नव्या शास्त्राचा जास्तीत जास्त उपयोग करण्यास सुरुवात केली. संरक्षण-उत्पादन खात्य'तही खास लक्ष पुरवले. या कार्यपद्धतीमुळे पूर्वीसारखे प्रसिद्धीच्या झोतात यशवंतराव दिसेनात, म्हणून काहीना शंका वाटू लागली की, यशवंत-रावांचा दिल्लीवर प्रभाव पडत नाही. ज्या यशवंतरावांनी दिल्लीला जाण्याआधीच देशावर प्रभाव पाडला आणि देशाने संकटकाली त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहिले, त्यांच्याबाबत दिल्लीवर प्रभाव पाडण्याचा प्रश्नच नव्हता. दिल्लीचे हवामान मानवण्यास जेवढा अवधी लागेल तेवढाच अवधी दिल्लीवर प्रभाव पाडण्यास यशवंतरावांना पुरेसा आहे. यशवंतराव मुख्य मंत्री असतानाच देशातील विचारवंत

व परदेशातील राजकीय निरीक्षक असे निश्चित भविष्य वर्तवीत होते की; पंडित नेहरू-नंतर भारताच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे काही चारदोन नेते निघतील त्यात यशवंतरावांचे स्थान महत्त्वाचे आहे. या कालातच लिहिलेल्या "पंडित नेहरूनंतर कोण ?" ( After Neharu Who ? ) या पुस्तकात सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक वेलेस हँगेन यानी यशवंतरावांचे मूल्यमापन फारच प्रभावीपणे केले आहे. त्यातील महत्त्वाचा उल्लेख पुढे परिशिष्टांत दिला आहे. श्री. हँगेनच्या अनुमानाप्रमाणे पंडितजीनंतर भारताचे पंतप्रधान म्हणून यशवंतरावांची कारकीर्द सर्वांत प्रभावी आणि टिकाऊ अशी होईल.

इंग्लंड, अमेरिका आणि रशियात ज्याप्रमाणे यशवंतरावांच्या राजकीय कर्तृत्वाविषयी कुतूहल आणि अपेक्षा वाढत होत्या त्याचप्रमाणे इतर देशांतील राजकीय निरीक्षकांचे डोळे यशवंतरावांच्याकडे लागले आहेत. यशवंतरावांनी देशाची सरहद्द ओलांडण्यापूर्वीच त्यांच्या कर्तृत्वाचा वास साऱ्या जगात पसरला होता; त्यामुळे भारताच्या संरक्षण-सिद्धतेसाठी ज्या वेळी ते इंग्लंड, अमेरिका व रशिया या देशांना भेटी देणार असे जाहीर झाले त्यावेळी त्या देशात आपो-आपच त्यांच्याविषयी अनुकूलतेचे वारे वाहू लागले. यशवंतरावांना आपल्या अंगीकृत कार्यात यश मिळण्याचा आत्मविश्वास वाढला.

यशवंतरावांनी व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेतून जीवनाचा हव्यास बाळगला नाही किंवा काहीना काही निमित्ताने आपण परदेशात जावे अशी हाव त्यांनी केव्हाच केली नाही. त्यामुळे मुंबईसारखे जगप्रसिद्ध शहर ज्याची राजधानी आहे अशा राज्याचे मुख्य मंत्री म्हणून त्यांनी पाच वर्षे उत्तम राज्यकारभार केला तरी त्यांनी भारताबाहेर पाऊल टाकले नाही. ज्याने खरे जग पाहिले नाही तो जगप्रसिद्ध बहुरंगी मुंबईवर सहज सुलभतेने आणि मोठ्या विश्वासाने राज्य करतो ही नवला-ईची घटना जगभर झाली होती. त्यामुळेच परदेशात पंडित नेहरूनंतर पंतप्रधान म्हणून ज्यांची नावे घेतली जात होती त्यात यशवंतरावांचा उल्लेख प्रामुख्याने केला जात असे. श्री. वेलेस हँगेन यांनी १९६२ साली लिहिलेल्या स्वतंत्र ग्रंथात यश-वंतरावांच्याबद्दल जगाच्या एवढ्या मोठ्या अपेक्षा वाढविल्या आहेत की पंडितजी-नंतर त्यांच्या व्यक्तिमत्वासारखे प्रभावी व्यक्तिमत्व कोणते असेल तर ते यशवंतराव चव्हाण यांचे आहे असे स्पष्ट सांगितले आहे.

विशेषत: राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात पं. नेहरूंनी यशवंतरावांना महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्रिपद सोडावयास लावून संरक्षणमंत्री म्हणून पाचारण केले त्यामुळे यशवंतरावांच्या जागतिक कीर्तीत भरच पडली. भारतातील एका लढवय्या प्रदेशाचा मुत्सद्दी संरक्षणमंत्री होणार हे जाहीर होताच देशात एक नवा जोम आला. चीनने आपल्या अकल्पित हल्ल्याने भारतास जेवढा धक्का दिला तेवढाच धक्का भारताने आपल्या संरक्षण योजनेत अकल्पित बद्दल करून चीनलाही दिला. इंग्लंड,

लागले. अमेरिका, रशिया या तिन्ही देशांकडून भारतास लष्करी सहाय्य होऊ लागले. त्यामुळे संरक्षण योजनेची सूत्रे यशवंतराव ज्या दिवशी हाती घेणार त्या आधीच चीनने युद्धबंदी घोषणा केली.



मास्को विमानतळावर रशियाचे संरक्षणमंत्र्यासमवेत यशवंतराव मानवंदना घेतांना.

चीनने युद्धबंदी जाहीर केली तरी अशा विश्वासघातकी शत्रूवर विश्वास ठेवून गाफील राहाणारे भारताचे संरक्षणखाते नाही हे यशवंतरावांनी आपल्या धडाडीच्या कार्याने दाखवून दिले. त्यांनी लष्कराच्या नव्या पहाडी डिव्हिजन्स उभारण्यास सुरुवात केली. लष्कराच्या तिन्ही दलांचे आधुनिकीकरण करण्याचे ठरविले, आणि त्याप्रमाणे संरक्षणखात्याची पंचवार्षिक योजना तयार केली. भारताच्या संरक्षणखात्याच्या या पंचवार्षिक योजनेच्या कार्यवाहीसाठी अमेरिका, रशिया व इंग्लंड यांच्या सहाय्याची गरज होती; म्हणून यशवंतरावांनी आपला परदेश दौऱ्याचा कार्यक्रम आखला. तपशीलवार चर्चा होऊन निर्णय घेतले जावेत म्हणून अधिकाऱ्यांचे एक पथक पूर्वतयारीसाठी रवाना केले. बंगलोरच्या विमान-कारखान्यात भारताने तयार केलेल्या ‘मरुत्’ या पहिल्या सुपरसॉनिक फायटर विमानाचे ता. १० मे रोजी उद्‌घाटन करून यशवंतराव ता. १६ मे ६४ रोजी रात्री अमेरिकेच्या दौऱ्यावर निघाले. वाटेत इंग्लंडमध्ये एक दिवस मुक्काम करून ता. १८ ते २९ मे पर्यंत अमेरिकेच्या दौऱ्याचा कार्यक्रम होता. त्यानंतर परत येताना इंग्लंडमध्ये एक आठवडा थांबण्याचा त्यांचा विचार होता.

अमेरिकेत त्यांचे मोठे स्वागत झाले. आठ-दहा दिवस फिरून त्यांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाने भारताची गरज अमेरिकन जनतेला आणि सरकारला पटवून दिली. भारताच्या लष्करी गरजा भागविण्याबाबत करारावर शेवटचा हात फिरण्याचे चालू असताच पं. नेहरूंच्या आकस्मित निधनामुळे यशवंतरावांना आपला दौरा तहकूब करून पंडितजींच्या अंत्ययात्रेच्या दर्शनास परत यावे लागले.

यशवंतरावांच्या अमेरिकन दौऱ्याची फलश्रुती हळू हळू दिसू लागली. त्यानंतर ते ' मिग २ ' विमानाच्या कारखान्याच्या वाटाघाटीसाठी ता. २८ ऑगस्ट रोजी रशियाच्या दौऱ्यावर गेले. रशियाचा त्यांचा दौराही अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाला. रशियाच्या संरक्षण मंत्र्यांनी त्यांचे स्वागत केले. रशियाचे



यशवंतराव व निकिता क्रुश्चेव्ह.

पंतप्रधान क्रुश्चेव यांच्याशी त्यांच्या प्रदीर्घ वाटाघाटी झाल्या. आणि ' मिग २ ' विमानांच्या कारखान्याचा करारही अमलात येऊ लागला.

यशवंतराव अमेरिका-रशियाचा दौरा करून आल्यावर लोकसभेत त्यांनी आपल्या संरक्षणखात्याच्या पंचवार्षिक योजनेसंबंधी व परदेश दौऱ्यासंबंधी सविस्तर निवेदन केले; देशाने त्याचे स्वागत केले.

अमेरिकेच्या दौऱ्याच्या वेळी इंग्लंडचा दौरा रहित झाला होता; त्यामुळे इंग्लंडला स्वतंत्र भेट देणे आवश्यक होते. तथापि ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुका जवळ आल्यामुळे यशवंतरावांनी आपल्या दौऱ्याची तारीख सार्वत्रिक निवडणुकांनंतर ठरविली. हुजूर पक्षाऐवजी हॅरॉल्ड विल्सन यांच्या नेतृत्वाखाली मजूर सरकार अधिकारावर आले ही गोष्ट यशवंतरावांच्या अंदाजाप्रमाणे शुभदायी ठरली; १० नोव्हें. १९६४ रोजी त्यांनी आपला इंग्लंडचा एक आठवड्याचा दौरा सुरू केला. अमेरिका-रशियाचा दौरा केल्यानंतर त्यांच्या ब्रिटनच्या दौऱ्यासंबंधी बरेच कुतूहल होते. नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांनी भारताला संरक्षण व आर्थिक क्षेत्रात सर्वतोपरी मदत करण्याचे अभिवचन दिल्याने भारताच्या संरक्षण मंत्र्याच्या दौऱ्याला विशेषच महत्त्व आले होते.

भारताचे संरक्षणमंत्री चव्हाण व राष्ट्रकुलमंत्री श्री. बॉटमले यांनी संयुक्त पत्रक काढले. त्यात ब्रिटिश मंत्र्यांनी भारताला सर्वतोपरी सहाय्य करण्याची अभिवचने पुनःपुन्हा दिली, इतकेच नव्हे तर त्याबाबत तपशीलवार वाटाघाटी झाल्या. ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवरील ताण सहन करूनही भारताचे प्रत्येक मागणे ते पुरविण्याच्या प्रयत्न करतील. माझगाव डॉकयार्डाची पुनर्रचना करण्यास व पाणबुडी व आरमारी गरजा भागवण्यास ब्रिटनने मान्यता दिली.

परिपत्रकाचे समीक्षण करताना यशवंतराव म्हणाले, "ब्रिटनशी व विशेषतः ब्रिटिश आरमाराशी आमचे जे इतकी वर्षे संबंध दृढ झाले आहेत ते यापुढेही चालू राहणार आहेत याविषयी आम्हाला फार समाधान वाटले; आणि त्या दृष्टीने आमच्या वाटाघाटी यशस्वी होण्यात ब्रिटनचे संरक्षणप्रमुख लॉर्ड माउंटबॅटन यांनी मोठी कामगिरी बजावली, तिचा गौरवाने आणि कृतज्ञतेने उल्लेख करणे आवश्यक आहे. टोरी सरकारने घेतलेल्या अनेक अनौपचारिक निर्णयाविरुद्ध जाण्यास लष्करी आणि मुलकी अधिकारी वर्गाने ( एस्टॅब्लिशने ) अनेक बाबतीत विरोध केला; यावर मात करण्यात लॉर्ड मॉउंटबॅटनची आणि राष्ट्रकुलमंत्री श्री. बॉटमले यांची फार मदत झाली."

* * *

# ४१ : महाराष्ट्राचे तरुण यशवंत

भारताच्या संरक्षणाची जबाबदारी यशवंतरावांच्यावर आली त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार करण्यास त्यांना कमी अवधी राहू लागला. महाराष्ट्र त्यांना आपला एकमेव नेता मानतो; तथापि यशवंतरावांना सर्व गोष्टींत लक्ष घालून आपले पुरोगामी धोरण यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्राकडे सारखी धाव घेता येईलच असे नाही. मुंबईस असताना जशी त्यांची स्वतःच्या मतदार संघावर नेहमी नजर असे. त्याप्रमाणे दिल्लीहूनही ते महाराष्ट्रावर नजर ठेवतील, अधूनमधून भेटतील; आणि त्यांचा तो लहानपणापासूनचा स्वभावधर्मच आहे. मुंबईचे त्यांचे निवासस्थान म्हणजे महाराष्ट्राच्या राजकीय हालचालींचे एक केंद्र बनले आहे.

सह्याद्रीने महाराष्ट्राचा इतिहास घडवला, आता नरीमन पॉइंटवरील निवासस्थान देशाच्या राजकारणात महाराष्ट्राची नाडी तपासण्याचे ठिकाण बनले आहे. देशाचा यशवंत धन्वंतरी मुंबईत येतो त्या वेळी महाराष्ट्रातील सर्व रोगीनिरोगी जनतेची पाहणी करून जातो.

यशवंतराव हे एक असे नेते आहेत की ज्यांनी आपल्या ध्येयवादाला प्रथम स्थान, संघटनेला दुय्यमस्थान, आणि स्वतःच्या हितसंबंधाला शेवटचे स्थान दिले आहे. आज राजकारणांत जी लाथाळी आणि भांडणे होतात त्याचे कारण स्वतःच्या हितसंबंधाला अग्रपूजेचा मान देऊन स्वार्थाकरता धडपडणारे पुढारी जास्त आहेत हे आहे.

अशा पुढाऱ्यांजवळ ध्येयवाद तर नसतोच, पण स्वतःचा स्वार्थ साधत असेल तरच पक्षसंघटनेला महत्त्व देतात, नाही तर ती मोडकळीस आली तरी त्याची त्यांना पर्वा नसते. यशवंतरावांनी ध्येयवादाला प्रथम स्थान दिल्यामुळे ते वैचारिक नेतृत्व यशस्वीपणे करू शकतात, आणि स्वतःच्या स्वार्थाआधी पक्षसंघटना मानल्यामुळे स्वतःच्या पाठीमागे नव्या पिढीचे नवे नेतृत्व उभे करू शकतात. पक्षसंघटनेचा विचार करताना जुन्या सहकाऱ्यांचा आदर ठेवण्याची जशी काळजी वाहतात त्याचप्रमाणे नव्या पिढीचे नवे नेतृत्व आपण निर्माण करू शकलो की नाही, – त्याची योग्य ती जोपासना करू शकलो की नाही याची त्यांना अहोरात्र तळमळ लागून राहिलेली असते. शेतकरी आपल्या

शेतात अहोरात्र कष्ट करून ते सर्व पीक कसे चांगले येईल हे पहातो, आणि ते चांगले पीक आल्याचा त्यास जो आनंद होतो तो आनंद यशवंतरावांना नव्या पिढीचे नवे नेतृत्व फुललेले व फुलविलेले पाहताना होतो. त्यामुळे यशवंतराव जसजसे वरच्या मोठ्या क्षेत्रात काम करावयास जातात तसतसे खालच्या कार्यक्षेत्रात नवे नवे तरुण यशवंत निर्माण झाल्याचे त्यांना पहावयास मिळते. यशवंतराव राष्ट्रीय नेते झाल्यामुळे – महाराष्ट्राला थोडे दुरावल्यासारखे वाटले तरी – महाराष्ट्र हा तरुण पिढीच्या नव्या यशवंतांनी बहरलेला आहे. यशवंतरावांच्याविषयी निष्ठा असणारे आणि त्यांचे कार्य निष्ठेने चालवणारे अनेक तरुण नेते महाराष्ट्राच्या – नागपूरपासून कोल्हापूरपर्यंतच्या – सर्व विभागांत सांपडतील. त्यांची खूप मोठी यादी होऊ शकेल.

महाराष्ट्रात पंचायतराज्य सुरू झाल्यामुळे तर जिल्हा पातळीवर नव्या नव्या नेत्यांचे भरघोस पीक येऊ लागले आहे; त्यात जुने-नवे, तरुण-वयोवृद्ध, सर्वच येतात. तथापि या सर्व पुढाऱ्यांना मार्गदर्शक असणारा जो पक्ष असतो त्या पक्ष-संघटनेत जे नवे नेतृत्व निर्माण होते ते तरुण पिढीतून प्रयत्नपूर्वक निर्माण करण्याचा यशवंतरावांचा प्रयत्न असतो. आणि तो प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा मानला पाहिजे. त्यामागे स्वतःच्या हितसंबंधाचा भाग फार कमी असतो. पक्ष-संघटना आणि विशेषतः ध्येयवाद याला अग्रस्थान दिलेले असते. यशवंतरावांच्या या निकोप दूरदृष्टीचे महत्त्व लक्षात येण्यासाठी काही व्यक्तींचा अपरिहार्य उल्लेख करणे युक्त वाटते. एखाद्याचा नामोल्लेख केल्याने कोणी भलता गैरसमज करून घेऊ नये. यशवंतरावांच्या चरित्र लेखनाचा माझा प्रयत्न वैचारिक चरित्राच्या स्वरूपाचा आहे. म्हणून यशवंतराव कोठे प्रति-शिवाजीच्या रूपांत दिसले की प्रति-तानाजी अगर प्रति–बाजी प्रभू दिसलेच पाहिजेत; आणि ते आम्हीच आहोत – आमचा उल्लेख का नाही असा राग कोणी बाळगू नये.

महाराष्ट्राचे तरुण यशवंत या संदर्भात विचार करताना यशवंतरावांच्या राजकीय निष्ठेने काम करणारे अनेक तरुण कार्यकर्ते आढळतील. कोणी नावाचे असतील, कोणी अनामिक असतील, यशवंतरावांच्या कार्यपद्धतीतून निर्माण झालेले, वाढलेले – सर्व तरुण कार्यकर्ते हे महाराष्ट्राचे तरुण यशवंत आहेत. ते विदर्भात आहेत, मराठवाड्यात आहेत – तसे पश्चिम महाराष्ट्रातही सापडतील. यशवंतरावांनी असे नेते वाढवल्याची एकदोन उदाहरणे वानगीदाखल सांगावीशी वाटतात. उदाहरणाने एकदोन कार्यकर्त्यांचा उल्लेख केला तरी तो तरुण पिढीतील सर्व कार्यकर्त्यांचा आहे.

जुन्या महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्षपद जेधे-गाडगीळ, देव-देवगिरीकर भाऊसाहेब हिरे, देवकीनंदन आणि मालोजीराव नाईक निंबाळकर यांच्यासारख्या

अनुक्रम 38660 दि: 
क्रमांक 2232 नों दि



ज्येष्ठ नामवंत नेत्यांनी भूषविले आहे. या नेत्यांच्या कर्तृत्वाचा किंवा श्रेष्ठतेचा वाटा त्यांच्या अध्यक्षीय निवडीस कारणीभूत असला तरी वयाची आणि कार्याची ज्येष्ठताही बहुतांशी कारणीभूत मानली पाहिले. ही सर्व मंडळी तरुण पिढीच्या दृष्टीने त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत ज्येष्ठच असत; तथापि त्यांच्यानंतर श्री. राजारामबापू यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही केवळ तरुण पिढीच्या प्रतिनिधीची निवड होय. या निवडीने यशवंतरावांनी आपल्यानंतरच्या नव्या पिढीवर जबाबदारीचे कार्य सोपविले हे तर खरेच, पण त्याहीपेक्षा काँग्रेसमध्ये नवे तरुण नेतृत्वास योग्य प्रकारे वाव दिला जातो असा दिलासा महाराष्ट्रातील तरुण पिढीला मिळाला असे म्हणावे लागेल.



श्री. राजारामबापू – पं. नेहरू – श्री. यशवंतराव.

तरुण कार्यकर्त्यांना पूर्वी प्रान्ताध्यक्षाजवळ बसताना अगर बोलताना थोड्या संकोचाने अगर कनिष्ठतेच्या भावनेने स्वाभाविकतःच वागणे भाग असे; राजाराम-

बापू अध्यक्ष झाल्याने मनमोकळेपणा आणि मित्रत्वाच्या नात्याने तरुण वर्ग जवळ आला. महाराष्ट्र काँग्रेस ही तरुणांची झाली. महाराष्ट्र काँग्रेस तरुण झाल्याने जिल्हा काँग्रेसच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेत्यांनाही तरुणांच्या उत्साहाने महाराष्ट्र काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली जोमाने कार्य करावे लागले. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचे पानिपत झाले त्यातून सावरून येण्यास यशवंतरावांची वैयक्तिक कर्तबगारी व श्रेष्ठत्व जसे कारणीभूत आहे त्याचप्रमाणे त्यांनी महाराष्ट्र काँग्रेसला आणलेले तारुण्य हेही कारणीभूत मानावे लागेल. महाराष्ट्राच्या तरुण यशवंतांनी १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांत काँग्रेसला भरघोस यश मिळवून दिले.

श्री. राजारामबापू हे जुन्या महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष होते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर नव्या महाराष्ट्र राज्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र – अशा वेगवेगळ्या प्रदेश काँग्रेस कमिट्या असणे योग्य नाही; त्यामुळे अलगपणाची भावना कायम राहील; म्हणून यशवंतरावांनी महाराष्ट्राचे भावनात्मक ऐक्य साधण्यासाठी वरील सर्व प्रदेश काँग्रेस कमिट्यांचे एकीकरण करण्याचा प्रयत्न केला. संयुक्त महाराष्ट्र हा कायद्याने निर्माण झाला होता; तो मनाने आणि आचरणाने एक होण्याची अत्यावश्यकता होती. नाही तर नवा महाराष्ट्र कदाचित् भंग पावेल अशी साधार भीती होती. मराठवाडा मोकळ्या मनाने संयुक्त महाराष्ट्रात आला; तथापि विदर्भात नाग-विदर्भ आन्दोलन चालविण्याची ईर्षा बाळगून काही लोकांनी विदर्भीय जनतेची दिशाभूल चालविली होती. या परिस्थितीत खरे भावनात्मक ऐक्य साधावयाचे असेल तर राज्याबरोबर राज्यकर्त्या पक्षाचेही ऐक्य साधले पाहिजे. हे कार्य ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेत्यांच्या करवी करणे आवश्यक होते म्हणूनच नव्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी डॉ. गोपाळराव खेडकर यांची निवड केली. आणि त्यांना राजारामबापू, मोहन धारिया, विनायकराव पाटील, भाऊसाहेब वर्तक, आगरवाल, आदी तरुण कार्यकर्त्यांनी साथ दिली.

पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे तरुणांना काँग्रेस संघटनेत वाव देण्याचा प्रयत्न यशवंतरावांनी केला त्याचप्रमाणे मराठवाडा व विदर्भ-नागपूर विभागातही ही प्रक्रिया त्यांनी घडवून आणली होती. यशवंतरावांना नव्या महाराष्ट्रात नवी तरुण काँग्रेस बनवावयाची होती. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष डॉ. खेडकर हे मंत्रिमंडळात सामील झाले. राजारामबापू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही मंत्रीमंडळात घेतले गेले. ३१ मार्च १९६२ रोजी मुंबई येथे भरलेल्या प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत श्री. विनायकराव पाटील या ३५ वर्षांच्या तरुण कार्यकर्त्याची अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली.

विनायकराव हे औरंगाबाद जिल्हाच्या वैजापूर तालुक्यातील असले तरी त्यांचे दुय्यम शिक्षण नांदगाव, नाशिक येथे झाले; आणि कॉलेजचे शिक्षण त्यांनी बडोदा व पुणे येथे पुरे केले. दुय्यम शाळेतील प्राध्यापक म्हणून पुणे व औरंगाबाद येथे ते काम करीत असताच त्यांच्या सार्वजनिक कार्याच्या आवडीमुळे १९५९ च्या सुरुवातीस त्याची औरंगाबाद जिल्हा काँग्रेसचे चिटणीस म्हणून निवड झाली. समाजवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते म्हणून ते आपल्या विद्यार्थीजीवनापासून प्रसिद्ध आहेत. प्रसन्न व्यक्तिमत्व, प्रामाणिकपणा, आणि कार्याची तळमळ, या गुणाबरोबरच वैचारिक स्पष्टता आणि बाणेदारपणा यामुळे विनायकरावांविषयी जिल्ह्यातील सर्वांनाच एक आगळे आकर्षण वाटे. यशवंतरावांनी कार्यकर्त्यांच्या प्रथम बैठकीतच विनायकरावांची एक उमदा तरुण कार्यकर्ता म्हणून पारख केली, आणि डिसेंबर १९५९ सालात झालेल्या मराठवाडा काँग्रेसच्या बैठकीत तेथील श्री. बाबासाहेब सवनेकर आदी ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या आशीर्वादाने प्रांतिकचे अध्यक्ष म्हणून निवड केली. एक वर्षानंतर महाराष्ट्रातील सर्व प्रदेश काँग्रेसचे ज्या वेळी एकीकरण केले त्या वेळी श्री. विनायकराव हे सरचिटणीस म्हणून निवडले गेले. तथापि सार्वत्रिक निवडणुकीनंतर ३१ मार्च १९६२ रोजी महाराष्ट्र काँग्रेसच्या बैठकीत विनायकराव पाटील यांची प्रान्ताध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली.



श्री. विनायकराव पाटील

विनायकराव पाटील हे राजारामबापूंपेक्षाही तरुण आहेत. प्रथमत: पश्चिम महाराष्ट्रातील अडाणी आणि शहाण्या लोकांचा असा गैरसमज होता की कोणी तरी पाटील अध्यक्ष करावयाचे होते, आणि मराठवाड्याची पाळी आली म्हणून विनायकरावजींना अध्यक्ष केले. विनायकरावांचे नुकतेच ऑपरेशन झालेले, आणि त्यात रक्तदाबाचा आजार, त्यामुळे त्यांना आवश्यक तेवढासुद्धा वेळ पक्ष प्रचारासाठी प्रथम देता आला नाही. लोकांचा गैरसमज खरा ठरतो की काय अशी वेळ आली होती. तथापि विनायकरावांनी आपल्या प्रकृतीची तमा न बाळगता महाराष्ट्र राज्यभर जेव्हा संचार सुरू केला त्या वेळी विनायकरावांच्या विचाराची व तडफदारपणाची खरी ओळख महाराष्ट्रास झाली. हे नेतृत्व केवळ मागासलेल्या भागास खूष करण्यासाठी निर्माण केलेले नसून महाराष्ट्राच्या कोणत्याही विभागातील नव्या पिढीच्या नेतृत्वात सरस आहे. या नेतृत्वाची—विचाराची आणि

आचाराची धारणा संपूर्णतः यशवंतरावांसारखीच आहे. राजकारणाची मूळ बैठक तात्त्विक आणि समाजवादाची आहे. विचारात जातीयवादाचा अंशही सापडणार नाही, ध्येयवाद आणि संघटना यांस प्राधान्य दिल्यामुळे व्यक्तिगत हितसंबंधाच्या हेव्यादाव्यांसाठी राजकारणात जी गढूळता निर्माण होते ती विनायकरावांच्या राजकीय जीवनात आढळून येणार नाही. अल्पावधीत मिळालेल्या मोठेपणामुळे ज्येष्ठतेचा हक्क सांगणाऱ्या पुढाऱ्यांना त्यांच्याबद्दल प्रथमतः हेवा वाटला, तरी यशवंतरावांच्या राजकारणाचे बारकावे त्यांच्या ठायी असल्यामुळे ते अल्पावधीतच परिस्थितीत योग्य ती सुधारणा घडवून आणू शकतात. त्यांनी आक्टोबर १९६२ मध्ये खुलदाबाद येथे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे शिबिर घेऊन काँग्रेसमध्ये वैचारिक बळ आणण्याचे यशस्वी कार्य केले.

यशवंतरावांसारखाच त्यांच्याही व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला पहावयास सांपडतो. यशवंतराव संरक्षणमंत्री झाल्यावर त्यांना संसदेचे सभासद होणे क्रमप्राप्त होते; त्यासाठी विनायकरावांनी राज्यसभेवरील आपल्या जागेचा राजीनामा दिला. काँग्रेसने पुढे ज्या कामराज योजनेचा एक राजकीय आदर्श म्हणून स्वीकार केला त्याचा आचार महाराष्ट्रात यशवंतरावांवर वैचारिक निष्ठा ठेवणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांनी केला. देशहितासाठी आणि पक्षकार्यासाठी विनायकरावांनी आपल्या खासदारपदाचा त्याग केला. वैचारिक राजकीय निष्ठेशिवाय हे शक्य नाही. त्यामुळेच १९६३ मध्ये देखील विनायकरावांची पुन्हा महाराष्ट्र काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली.

महाराष्ट्रात यशवंतरावांचा वैचारिक वारसा निष्ठेने जतन करणारे विनायकराव हे एक तरुण पिढीचे नेते आहेत म्हणूनच ते ‘ महाराष्ट्राचे तरुण यशवंत ’ आहेत.

यशवंतराव हे खऱ्या लोकशाहीचे आणि व्यक्ति स्वातंत्र्याचे भोक्ते असल्या-मुळे त्यांना कोणताही सांप्रदायीपणा मान्य नाही, त्यामुळे स्वतःचा आंधळा संप्रदाय निर्माण करण्याची कल्पनाही त्याना मान्य होणार नाही; तथापि नव्या पिढीचे सुजाण नेतृत्वाची आघाडी नेहमी सज्ज ठेवण्याचा विचारपूर्वक प्रयत्न ते करतात. म्हणूनच नागपूरपासून कोल्हापूरपर्यंत सारी महाराष्ट्र काँग्रेस तरुण यशवंतांनी फुललेली आहे.

* * *

## ४२ : नवभारताचा विचारपुरुष

यशवंतराव आज भारतीय पुढारी म्हणून देशाच्या नागरिकांसमोर आले. त्यांच्या जीवनाचा आतापर्यंत पाहिलेला इतिहास हा ते भारतीय क्षितिजावर दिव्य ताऱ्याच्या रूपात उदयास येण्यापूर्वीचा आहे. त्यांच्या राष्ट्रीय जीवनाला आता खरी सुरुवात झाली आहे. सूर्य उदयास आल्यावर रात्रीचा अंधार नाहीसा होतो आणि मानवाला प्रकाश मिळतो, त्याप्रमाणे यशवंतराव राष्ट्रीय पुढारी म्हणून भारतीय जनतेसमोर जे आले ते देशातील भाषिक वादाच्या अतिरेकाचा अंधार दूर करून, व अमृतसर काँग्रेसचा राष्ट्रीय ऐक्याचा नवसंदेश आचरणांत आणून; भारतीय राजकारणातील त्यांचे पहिले पाऊल यशाचे मंगल तोरण बांधूनच पडले आहे. भारताला आपल्या परंपरेतील महान् नेतृत्वाची कधीच वाण पडणार नाही असा भारतीय जनतेला दिलासा देणारे ते पाऊल आहे. भारताची राजधानी दिल्ली यशवंतरावांच्या नेतृत्वाकडे कौतुकाने आणि अभिमानाने पहात आहे. महाराष्ट्राचो मान उंच होत आहे.

भारतात मुंबई राज्याची परंपरा सर्वात थोर मानली जाते त्याचे मुख्य कारण उत्तम शासन-व्यवस्था हे होय ! श्री. बाळासाहेब खेर मुख्य मंत्री होते त्या वेळी लोकांच्या हिताच्या दृष्टीने राज्यकारभार चालवावयाचा, सर्वांना शक्य तो खूष ठेवावयाचे असे धोरण होते. या दृष्टीने बाळासाहेब खेरांनी 'सौजन्यमूर्ती' अशी ख्याती राज्यातील जनतेकडून मिळविली.

बाळासाहेब खेरांना स्वत: समाजवादी किंवा साम्यवादाची खास दृष्टी नव्हती; व काँग्रेसचाही तसा पुरस्कार नव्हता; त्यामुळे लोकशाही राज्यकार-भारातील मूलगामी स्वरूपाची ध्येयदृष्टी त्यांच्याजवळ नव्हती. ब्रिटिशांनी निर्मिलेली राज्ययंत्रणा व आपली सामान्य स्वरूपाची लोकोपयोगी पडणारी दृष्टी यांतून जे काही लोकहित साधता येईल ते साधले जाई. नवसमाजरचनेची दृष्टी नव्हती असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. त्यानंतर श्री. मोरारजीभाई मुख्य मंत्री झाले. पूर्वी डेप्युटी कलेक्टर म्हणून काम केल्यामुळे खेर मंत्रिमंडळाच्या काळातच उत्तम प्रशासक असा त्यांचा लौकिक होता. राज्यकारभारात कार्यक्षमता आणि शिस्त

आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला; पण हे कार्य मुख्य सेक्रेटरीकडूनही चांगल्या प्रकारे पार पाडता येणे शक्य आहे. मुख्य मंत्री हा लोकनेता असतो, आणि त्याच्यावर लोकांना आपल्या नेतृत्वाचा नवा विचार देण्याची जबाबदारी असते. मोरारजीभाई पक्षनेते होते, तरी त्यांच्याजवळ नवा विचार होता हे म्हणणे धाडसाचे होईल. त्यामुळे त्यांना समाजवाद, साम्यवाद यांविषयी विशेष आस्था असल्याचे आठवत नाही. त्यांच्याजवळ नवा विचार नसला तरी गांधीवादाचा आचार आहे असे म्हणतात. परंतु तो आचार शिस्तीच्या कडक बंधनामुळे सामान्य माणसाला अनुकरणीय राहात नाही. दारूबंदी, संतति नियमन यांवरील त्यांची मते माहीत आहेत ! त्यात ते सोयीकरताही एक टक्का मुरड घालण्यास तयार नसतात. नीतिमत्ता ही संपूर्णतः आपल्या दृष्टिकोणातून लोकांनी अमलात आणली पाहिजे असे त्यांचे धोरण असे. मोरारजीभाईंच्यानंतर मात्र हळूहळू वास्तववादी दृष्टिकोण घेतला गेला. मुंबई राज्याच्या उज्ज्वल परंपरेची जबाबदारी टीकाकाराच्या दृष्टीने नऊ नंबरच्या, अननुभवी तरुण मंत्र्यावर आली, आणि आपल्या एक वर्षाच्या कारकीर्दीतच त्यांनी – यशवंतरावांनी – आपल्या पूर्वीच्या मुख्य मंत्र्यांशी लोकांच्या मनातील आपल्या तुलनेचा विचार सहजगत्या घालवलाच परंतु मुंबई राज्यालाच नव्हे तर देशाला एक नवी आशा निर्माण करून टेविली. याचे मुख्य कारण त्यांना लोकशाहीचा व समाजवादाचा मूलगामी विचार आहे. त्यांचा अभ्यास मोठा आहे, व पुरोगामी ध्येयनिष्ठा आहे. त्याचबरोबर त्यांनी बाळासाहेब खेरांचे सौजन्य व मोरारजीभाईंचा उत्तम प्रशासक गुण आत्मसात केला आहे. दुसऱ्याचे चांगले गुण घेणे आणि आपल्या मूळ ध्येयदृष्टीचा विकास करणे हा यशवंतरावांचा स्वभावच बनला आहे. त्यांच्या ठिकाणी काही दोष असतील, परंतु ते त्यांचे स्वतःचे आहेत. आपल्या दोषांत दुसऱ्यांचे दोषांची भर घालून घेण्याइतके ते अपुऱ्या बुद्धीचे खासच नाहीत. पंडित नेहरूंचे समाजवादी दृष्टीतील मूलगामी विचार व यशवंतरावांचे विचार यांत एकरूपता असल्यामुळेच ते नेहरूंच्या विचाराशी नेहमी एकरूप असलेले दिसतात; व त्या दृष्टीनेच त्यांची नेहरूंवर निष्ठा आहे. मुंबई राज्यात अथवा महाराष्ट्र राज्यात यशवंतराव ही केवळ व्यक्ती म्हणून ओळखली जात नसून पुरोगामी ध्येयवादी विचारांची शक्ती म्हणून ओळखली जाते. ते जे विचार बोलून दाखवतात त्या दिशेने निर्भीड पावले टाकतात त्यामुळे लाखो लोक त्यांच्यावर प्रेम करू लागतात. त्यांचे अनुयायी व सहकाऱ्यांप्रमाणेच एके काळी गैरसमजाने त्यांच्याविषयी विरोधी मत करून घेतलेले लोकही आज त्यांचे चाहते बनले आहेत. व्यक्ती ज्या वेळी समाजातील आकांक्षांचे प्रतीक बनते त्या वेळी त्या व्यक्तीची ओळख नसणारे असंख्य लोकही त्या व्यक्तीवर प्रेम करतात. यशवंतरावांच्यावर असे प्रेम करणारे असंख्य अनामिक आहेत.

यशवंतरावांनी द्विभाषिक यशस्वी केले आणि त्या यशाच्या विश्वासावर महाराष्ट्राची राष्ट्रीय भावना व कर्तृत्व सिद्ध करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश मिळविला. द्वैभाषिकाचे राष्ट्रीय ऐक्याचे तत्त्व चांगले असले तरी लोकांनी मनापासून द्वैभाषिकाचा स्वीकार केल्याखेरीज खरे राष्ट्रीय ऐक्य निर्माण होणार नाही. त्यापेक्षा शक्य त्या मर्यादेपर्यंत राष्ट्रीय ऐक्याची हमी देऊन लोकांच्या विश्वासाने भाषिक राज्य असणे राष्ट्राच्या दृष्टीने पर्यायी हिताचे होईल. म्हणूनच पंडित नेहरूंनी १ मे रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेस शुभाशीर्वाद दिला. यशवंतरावांनीही पंडितजींना आश्वासन दिले की, राष्ट्रीय कार्यासाठी महाराष्ट्र आपले सर्वस्व अर्पण करील.



पंडित नेहरूंशी चर्चेत मग्न.

महाराष्ट्र राज्यातही भावनात्मक ऐक्य निर्माण होण्याची पूर्वीप्रमाणेच गरज आहे. तथापि भाषिक जिव्हाळ्यामुळे विदर्भ, मराठवाड्याचा प्रादेशिक अलगपणा घालविता येणे शक्य आहे. कारण भाषिक प्रश्नासारखी याबाबत लोकांची मते अतिरेकी नाहीत. यशवंतरावांनी आपल्या कुशल राज्यकारभाराने

महाराष्ट्र राज्य प्रगतिपथावर नेण्याचा यशस्वी प्रयत्न चालवला होता. तथापि चिनी आक्रमणामुळे देशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आणि क्षणाचाही विचार करायला सवड न राहता यशवंतरावांना दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून जावे लागले. महाराष्ट्रासाठी त्यांची किमान पांच वर्षे तरी गरज होती. परंतु राष्ट्रासाठी महाराष्ट्राने यशवंतरावांना देशाच्या संरक्षणार्थ पाठवून मोठा त्याग केला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यावर अनन्य साधारण एकमुखी निष्ठाही व्यक्त केली. महाराष्ट्र राज्याचा नेता निवडण्याचे सर्वाधिकार त्यांना दिले. यशवंतरावांनी श्री. कन्नमवारासारख्या ज्येष्ठ सहकाऱ्यांची उपनेतेपदावरून नेतेपदी निवड केली. श्री. कन्नमवार हे महाराष्ट्रातील सर्वांत छोट्या अल्पसंख्य जमातीचे; तथापि त्यांचे सर्व जीवन राष्ट्रकार्याला वाहिलेले होते. श्री. कन्नमवारांची महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री म्हणून निवड झाल्यामुळे श्री. माडखोलकरासारख्यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनादिनी 'मराठा राज्य की मराठी राज्य होणार' अशी शंका व्यक्त केली होती, त्यास योग्य वेळी उत्तर मिळाले. शिवाय विदर्भवासीयांच्या मनांतील प्रादेशिक वर्चस्वाची भीती नाहीशी झाली. आपल्या समाजाची जातवार घडण असता देखील जातीयवादाच्या आचाराला पायबंद घालण्याचे सामर्थ्य एकट्या यशवंतरावांतच आहे.

यशवंतराव हे महाराष्ट्राचे सर्वमान्य नेते आहेत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे एकमेव नेते आहेत, त्याचप्रमाणे राष्ट्रनेत्यांपैकी एक प्रमुख नेते आहेत; काँग्रेस वर्किंग कमिटीवर दोन वेळा त्यांची निवड भरघोस मतांनी झाली आहे. देशाच्या राज्यसभेतही ते गृहाचे नेते म्हणून निवडले.

अखिल भारतीय काँग्रेस समितीने कामराज योजना ता. १० ऑगस्ट १९६३ ला स्वीकारली, त्यानुसार संघटनात्मक कार्यासाठी मंत्रीपदे सोडावी अशी सूचना एकमताने मान्य झाली. त्यानंतर पंडित नेहरूंनी मोरारजीभाई, शास्त्री, एस्. के. पाटील, जगजीवनराम आदी केंद्रीय मंत्र्यांचे राजीनामे स्वीकारणेची शिफारस काँग्रेस कार्यकारिणीला केली. कामराज योजना ही भारतीय जीवनाच्या आदर्शानुसारच आहे; तथापि तिच्यात योजनेच्या स्वरूपाचे नियोजन किती आहे हा प्रश्न वादाचा होऊ शकेल. कामराज योजनेचे मूल्यमापन या ठिकाणी इतक्या अल्पावधीत करणे अप्रस्तुत ठरेल. मात्र या योजनेवर अधिकारवाणीने विचार प्रगट करणेचा अधिकार यशवंतरावांचा आहे. कारण नवभारताचे ते विचारपुरुष आहेत, तसेच राज्यकारभार व पक्षसंघटना या दोहोंवरही सारखाच प्रभाव असणारे ते एकमेव तरुण नेते आहेत.

महाराष्ट्र काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत यशवंतरावांनी आवाहन केले की, "कामराज योजनेने संघटनेत चैतन्य येईल. पक्ष व शासन अधिक लोकाभिमुख करू

या. येती ५–१० वर्षे भारताच्या इतिहासातील आणीबाणीची जाणार आहेत; परंतु कामराज योजनेमुळे काँग्रेस संघटनेत नवचैतन्य निर्माण होईल. आणि आगामी काळातील परिस्थितीला ती योग्य प्रकारे तोंड देऊ शकेल. काँग्रेस पुन्हा जनतेच्या विश्वासास पात्र व्हावी या हेतूने मंत्र्यांनी पक्षसंघटनेचे कार्य हाती घ्यावे, अशी सूचना श्री. कामराज यांनी एका वर्षापूर्वीच प्रथम मांडली होती. पुढे चिनी आक्रमणामुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि देशाची संरक्षण–सज्जता वाढवण्यासाठी अर्थव्यवस्थेवर पडू लागलेला ताण या घटनांमुळे पंडित नेहरूंनी ही क्रान्तिकारक सूचना अमलात आणण्याचे ठरवले.''

यशवंतराव पुढे म्हणाले, '' लोकशाही देशात तसेच हुकुमशाही देशात सत्तेसाठी स्पर्धा नेहमीच चालते; भारतातच हा प्रकार आहे असे नव्हे. परंतु या प्रश्नावर तोडगा म्हणून कामराज योजनेसारखी योजना अमलात आणणारा भारत हा पहिलाच देश आहे. कामराज योजनेला तात्त्विक अधिष्ठान आहे, आणि भारताच्या परंपरेशी ती पूर्णपणे सुसंगत आहे. इतर राष्ट्रांनाही ही योजना आदर्श ठरेल.''

जयपूर अधिवेशनात ३ नोव्हेंबर १९६३ रोजी काँग्रेसने कामराज योजनेस मान्यता दिली. पंडित नेहरूंनी त्यानुसार काही केंद्रीय मंत्र्यांचे राजिनामे स्वीकारले. राज्यातील मुख्य मंत्र्यांचे राजीनामेही काँग्रेस अध्यक्षांच्याकडे आले. त्यावर वर्किंग कमिटीत चर्चा होऊन काही राज्यात नवी मंत्रीमंडळे आली, इतर ठिकाणी काही फेरफार झाले. या योजनेचे अंतिम परिणाम काय होतील ते होवोत, तथापि प्रथमतः तरी देशात एक प्रकारचे नवे युग सुरू झाले. ज्या ठिकाणी नवे लोकाभिमुख व कार्यक्षम नेतृत्व आले त्या ठिकाणी जनतेने योजनेचे स्वागत केले. स्वातंत्र्यानंतरच्या कालात देशात काँग्रेसचीच सत्ता असल्यामुळे सत्तास्पर्धेचे केंद्र सार्वत्रिक निवडणुकांऐवजी काँग्रेसअंतर्गत बनले होते; त्यामुळे सत्तास्पर्धेस पक्षाच्या कार्यक्रमाऐवजी व्यक्तिगत हेव्यादाव्यांचे आणि भांडणाचे रूप आले. अशा वेळी अंतर्गत स्वार्थी सत्तास्पर्धांना कामराज योजनेमुळे चांगलाच शह वाटू लागला. स्वातंत्र्यकालात पक्षसंघटनेला राज्यसत्तेपेक्षा प्रथमच महत्त्व आले. पंडित नेहरूंनी आपला राजकीय वारस निवडला नाही, किंवा आपल्या हयातीत त्यांना देशाचा राज्यकारभार समर्थ व्यक्तीच्या खांद्यावर सुपूर्त करता आला नाही, तरी कामराज योजनेच्या स्वीकाराने त्यांनी आपल्या हयातीतच काँग्रेस पक्ष राजसत्तेपेक्षा बलशाली करण्याचे कार्य विचारपूर्वक करून आपली खरी लोकशाहीनिष्ठा व्यक्त केली. काँग्रेस पक्षही लोकशाही समाजवादी ध्येयाच्या दृष्टीने अधिक एकरूप झाला; पक्षकार्य करण्यास काँग्रेसचे अध्यक्ष चांगलेच समर्थ बनले.

अकल्पितपणे ता. २७ मे १९६४ रोजी पंडित नेहरूंचे महानिर्याण घडले! शान्ततेसाठी अविरत झटणारा जागतिक नेता हरपला!! सारा भारत देश शोक-सागरात बुडाला. जगाला संभ्रमात पाडणाऱ्या – पंडितजीनंतर कोण – या प्रश्नास ताबडतोब उत्तर देण्याचे महा कठीण कार्य देशाला करावयाचे होते. यशवंतराव अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. ते आपला दौरा स्थगित करून पंडितजींच्या अंत्य-दर्शनास त्वरित आले. कॉंग्रेसच्या सामुदायिक नेतृत्वाने कॉंग्रेसचे अध्यक्ष कामराज यांच्याकरवी श्री. लालबहादुर शास्त्री यांची पंतप्रधानपदी नियुक्ती केली. जगातील एका मोठ्या लोकशाही देशाचा कारभार निर्विघ्नपणे चालू राहिला. देशाने पंडितजींच्या आत्म्यास शान्ती दिली.

पंडितजीनंतर देशाचा कारभार सुव्यवस्थित चालू राहिला हे जरी खरे असले तरी म. गांधी आणि पंडित नेहरू यांनी विधायक कार्याने आणि वैचारिक प्रेरणेने कॉंग्रेस पक्षद्वारा देशात समर्थ युगकाल निर्माण केला, तशा प्रकारची नवी प्रेरणा देण्याचे सामर्थ्य कॉंग्रेसमध्ये निर्माण झाले पाहिजे. नव्या पिढीला मार्ग-दर्शनार्थ आकर्षक व्यक्तिमत्व हवे आहे; बुद्धिवादी वर्गाला, शेतकरी कामगार वर्गाला आणि देशातील सृजनशक्तीला दिलासा देणारे नेतृत्वच पंडित नेहरूंनंतरच्या युगाचे दर्शन घडवू शकेल.



भारताचे विचारपुरुष.

यशवंतरावांच्याबाबत देशात आणि परदेशात एक मोठी अपेक्षा निर्माण झाली आहे. तरुण पिढीतला एक अभ्यासू, राजकारणी म्हणून त्यांची

ख्याती आहे. त्याचप्रमाणे उत्तम प्रशासक म्हणूनही त्यांनी लौकिक संपादन केला आहे. राष्ट्रीय आणीबाणीच्या कालात तर ते पंडितजींना आणि देशाला दिलासा देणारे ठरले आहेत. प्रथमतः श्री. मुनशींच्या विचारधारेत काँग्रेसचे स्वरूप सांगताना ' आता यशवंतरावांच्या सारख्या तरुण आणि पुरोगामी पुढाऱ्यांच्या नेतृत्वाने काँग्रेस विकास पावणार आहे ' हा विचार सांगितला आहे, त्याचा पुनरुच्चार करून म्हणावेसे वाटते की, पंडित नेहरूनंतरची भारतीय काँग्रेस ही यशवंतरावांची होणार आहे.'

* * *

# परिशिष्ट

## पं. नेहरूनंतरचा भारत

भारत हा जगातील एक मोठा लोकशाही प्रधान देश आहे आणि स्वातंत्र्यानंतर सतत पंधरावीस वर्षे पंडित नेहरू हेच पंतप्रधान राहिल्यामुळे पंडित-जींच्या उतारवयात अनेकाच्या मनात पंडित नेहरूनंतर कोण हा प्रश्न येत असे. पंडितजींचे व्यक्तिमत्व महान वटवृक्षासारखे भासे, त्यामुळे त्यांचे छायेत इतर नेते खुरटे दिसत. सरदार वल्लभभाई पटेल किंवा पं. पंत यांचे प्रभावी व्यक्तिमत्व उठून दिसे तरी ते पंडितजींचे वारस म्हणून राहतील असा विचार कुणाही भारतीयाच्या मनात आला नाही. ते वयाने जेष्ठ असल्याने पंडितजींच्या हयातीतच कालवश झाले. म. गांधींनी आपला राजकीय वारस म्हणून पं. नेहरूंना नियुक्त केले. त्याप्रमाणेच पंडितजीनीही अप्रत्यक्षरीत्या जयप्रकाशजींना आपला वारस मानले आहे अशी समजूत होती. किंवा जयप्रकाश हेच पंडितजींचे राजकीय वारस व्हावेत अशी इच्छा भारतीय जनतेत रुजत होती. परंतु सामान्य जनतेची सदिच्छा आणि सत्तेचे राजकारण यात बहुधा तफावत असते. जयप्रकाशजींच्या बाबत पंडितजींचे वारस होण्यात आणखी अडचण निर्माण झाली होती. त्यांनी काँग्रेसचा त्याग करून प्रजासमाजवादी पक्षाचे नेतृत्व पत्करले होते व नंतर राजकारण संन्यास घेण्याच्या मार्गावर भूदानाकडे वाटचाल सुरू केली होती. त्यामुळे पंडितजीनंतर कोण हा प्रश्न अधिक बिकट वाटत होता—आणि पंडितजी वार्ताहराशी या प्रश्नावर मुलाखत देताना नेहमी बगल देत असत. तथापि शास्त्री, मोरारजीभाई, चव्हाण, इंदिरा गांधी आदी नेत्यांचा देशात आणि परदेशात पंडितजींचे वारस म्हणून उल्लेख होत असे.

अमेरिकेतील नॅशनल ब्रॉडकास्टिंग कंपनीच्या दक्षिण आशिया वृत्त संघाचे प्रमुख श्री. वेलेस हँगेन हे सुप्रसिद्ध वार्ताहर आहेत. भारताच्या स्वातंत्र्यानंतर सुमारे दहा वर्षे त्यांनी पॅरिस हॅराल्ड व न्यूयॉर्क टाईम्स या पत्राचे वार्ताहर म्हणून काम केले आहे. भारताच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचे उत्तम ज्ञान असणारे ते गृहस्थ आहेत. त्यांनी मोठ्या मार्मिकतेने आणि अभ्यासू वृत्तीने पंडित नेहरूनंतर कोण ? ( After Neharu Who ? ) या १९६२ साली लिहिलेल्या पुस्तकात मोरारजीभाई देसाई, व्ही. के. कृष्णमेनन, लालबहादुर शास्त्री, यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, जयप्रकाश नारायण, स. का. पाटील, या सात प्रमुख पुढाऱ्यांची व ब्रिजमोहन कौल या लष्करी प्रमुखाची माहिती पंडित नेहरूंचे वारस या संदर्भात दिली आहे. मि. हँगेन यांनी केलेले वर्णन हे केवळ संबंधित व्यक्तींशी घेतलेल्या प्रदीर्घ मुलाखतीवर अवलंबून नसून देशातील आणि परदेशातील त्यांच्या बाजूचे व विरोधक अशा सर्व व्यक्तींच्या मुलाखतीच्या आधारे दिले आहे. भारताच्या सद्यः-काळच्या राजकीय अवस्थेचे मोठे मार्मिक विवेचन केले आहे. मोरारजीभाई व मेनन हे काँग्रेसच्या उजव्या डाव्या टोकाचे नेते असल्यामुळे काँग्रेस पक्षात ते फारसे लोकप्रिय नाहीत. श्री. लालबहादूर शास्त्री समन्वयाच्या नात्याने पंडितजींच्या निधनानंतर पंतप्रधान झाले आहेत. तेव्हा त्यांचेबद्दल अधिक विवेचनाची गरज नाही. इंदिरा गांधींचे नाव घेण्यासारखे आहे. तथापि त्यांचीच सध्या ही जबाबदारी स्वीकारावयास तयारी नसल्याने तूर्त त्यांचा विचार करणे योग्य नाही. जयप्रकाश नारायण व स. का. पाटील यांचा प्रश्न वेगवेगळ्या कारणांसाठी पंडित नेहरूंचे वारस म्हणून निकालात निघाला आहे. बी. एम्. कौलची लष्करी राजवट या लोकशाही भारतात येण्याची सुतराम शक्यता नाही. राहता राहिले यशवंतराव चव्हाण. त्यांचे संबंधी या पुस्तकाच्या दृष्टीने सविस्तर माहिती देणे युक्त आहेच; शिवाय वरील आठ लोकांचे संदर्भात असे म्हटले आहे की, यशवंतराव हेच दीर्घकालाचे सुप्रसिद्ध पंतप्रधान होऊ शकतील.

श्री. वेलेस हँगेनच्या शब्दात यशवंतराव चव्हाणांचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

" यशवंतराव चव्हाण हे भारतात सर्वात अधिक चांगले भवितव्य असलेले तरुण नेते आहेत आणि पंतप्रधानाच्या जागेसाठीही प्रमुख व्यक्ति म्हणून ओळखली जाते. वेचाळीसच्या आंदोलनाने त्यांच्या ठिकाणचे धैर्य व कनवाळू-पणाचा प्रत्यय येऊ लागला. मुंबईसहित महाराष्ट्राचे ते मुख्य मंत्री आणि राजकीय नेते आहेत. ते आजच्या महाराष्ट्राचे एक अविवादित थोर पुरुष म्हणून मान्यता पावले आहेत. एक तडफदार, धाडशी, लढवय्या तरुण या नात्याने त्यांचे ( Dynamic ) स्फूर्तिदायी, बुद्धिवादी, आणि देशाच्या मातीत

कसलेले व्यक्तिमत्व सिद्ध झाले आहे. त्याचप्रमाणे ते प्रभावशाली आणि आत्मविश्वासू लोकनेते म्हणून प्रसिद्ध आहेत. "

" हे मुख्य मंत्री भारतातील प्रांतीय पुढाऱ्यासारखे दिसतात तथापि त्यांचे ठिकाणी ग्रामीण डौल व भलेपणाबरोबर वाचनाची आणि ध्येयवादी कल्पनांची विशेष आवड यांचा संगम झाला आहे. इतर पुढाऱ्यात या गोष्टीची खास उणीव दिसते. ते बाह्यतः साधे असले तरी अंतर्यामी तत्त्वज्ञासारखे आहेत. त्यांचे स्थूल देहातदेखील उत्साह ओसंडून वाहतो. "

" मी अनेक भारतीय पुढाऱ्यांना भेटलो. पण **पं. नेहरूंखेरीज फक्त यशवंतराव चव्हाणांच्या ठिकाणीच राजकीय गुणांचा सुयोग्य मिलाप दिसला.** म्हणून मला वाटते की चव्हाणांना दीर्घकालाचे प्रभावशाली पंतप्रधान होण्याची संधी सर्वांत जास्त आहे. अलिकडे बोलले जाते की पंडित नेहरू १९६७ पूर्वी निवर्तले अगर निवृत्त झाले तरी ताबडतोब यशवंतराव पंतप्रधान होणार नाहीत; कारण काँग्रेस पक्षनेत्यांना मध्यवर्ती सरकारातील अनुभवी पुढारी हवा आहे. यशवंतरावांची संरक्षण मंत्री म्हणून झालेली निवड निश्चितपणे हा अडसर दूर करील. "

" आजच्या भारतात नवी पिढी सत्तास्थानावर येण्याची शक्यता आहे. चव्हाण हे तिच्या राजकीय आकांक्षाचे प्रतीक आहे. चव्हाण हे समाजाचे नेते आणि पक्षनेते आहेत. कार्यक्षम राज्यकारभार हेही त्यांचे दुसरे ध्येय आहे. आणि मोरारजीभाईंनी शासनातील कर्मचाऱ्याकडून जेवढे काम करून घेतले त्यापेक्षा कितीतरी अधिक काम यशवंतराव करून घेत आहेत. विशेषतः चव्हाण हे आपल्या सहकाऱ्यांकडून आणि अनुयायांकडून दराऱ्यापेक्षा प्रेमाने काम करून घेतात. म. गांधीजीबद्दल संत म्हणून आदर आहे; नेहरूंवर जनतेचे पितृतुल्य प्रेम आहे आणि मोरारजी प्रशासक म्हणून मान्यता पावले आहेत. चव्हाण हे संत नाहीत परंतु महाराष्ट्रात त्यांना पिता आणि उत्तम प्रशासक म्हणून मान आहे. **भारतात राज्यकर्ता आणि जनता यांचे संबंधांचा हा एक नवा आदर्श आहे.** "

" वादग्रस्त प्रश्नातील सर्वांनाच चव्हाण हे आपल्या बाजूचे वाटतात; त्यांची ही एक अजोड हातोटी आहे. तथापि चव्हाण नेहमी सर्व प्रश्नावर दुहेरी भूमिका घेतात हे म्हणणे चूक होईल; कित्येक प्रश्नावर ते स्वतःची खंबीर भूमिका घेतात परंतु ती अशा प्रकारची असते की विरोधी बाजूस किमान नाराजी राहते. "

" मोरारजींपासून त्यांचे स्वतःचे कट्टर भक्तही दुरावतात. तथापी चव्हाण विरोधी टीकाकारातही अनुकूल बदल घडवून आणतात. "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८९७० वि: चरित्र
क्रमांक ९२३२ दि. ३।७।६



संरक्षणमंत्री यशवंतराव



पंतप्रधान लालबहादूर शास्त्री
व
यशवंतराव चव्हाण

" पंडित नेहरू किंवा मोरारजीभाईप्रमाणे यशवंतराव श्रोत्यापुढे भाषणबाजी करीत नाहीत; ते अगदी मुद्देसूद बोलतात. भारतीय पुढाऱ्यांच्या जे विशेष अंगवळणी नाही अशा प्रकारे श्री. चव्हाण हे ज्या विषयासंबंधी बोलावयाचे आहे तेवढेच बोलतात. "

" महाराष्ट्रात अल्पसंख्याकांच्या हाती विशेष सत्ता नसतादेखील ते व्यापार, उद्योगधंदे आणि इतर व्यवसायातील त्यांच्या स्थानाचा पूर्वीप्रमाणेच चांगला उपभोग घेतात. चव्हाण हे मोरारजीभाईंपेक्षाही अल्पसंख्याकांत अधिक लोकप्रिय आहेत. "

" चव्हाण हे हटवादी ( टोकळेबाज मताचे ) नाहीत की अत्याग्रही नाहीत. त्यांनी राजकीय जीवनास मार्क्सवादी म्हणून सुरवात केली आणि अद्यापही ते मार्क्सवादाचा शब्दप्रयोग वापरतात. एका आदरणीय प्रजासमाजवादी नेत्याने म्हटले आहे की, चव्हाण हे समाजवादी विचारसरणीचे असल्यामुळे त्यांचे स्थान मूलतःच चांगले आहे. "

" मुंबईत अनेकदा होणाऱ्या राजनैतिक स्वागतात शेतकऱ्याच्या पोटी जन्मलेला मुख्य मंत्री स्थिरमनाने आणि डौलाने फिरे; सर्वांशी हसत, स्वागताचे शब्द पुटपुटत. परंतु अधिक वेळ दुसऱ्यांचे ऐकण्यास देत असतात. ते भारतातील फार थोड्या नेत्यांपैकी आहेत की, जे दुसऱ्याला चांगले समजून घेतात आणि ज्यांना मनापासून शिकावेसे वाटते. "

" पंडित नेहरूंना डाव्या विचारसरणीची आणि व्यवहारात जुळते घेणारी माणसे आवडतात. चव्हाणांच्या अंगी दोन्हीही गुण आहेत. "

आपल्या ग्रंथाच्या उपसंहाराच्या प्रकरणात श्री. वेलेस हॅंगेन भारतातील आठ प्रमुख व्यक्तींचा तुलनात्मक विचार करून म्हणतात—

" लालबहादूर शास्त्री आपण पंडितजींचे वारस होऊ शकत नाही असे म्हणतात परंतु पंडितजींचे वारसदार म्हणून ज्या अनेक नेत्यांचा विचार केला आहे त्यात शास्त्रींनाच प्रथम पंडितजींचे वारस म्हणून स्वीकार करण्यास सांगण्यात येईल; या गोष्टीत काहीतरी एक भारतीय आदर्श आहे. "

" भारतात पंडितजीनंतर कोण या प्रश्नाऐवजी नेहरूंच्या पहिल्या वारसानंतर कोण हा सर्वात महत्त्वाचा आणि कठीण प्रश्न आहे या मताच्या लोकांशी मला सहमत व्हावेसे वाटते. "

" भारतात पंतप्रधानाचे जागेसाठी सर्वांत खात्रीचे व्यक्तिमत्व मुंबईत वाढत आहे असे मला दिसते. चव्हाण दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून नोव्हेंबर १९६२ मध्ये गेले. ते तरुण, हुषार, कष्टाळू आणि कमालीचे जुळते घेणारे आहेत. मला वाटते **पंडित नेहरूंनंतर यशवंतराव चव्हाण हेच भारताचे सर्वांत दीर्घ मुदतीचे पंतप्रधान होतील; तसेच ते पंडित नेहरूंसारखेच मोठ्या व्यक्तिमत्वाचे ठरतील.** "

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
न. क. ९८८५०

REFBK-0014450

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रमांक
अनुक्रम ३८६७० वि: चरित्र
क्रमांक १२३२ नों. दि. ३/७/६५